८ व १७ ऑगस्ट १९६८
स्वप्नमुक्तता विशेषांक
एक रुपया पंचवीस पैसे

# माणूस



# दि स्वदेशी केमिकल्स प्रायव्हेट लि.

: उत्पादक :

- पोटॅशियम परमँगनेट
- पोटॅशियम कार्बोनेट
- सल्फेट ऑफ ॲल्युमिना ॲनहायड्रस
- मॅग्नेशियम सल्फेट ॲनहायड्रस
- ट्राय-सोडियम फॉस्फेट ,,
- सोडियम ॲल्युमिनियम सल्फेट ॲनहायड्रस

: रजिस्टर्ड ऑफिस :

आर्मी ॲण्ड नेव्ही बिल्डिंग, तिसरा मजला,
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई १ (बी. आर.)

फोन : २५२१३३

* * *

: फॅक्टरी :

चिंचपोकळी क्रॉस लेन, व्हिक्टोरिया गार्डन,
मुंबई २७ डी. डी., फोन : ३७४६१२

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : अकरावा–बारावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रख्यात 'टाईम' साप्ताहिकाने लिहिले आहे, 'Envisioned as a hybrid of humanitarianism, diplomacy, hardnosed dumping of surplus crops, the overseas programme of 1971 will require payments in dollars rather than soft currencies and ostensibly will make nations push their own food supply (December 22, 1967)–अमेरिकेचा परकीय देशांना अन्नमदत देण्याचा कार्यक्रम म्हणजे काहीसा मानवतावाद, काहीशी राजनीती आणि अमेरिकेजवळ जादा असलेले धान्यउत्पादन रिचवण्याचा रोखठोक व्यवहार याचे मिश्रण आहे. १९७१ पर्यंत (म्हणजे यंदापासून तीन–साडे-तीन वर्षांनी) या कार्यक्रमानुसार मदत घेणाऱ्या देशांना मदत म्हणून मिळणाऱ्या या धान्याची किंमत आपल्या घरगुती चलनात देण्याची सवलत रद्द होणार आहे. डॉलरमध्ये त्यापुढे ही किंमत चुकती करण्याचे बंधन येणार असल्याने मदत घेणारे देश साहजिकच स्वदेशी उत्पादनवाढीवर अधिक विसंबून राहतील.'

या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारची तीन वर्षांत अन्नस्वावलंबन ही घोषणा कशी काय वाटते?

–संपादक

मूल्य १२५ पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# अन्नपरावलंबन संपणार !

रशियाने पाकिस्तानला शस्त्रास्त्रमदत केल्यामुळ देशभर पुन्हा एकदा वायफळ संतापाची व वांझोटया निषेधाची एक जोरदार लाट उसळून गेली.

सर्व क्षेत्रात स्वावलंबी होणे हाच यावर एकमेव उपाय आहे याबाबतही पुन्हा एकदा सर्वांचे एकमत व्यक्त झाले.

हा चक्रनेमिक्रम आता सर्वांच्या अंगवळणी पडलेला आहे.

अमेरिकेकडून ५१ साली अन्नधान्य आयात करण्याचा प्रसंग असो, पाकिस्तानला अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांची मदत मिळण्याची ५३ मधील घटना असो, ६२ मधील चीनचे आक्रमण असो वा ६५ मधील रशिया-अमेरिका यांच्या संयुक्त दडपणामुळे अर्धवट सोडावे लागलेले भारत-पाक द्ध असो—अपमानाच्या जाणीवेने काही काळ कासावीस व्हायचे, फारतर थोडी आरडाओरड करायची, एकदा स्वावलंबनाचा जप आणि जाग येऊनही पुन्हा झोप असा आपला गेल्या वीस वर्षातला नित्यक्रम आहे.

खरोखरच आपल्याला स्वावलंबन हवे आहे का ?

शस्त्रास्त्रनिर्मिती, उद्योगधंदे या क्षेत्रातील स्वावलंबन हा लांबचा पल्ला आहे म्हणून तूर्त सोडून देऊ. निकडीचा, प्राथमिक गरजेचा अन्नाचा प्रश्न आपण कसा सोडवीत आहोत ? तीन वर्षात, म्हणजे १९७१ मध्ये परकीय अन्नमदत बंद ही आपली नवी घोषणा आहे. एकतर ही घोषणा आपली नाही. वॉशिंग्टननेच ती आपल्यावर लादलेली आहे. तीन वर्षानंतर अमेरिकन धान्याची किंमत आपल्याला डॉलरमध्ये मोजावी लागणार आहे. स्वर्गातून कुबेर जरी खाली उतरला तरी चालू परिस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापारातील आपली तूट भरून निघेल, आपल्याजवळ डॉलर साठतील ही शक्यता मुळीच नाही. मग डॉलर नाही म्हणून अन्नधान्यआयात बंद केली, करावी लागली या नामुष्कीपेक्षा आपणहूनच ती बंद करीत आहोत हा आ ास निर्माण करणे श्रेयस्कर नाही कां ?

तीन वर्षांनंतर जर अमेरिकन गहू वगैरे बंद होणार असेल तर आपले देशांतर्गत अन्नधान्योत्पादन झटपट वाढविणे हे ओघाने आलेच ! यासाठी आता खते व खत–कारखाने आयात करण्याचे नवे पर्व सुरू होत आहे. वास्तविक तज्ज्ञांनी आता हे स्पष्ट केलेले आहे की आपली अन्नतूट, आपले दुष्काळ यांचा संबंध कमी उत्पादनाशी असलाच तर तो थोडा आहे. मुख्य दोष आहे तो वाटपव्यवस्थेचा. विषम हितसंबंधाचा. जमीनवाटपासंबंधी कायदे केले, अंमलबजावणी झाली नाही. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला, मूठभर सधन बागायतदारांपलिकडे तो पोचलाच नाही. नवे कालवे खणले, जमीन बाजारी पिकांकडे गेली. सक्तीची धान्यवसूली यशस्वी होत नाही. झाली तर वसूलीचे धान्य साठवायला गुदामे तयार नाहीत. वाहतूक निष्काळजीपण

# कृषीपरावलंबन सुरू होणार!!

सुरूच आहे. हे आपले जुनाट प्रकृतीदोष आहेत आणि यावर आघात करण्याचे आपण ठरवीत नाही तोवर उत्पादन कितीही वाढले तरी आपले परावलंबन कमी होण्याची शक्यता नाही. परदेशातून खते आणि खतकारखाने आयात करून येथे 'गहूक्रांती' होईल, गहूक्रांतीची तिकीटेही काढता येतील, पण दहा-पांच वर्षांतच ही क्रांती परकीयांनी गिळंकृत केल्याच्या भयाण वस्तुस्थितीला आपल्याला तोंड द्यावे लागेल. आज परकीय मदतीच्या 'घी' वर ताव मारणे सोपे आहे. उद्या 'बडगा' दिसल्याशिवाय राहणार नाही. जमिनीला लागलेली खतांची भूक भागवता भागवता नाकी नऊ येतील; अन्नासाठी गेली वीस वर्षे गेला नाही एवढा अमाप पैसा परदेशी घालवावा लागेल. आपली शेती आणि शेतकरी परदेशी यंत्रतंत्राच्या 'प्रगतिशील' गुलामगिरीत कायमचा जखडला जाईल. एकीकडून रशिया आपल्याला ट्रॅक्टर्स पुरवील—मग यापूर्वी खरीदलेले ट्रॅक्टर्स िन पयोगी म्हणून गंजत पडलेले आहेत याकडे आपण दुर्लक्ष करू. दुसरीकडून अमेरिका आपल्यावर खते आणि खत-कारखाने यांचा मारा करील, खरेदीसाठी पैसे नसतील तर कर्जाची सोयही करून देईल, कारण एवढी प्रचंड बाजारपेठ हातची जाऊ द्यायला अमेरिका हा काही मानवतावादी देश नाही. ट्रॅक्टर्स आणि खतांच्या मागोमाग शीतगृहे येतील, औषधे येतील, फवारे मारण्यासाठी विमाने येतील, पाणीपुरवठ्यासाठी कारंजीही येतील, आपले कोवळे व हुशार तरुण कमी पगारावर तिकडे राबत राहतील, तिकडचे भारी 'तज्ज्ञ' आपल्याकडे येऊन विद्यापीठात मार्गदर्शन करतील, विद्यापीठे काढूनही देतील. अन्नपरावलंबापेक्षा हे कृषीपरावलंबन धोक्याचे आहे. शत्रू ओसरीवर होता. यापुढे तो माजघरात ठाण मांडणार आहे. तीन वर्षांत या मार्गाने अन्नस्वावलंबी होण्यासाठी तीस वर्षे गुलामगिरीची किंमत आपण मोजणार आहोत काय?

शासनाने हे ठरविलेले दिसते. ज्या वेगाने परकीय मदतीचे, कर्जाचे नवे नवे करार होत आहेत, मंत्र्यांची—अधिकाऱ्यांची अशा करारावर सह्या करतानाची हंसरी छायाचित्रे प्रसिद्ध होत आहेत, त्यावरून यात काही धोका आहे असे शासनाला वाटतच नसावे, किंवा शासनाचा काही इलाजच चालत नसावा, परकीयांची दडपणेच जबरदस्त असावीत हे उघड आहे. महाराष्ट्रातच पहा ना! कृषी विद्यापीठाच्या जागेबाबत अद्याप वाद सुरू आहेत, विद्यापीठासाठी जमिनी ताब्यात घ्यायला नुकतीच कुठे सुरुवात होत आहे तर दहा पाच अमेरिकन तज्ज्ञांची टोळी हजर! आपलेही काही विद्वान संशोधनासाठी तिकडे दाखल झालेले आहेत. यावरून हे विद्यापीठ, त्यातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे पदवीधर, शिक्षक, संशोधक, शेतीतज्ज्ञ कुठल्या शेतीशास्त्राचा प्रसार करतील, या शास्त्राचा व संशोधनाचा लाभ कुणाला होत राहील याचा अंदाज बांधणे कठीण नाही. आपला

मुख्य प्रश्न कोरडवाहू शेतीचा. ती कसणाऱ्या लहान शेतकऱ्याचा. या शेतकऱ्याकडे व त्याच्या जमिनीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आपला अन्न प्रश्न विकट झाला. ही वस्तुस्थिती सर्वमान्य असतानाही महाराष्ट्रातले हे कृषी विद्यापीठ बागायत भागातच का निघत आहे ? शास्त्रीय कसोटचा हे एक बुजगावणे आहे. शास्त्रालाही एक सामाजिक संदर्भ असतो. अमेरिकेला–रशियाला किंवा आपल्याला मदत देणाऱ्या प्रगत औद्योगिक राष्ट्रांना आपल्या बागायत भागाशीच कर्तव्य आहे–ही या जागेच्या निर्णयामागील एकमेव सावकारी कसोटी आहे. आपल्या कोरडवाहू शेतीचा, लहान शेतकऱ्याचा मूलभूत प्रश्न सुटला, त्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक पुनर्घटनेला आपण प्रवृत्त झालो तर मदत देणाऱ्या सावकारी राष्ट्रांचे हितसंबंध येथे सुरक्षित राहणार नाहीत, फोफावणार नाहीत. आपण स्वावलंबी होऊ, समर्थ होऊ. हे आपल्या मदतकर्त्यांना कसे परवडणार ! यासाठी एकच डाव पुन्हा पुन्हा खेळूनही चालत नाही. अन्न मदत फार बोचू लागली म्हणता ! खते घ्या. खते हवीत मुख्यत: खात्रीशीर पाणीपुरवठा असलेल्या बागायत भागासाठी. म्हणजे धरणे आली, कालवे आले. हे कालवे, ही धरणे यंत्रसामग्रीशिवाय कशी पूर्ण होणार ? ही यंत्रसामग्रीही पुढेपुढे आपल्याकडची चालत नाही. बाहेरून मागवायची म्हणजे पैसा हवा. त्यासाठी पुन्हा कर्ज, पुन्हा परकीय मदत. असे हे चक्र आहे आणि ते सतत फिरण्यासाठी विद्यापीठही आहे. इंग्रजांना इथे येऊन राज्य करावे लागले. आता मॉस्को–वॉशिंग्टनवाल्यांना तेवढेही श्रम घेण्याची आवश्यकता वाटत नाही. औद्योगिक क्षेत्रात बस्तान केव्हाच नीट बसलेले आहे. सहयोग–सहकार्य या गोंडस नावाखाली परकीय हितसंबंधांनी येथे भक्कम पायरोवा केलेला आहे. सरकारी क्षेत्रात रशियाने केला, खाजगी क्षेत्रात अमेरिकेने केला. दडपणे दोन्हीकडून सुरू आहेत. शेतीक्षेत्र या दडपणांपासून इतके दिवस दूर राहत होते. आता यावरही टाच येते आहे. मुठभर औद्योगिक देशी-विदेशी मक्तेदारांच्या पंक्तीला तितकेच मुठभर ग्रामीण मिरासदार ‘ बहुजनसमाजाचे प्रतिनिधी ’ म्हणून चिकटू पाहत आहेत. यालाच आम्ही नवे नाव दिले आहे–‘ कृषीक्रांती. ’ वास्तविक अन्नपरावलंबनापेक्षाही धोकेबाज ठरणारे हे कृषीपरावलंबन आहे. आपल्या सर्व स्वावलंबी आर्थिक नियोजनाचा या प्रक्रियेमुळे धुव्वा उडत आहे. विकासाच्या नावाखाली सामाजिक–सांस्कृतिक पारतंत्र्याचे व विषमतेचे एक जबरदस्त षड्यंत्र आपल्याला ग्रासू पाहत आहे. एका मऊमूत मोहजालाचे आवरण त्याभोवती सफाईने लपेटले जात आहे. कांचनमृगाचे रूप धारण करून आलेल्या या मारीचाला आम्ही कोणीच ओळखायला राजी नाही. सारेच हट्ट धरून बसलो आहोत, ‘ मज आणून द्या तो हरिण अयोध्यानाथा ! ’ आणि अयोध्यानाथ हरीण आणून देतीलही, पण त्यासाठी हट्ट धरणारी सीता त्यावेळी आश्रमात असणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. —श्री. ग. मा.

# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## ☐ श्री. मामासाहेब मोहोळ आणि पद्मभूषण पदवी

परवा फारच चांगली बातमी वाचली. आपले मामासाहेब मोहोळ तुम्हाला ठाऊकच आहेत. पुणे जिल्ह्यातले काँग्रेसचे मोठे पुढारी. शिवाय आमदार. कर्तबगार मनुष्य. त्यांना 'पद्मभूषण' पदवी द्यावी असा ठराव पुणे जिल्हा परिषदेने नुकताच संमत केला.

बातमी वाचली आणि पुणे जिल्हा परिषदेच्या कल्पकतेचे मोठे कौतुक वाटले. माझी आपली पूर्वी भाबडी समजूत की, या असल्या पदव्या कुणाला द्यायच्या, कुणाला नाही हे सरकार ठरवते. सरकारमधली चार विद्वान माणसे एकत्र बसतात. आणि चांगली चांगली माणसे डोळ्यासमोर आणतात. पण आपल्यालाही यात भरीव सूचना करता येतात हे कधी लक्षात आले नव्हते. पुण्याच्या जिल्हा परिषदेने एक ठरावच करून हा मार्ग दाखवून दिला हे फार छान झाले ! .. सरकारला विधायक सूचना करा अशी ओरड सरकारच नेहमी करत असते ना ? घ्या तर मग ही विधायक सूचना. एवढ्या मोठ्या जिल्हा परिषदेने पास केलेला ठराव. तो कसा बरे नाकारता येईल तुम्हाला ? उलट, तुमचे काम सोपे झाले की नाही ? यंदा कुणाला बरं या पदव्या द्याव्यात म्हणून डोके खाजवीत बसणारच ना तुम्ही ? मग एकतर नाव डोळ्यासमोर आले !

विचार करता करता मला तर वाटले की, पुणे जिल्हा परिषदेच्या या ठरावाचे अनुकरण सगळ्यांनी केले पाहिजे. आणि सरकारचा बोजा थोडा हलका केला पाहिजे. माझ्या डोळ्यासमोर आत्ताच ती चित्रे तरळूही लागली .....

हे पाहा त्या कल्पना–चित्रातले काही नमुने.

### नगराध्यक्ष टेंगळे यांना 'पद्मश्री' द्या.

.... येथील नगरपालिकेची वार्षिक सर्वसाधारण सभा कालच भरली होती. या सभेत नेहमीप्रमाणे तहकुबीचे दोनचार ठराव येऊन त्याप्रमाणे ही सभा चहापानाच्या वेळी, मधल्या विश्रांतीच्या वेळी व शेवटी संध्याकाळ झाल्यामुळे–अशी तीन वेळा तहकूब करण्यात आली. मधल्या वेळात काही थोडे कामकाज झाले. या कामात 'फावल्या वेळचे कामकाज' या सदराखाली नगराध्यक्ष श्री. पोपटराव टेंगळे

यांना सरकारने 'पद्मश्री' पदवी द्यावी असा ठराव अध्यक्षांच्या अनुमतीने मांडण्यात आला आणि तो पास करण्यात आला. विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यांनी तत्पूर्वी सभात्याग केलेला असल्यामुळे ठराव एकमताने व टाळ्यांच्या गजरात संमत करण्यात आला.

सदरहू ठरावात म्हटले आहे की,

"ज्या अर्थी आपले सरकार दरवर्षी काही पदव्या लोकांना देते आणि ज्या अर्थी ही गोष्ट नियमितपणे चालू आहे त्या अर्थी सरकारला या पदव्यांसाठी योग्य माणसांची गरज आहे हे उघड आहे. आम्ही सरकारला या बाबतीत नगराध्यक्ष देशभक्त पोपटराव टेंगळे यांचे नाव सुचवू इच्छितो. टेंगळे यांची देशसेवा वादातीत आहे. नगराध्यक्ष म्हणून गेली बारा वर्षे ते गावचा कारभार पाहत आहेत. बारा वर्षे वनवास भोगावा लागल्यामुळे जनतेने उत्स्फूर्तपणे त्यांना रामाच्या पंक्तीला नेऊन बसवले आहे. या बारा वर्षांत त्यांनी जनतेची सेवा भयंकर केली. निरनिराळे कर वाढवून गावातील वि मता कमी केली. म्युनशीपालिटीच्या खजिन्यात आज एकही पैसा शिल्लक नाही. त्यावरून त्यांनी जनतेचे किती कल्याण केले आहे हे स्पष्ट होते. गावाची हवा थंड रहावी म्हणून त्यांनी अद्याप एकही रस्ता डांबरी न करण्याची खबरदारी घेतलेली आहे. लोकांना घरोघर नळ दिले आहेत. आता त्या नळांना पाणी यावे अशीही त्यांची खटपट चालू आहे. अशा थोर गृहस्थास 'पद्मश्री' ही पदवी दिल्याने त्यांच्या आजवरच्या देशसेवेचे चीज केल्यासारखे होईल. तरी सरकारने ही पदवी ताबडतोब पाठवून द्यावी. एकवीस दिवसांच्या आत वरीलप्रमाणे गोष्ट न केल्यास योग्य तो कायदेशीर इलाज करण्यात यावा....."

## मौजे भिकारगाव ग्रामपंचायतीचा ठराव

.....भिकारगाव ग्रामपंचायतीची तीन वर्षांनी काल सभा भरून तीत भिकारगावचे सरपंच दे. भ. अण्णासाहेब ढमाले यांना सरकारने 'रत्न' पदवी द्यावी असा ठराव घाईघाईने संमत करण्यात आला. हे 'रत्न' कसले अशी काही सभासदांनी पृच्छा केली. पण त्या आधीचा शब्द नेमका आठवत नसल्यामुळे तूर्त नुसताच 'रत्न' हा शब्द असावा असे ठरले. सरपंच श्री. अण्णासाहेब ढमाले या प्रसंगी म्हणाले, "सर्व जनतेनं मला याच्या आधीच 'रत्न' पदवी दिलेली आहे. तेव्हा सरकारच्या पदवीची मला काय जरूर आहे ? पण सरकारला 'रत्न' माणसांचा तुटवडाच पडला असेल तर कर्तव्यभावनेने मी ही पदवी स्वीकारायला तयार आहे. त्यासाठी वेळप्रसंगी कोणतेही कष्ट भोगायची मी तयारी दाखवतो..." अण्णासाहेबांच्या या भाषणानंतर हा ठराव पास करण्यात आला.


हा ठराव मांडताना एक पंच शिद्रामप्पा मांजरमारे म्हणाले,

..."आम्ही कॉंग्रेसचे असूनसुद्धा आमच्या जिल्ह्यावर अन्याय चालू आहे. आमचा तालुका मागासलेला आहे. त्यातून आमचे भिकारगाव फारच मागासलेले

आहे. आमचा विकास व्हावा म्हणून आम्ही एकसारखे ठराव करीत आहोत. पण आमचा विकास करायला कुणीच तयार नाही. हा अन्याय यापुढे आम्ही चालू देणार नाही. अण्णासाहेबांचाही विकास व्हावा असे सरकारला वाटत असेल तर त्यांना ही पदवी देणं जरूर आहे. म्हणजे ते मागासलेले आहेत असा याचा अर्थ नाही. पण सरकारने त्यांना 'रत्न' पदवी देण्यात सरकारचाच फायदा आहे. निवडणुकीत हमखास निवडून यायचे असेल तर अण्णासाहेबांची मदत घेतल्या-शिवाय या पंचक्रोशीत कुणाला पाय ठेवता येत नाही. मागे एक विरोधी पक्षाचा उमेदवार त्यांच्या परवानगीशिवाय हिंडला तेव्हा अण्णासाहेबांनी त्याचा पायच मोडला. याच्या उलट काँग्रेसच्या उमेदवारात त्यांनी एकूण मतदारांच्या संख्येपेक्षा जास्त मतं या भागातून मिळवून दिली. अशा माणसाला तुम्ही 'रत्न' म्हणणार नाही तर कुणाला म्हणणार? बऱ्याबोलाने सरकारने ही पदवी दिली तर ठीक. नाहीतर आम्हाला या प्रकरणी श्रीरामपूरच्या खंडकऱ्यांप्रमाणे सत्याग्रह करावा लागेल, हा इषारा देऊन ठेवतो. पाथर्डीच्या देशभक्ताप्रमाणे आम्हाला असेंब्लीत पत्रकं टाकावी लागतील याचाही विचार सरकारने करावा. अण्णासाहेब हे 'रत्न' पदवीला का लायक नाहीत ते सरकारनं जाहीर करावं असं माझं आव्हान आहे, सरकारनं यात वेळीच लक्ष न घातल्यास हे प्रकरण कोर्टात जाईल एवढेच आज मी सांगू इच्छितो......"

**कान्ट्रॅक्टर दारूवाला यांना 'ठेकाभूषण'**

"......काल रोजी येथील कान्ट्रॅक्टर्स लोकांची सभा होऊन येथील प्रसिद्ध ठेकेदार दोराबजी दारूवाला यांना सरकारनं 'ठेकाभूषण' ही पदवी द्यावी असा ठराव करण्यात आला. या ठरावात पुढील महत्त्वाच्या शर्ती आहेत, असे विश्वसनीयरीत्या कळते.



भारतीय संगीत वाद्यांचे
प्रमख निर्यातदार

**हरिभाऊ विश्वनाथ कं.**

सर्व प्रकारची वाद्ये बनविणार

**दादर मुंबई – २८**

१. सरकारने (कोणतेही सरकार चालेल.) दारूवालासाहेबांना 'ठेकाभूषण' ही पदवी द्यावी. त्यासाठी वाटल्यास सीलबंद टेंडरे मागवण्यात यावीत.

२. हे टेंडर पास झाल्यास वाटल्यास दारूवालासाहेब सरकारला कमिशन देतील.

३. ही पदवी दारूवालासाहेबांनी पाच वर्षे वापरण्याचे परमिट् त्यांना मिळावे. पाच वर्षांनंतर निवडणुकीच्या वेळी ही पदवी परत करण्यात यावी. नंतर पुन्हा नवे टेंडर मागवण्यात यावे. टेंडर न मागवता आपल्या अधिकाराचा गैरवापर करून सरकारने कोणास परभारे पदवी दिल्यास त्याचा परिणाम बरा होणार नाही....... "

## काणेगुरुजींना 'शिक्षा-पंडित' पदवी !

येथील खोकडगल्लीतील प्राथमिक शाळेतील मुलांची एक सभा नुकतीच भरून या शाळेतील जुने मास्तर श्री. रा. रा. काणेगुरुजी यांना 'शिक्षा-पंडित' ही पदवी सरकारने दिलीच पाहिजे अशी आग्रहाची मागणी करण्यात आली.

श्री. काणेगुरुजी या शाळेत गेली पस्तीस वर्षे खुर्चीवर बसून आहेत. त्यांच्या हातचा मार खाल्ला नाही असा एक माणूस गावात आढळणार नाही. मुलांना कोठे, केव्हा, कसे आणि किती चोपावे या कलेत काणेगुरुजी निष्णात आहेत. त्यांचे नुसते नाव उच्चारल्याबरोबर लहान मुले झोपेतदेखील दचकतात. शिक्षा करावी तर त्यांनीच. अशी शिक्षा दुसरे गुरुजी करू शकणार नाहीत. आतापर्यंत हजारो पोरे त्यांनी चोपून काढली असल्यामुळे एक प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांचा लौकिक सर्व महाराष्ट्रात पसरला आहे. मुले कोणकोणत्या उपायांनी बदडता येतील या विषयावर पेपर वाचण्यासाठी त्यांना यूनेस्कोचे आमंत्रण आले आहे. त्याप्रमाणे ते लवकरच यूनेस्कोच्या परिसंवादाला जाणार आहेत. बरोबर काही मुले नेऊन काही प्रात्यक्षिकेहि दाखविण्याचा त्यांचा इरादा आहे असे समजते.

'शिक्षा-पंडित' ही पदवी देण्यास काणेगुरुजी हे अगदी शंभर टक्के लायक आहेत. इतकी योग्य मागणी यापूर्वी कोणीही केली नसल्याचे गावातील वृद्ध लोक बोलत आहेत.......

## कवि चामुंडाग्रज यांना 'कविराय' करा

......येथील सर्व कवींची तांतडीची बैठक होऊन येथील जागतिक कीर्तीचे प्रसिद्ध कवी श्री. चामुंडाग्रज यांना सरकारने 'कविराय' ही पदवी देणे कसे जरूर आहे या विषयावर गंभीर चर्चा झाली.

या चर्चेचा उपन्यास करताना येथील दुसरे एक कवी बाताराम म्हणाले, कवी चामुंडाग्रज आणि मी एकाच गल्लीत राहतो. किमान दहा तरी कविता केल्याशिवाय ते कधीही आंघोळीस उठत नाहीत. त्यामुळे काही वेळा चार चार दिवस ते आंघोळीवाचून राहिलेले आहेत. ही त्यांची निष्ठा अपूर्व आहे. या त्यांच्या खडतर व्रतामुळेच त्यांनी 'भावगीतार्णव' या नावाचा एक लाख कवितांचा संग्रह

छापण्याची जाहीर प्रतिज्ञा केली आहे. त्यात ते यशस्वी होतील यात मला मुळीच शंका वाटत नाही. 'कविराय' ही पदवी मिळाल्यास ते या ग्रंथाचा दुसरा खंडही प्रसिद्ध करतील अशी माझी खात्री आहे."

कवी म्हाळसासुत आपल्या भाषणात म्हणाले, "पदवीसाठी सरकारला आपणच नावे सुचवण्याची वेळ आलेली आहे. कारण सरकारजवळ पुरेसे मनुष्य-बळ नाही हे होय. आजचा काळ लोकशाहीचा आहे. सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. काही ठराविक लोकांनाच सरकारकडून पदव्या मिळतात. बाकीचे तसेच राहतात. हा धडधडीत अन्याय आहे. पदव्या या सर्वांना मिळाव्यात. वाटल्यास त्यांची ठराविक मुदत असावी. त्या मुदतीनंतर त्याने पदवी परत करावी व नंतर दुसऱ्याने ती वापरावी. कवी चामुंडाग्रज यांच्यापासून या सुधारणेस सुरुवात करावी असा मी मद्दा मांडतो. त्यांच्यानंतर मला मिळाली तरी चालेल. पण घरटी एक रेशनकार्ड, त्याप्रमाणे गावात एक पदवी तरी आलीच पाहिजे."......

जाऊ द्या. वाचकहो, ही यादी लांबवून फायदा काय ? मामासाहेब मोहोळ यांचे आपण अभिनंदन करू या. सरकार देईल न देईल. पुणे जिल्हा परिषदेने तर आपले कर्तव्य केले ! परिषदेचेही अभिनंदन. शेवटी एकच सूचना. या जिल्हा परिषदेसही योग्य ती पदवी द्या. ○


## एक यक्षप्रश्न


आजच्या काळात लहान मुलावर धार्मिक आणि नैतिक संस्कार करावयाचे म्हणजे नेमके काय करावयाचे ? हा प्रश्न घरोघरी पालकांपुढे व शाळांतून शिक्षकांपुढे सतत उभा आहे. या प्रश्नाचे नेमके उत्तर म्हणजे--रोजच्या रोज सदाचाराचे चिंतन करावयाचे. त्याकरिता डॉ. ग. श्री. खैर यांची

**सदाचार चिंतनी, भाग १ (आ. २ री), रु. २.००**

**सदाचार चिंतनी, भाग २ रु. २.५०**

ही पुस्तके नियमितपणे वाचा. ही दोन्ही पुस्तके नैतिक शिक्षणाची क्रमिक पुस्तकेच आहेत. प्रत्येक पुस्तकात व्यवहारात आलेल्या अनुभवांवर चिंतन करून सुचलेले व सदाचाराला उपयोगी पडणारे सुमारे १०० विचार दिलेले आहेत. ही पुस्तके विशिष्ट क्रमानेच वाचली पाहिजेत असे नाही. कोठेही उघडा. नजर पडेल तेथून लक्षपूर्वक वाचा. तुम्हांला ती विचारप्रवण करतील. मुंज, विवाह, वाढदिवस अशा मंगलप्रसंगी भेट देण्यास योग्य.

**अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.**



# काळाचा प्रवाह

## झपाट्याने आमच्या उलटीकडे वेग घेतो आहे

### श्रीमती तारकेश्वरी सिन्हा

एकेकाळी अर्थखात्याच्या उपमंत्री. या उपमंत्री असताना मोरारजी देसाईच अर्थमंत्री होते. आजही तेच अर्थमंत्री आणि त्याहून विशेष म्हणजे उपपंतप्रधानही आहेत. म्हणून श्रीमती तारकेश्वरी यांचे ऋणमुक्ततेच्या शक्याशक्यतेबद्दलचे विचार जाणून घेणे महत्त्वाचे वाटल्याने त्यांची भेट घेतली.

भारत कर्जबाजारी होत चालला आहे याची त्यांना खूपच खंत वाटत होती. अब्जावधी रुपयांच्या कर्जाचा डोंगर डोक्यावर चढला असतानाही ऋणमुक्त होण्याची जिद्द देशात धुगधुगते आहे, तिचा धगधगता अग्नी व्हावा या पोटतिडकीने त्यांनी ऋणमुक्त होण्यासाठी माझ्यापुढे आठ उपाय मांडले.

**१. उपलब्ध साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करणे** हा मुद्दा स्पष्ट करताना त्या म्हणाल्या, ‘आपल्या योजना देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा अंगभूत पाया निर्माण करणाऱ्या असल्या पाहिजेत. आज होते काय, आपण योजना तयार करतो. पण त्या अंमलात आणायला उशीर लावतो. दरम्यान

# ६

# मुलाखती

मोरेश्वर तपस्वी

## एक

त्या योजनेसाठी आपल्या कमाईचा आणि कर्जाऊ घेतलेला अमाप पैसा खर्च करतो. मग मध्येच या योजना सोडून देतो. आपल्या कमाईचा पैसा वाया गेला म्हणजे आपले भांडवल घटते आणि परकी कर्ज वाया गेली की व्याज–मुद्दलासकट कर्जाचा डोंगर वाढत जातो. एकीकडे साधनसंपत्ती नाही म्हणून आपण ओरड करतो आ।ण दुसरीकडे उपलब्ध साधनसंपत्तीचा फक्त ६० ते ४० टक्केच भाग आपल्या योजनांसाठी वापरून परक्यांचे टेपण स्वतःवर ठेवून घेतो. ही ऋणमुक्ततेऐवजी ऋणमग्नतेची सुरुवातच आहे. याची दखल घेण्यात येत नाही. म्हणून आपली साधनसम्पत्ती अगदी जास्तीत जास्त प्रमाणावर वापरली पा।हजे.

२. **परकी– 'डणावळीचे साद्यंत तपशीली अंदाजपत्रक तयार करणे.** आज केंद्रीय अर्थसंकल्प हा जमेची आणि खर्चाची साकल्यान दखल घतो. आलेल्या व येणाऱ्या प्रत्येक पैशाचा हिशोब आणि खर्चाव्या लागणाऱ्या प्रत्येक पैचा अंदाज त्यात असतो.

याच पद्धतीने वर्षभराकरता देशात करावयाच्या कार्यासाठी लागणाऱ्या एकूण परकी हुंडणावळीचा साद्यंत तपशील आणि तिच्या खर्चाचा संपूर्ण आराखडा तयार केला पाहिजे. म्हणजे मग आपली परकी हुंडणावळीची गरज आणि प्राप्ती निश्चित होईल. तसे झाले म्हणजे तिच्या उपयोगाला व्यावहारिक मर्यादा पडतील. योजने-गणिक, प्रकल्पानसार परकी हुंडणावळीचे तोंड मोठा 'आ' वाशीत जाणार नाही.

**३. मोठ्या प्रमाणावर आयातीला फाटा देणे, निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे.** आज जो उठतो तो निर्यात वाढवा सांगतो. पण वास्तविकपणे पाहिल्यास निर्यात वाढवायला फारसा वाव उरलेला नाही. म्हणून आयातीला फाटा देणाऱ्या मालाचे उत्पादन वाढवले तरी आपले परकी चलन खूपच वाचवता येईल. जी जी गोष्ट आयात न करता या देशात तयार करता येत असेल ती ती योजना आखून येथेच तयार केली पाहिजे. सर्व अनावश्यक आयात थांबली पाहिजे. पोलाद गिरण्यांचा सर्व कच्चा माल आपल्या देशात आहे. तो दुसऱ्याच्या गरजा ओळखून आपण त्यांना निर्यात करावा. त्यातून आपल्याला परकी चलन मिळेल.

**४. जगातल्या प्रादेशिक बाजारपेठांचे सतत मूल्यमापन करणे व त्यासाठी जगभर आपल्या व्यापार प्रतिनिधींचे जाळे पसरणे.** ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. आपला कोणता कच्चा वा तयार माल अमुक ठिकाणी चांगला विकला जाऊ शकेल, कोणता माल कुठून आपल्याला किफायतीने मिळवता येईल, आपला कच्चा माल देऊन त्याच्या बदल्यात तयार माल घ्यायला कोणकोणते देश तयार आहेत, याचा सतत मागोवा घेत राहिले पाहिजे.

**५. शेतीच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होता आले नाही तरी आधी स्वावलंबी बनणे व त्यासाठी शेतकी–व्यवस्थापनाच्या जॉइंट स्टॉक कंपन्या स्थापन करणे.** ह्या जॉइंट स्टॉक कंपन्या शेतकी उत्पादनासाठी नकोत. शेतीचा माल कसा साठवावा, कुठे साठवावा, केव्हा बाजारात आणावा, ही जी शेतकीची व्यवस्थापन पद्धत आहे ती चालवण्यासाठी या कंपन्या स्थापन कराव्या. म्हणजे आपली शेती व शेतकरी खऱ्या अर्थाने स्वावलंबी होतील व रासायनिक खतांच्या वापरावर फाजील भर न देता देशात सहज तयार करता येणाऱ्या सेंद्रीय व रासायनिक दोन्ही खतांच्या वापराने ती स्वयंपूर्णही होईल. त्यातूनच आपली कर्जे पटापट देऊन टाकण्याची शक्ती आपल्या अर्थव्यवस्थेत निर्माण होईल.

**६. आपल्या देशात यंत्रे वा माल तयार करण्यासाठी विविध पेटंट्स घेण्यापेक्षा पेटंट्स बहुगुणित करणे.** याचा अर्थ असा–एक कारखाना उभारण्यासाठी आपण त्यात लागणारी यंत्रे पेटंट घेऊन तयार करतो. पण होते काय, ही पेटंट्स अनेक देशांतून आल्याने विविध प्रकारची असतात. पुन्हा आपल्याला नवीन यंत्र लागल्यास त्यासाठी नवे पेटंट शोधावे लागते. यापेक्षा एक पेटंट, डिझाईन जे लागेल ते आयात करावे आणि त्यापासून आपणास हवी तेवढी डिझाइन्स व पेटंट्स आपण शतगुणित

करून काढावीत. असे केल्याने आपण समृद्ध आणि स्वावलंबी होऊ व आपली कर्जे कमी होत होत अखेर समाप्त होतील. जपानने हेच केले आहे. एकदा एक यंत्र पाहिले, की त्याचा आराखडा काढून त्याबरहुकूम यंत्रे तयार करण्याचे कसब जपान्यांप्रमाणे आपल्याही कारागिरात आहे. त्यांना वाव दिला पाहिजे.

७. **खाजगी क्षेत्रातील कारखानदारीवरील कर कमी करणे व त्यांना कोणत्याही सवलती न देणे आणि सरकारी कारखानदारांना मुभा ठेवणे.** आज होते काय, खाजगी क्षेत्रातील कारखानदारीवर एकीकडे अधिक कर लादण्यात येतात आणि दुसरीकडे तिला खूप सवलतीही देण्यात येतात. यामुळे त्या सवलतीसाठी भ्रष्टाचार माजतो. उत्तेजनार्थ–खर्च ही एक भ्रष्टाचाराचीच बाब आहे. या खर्चामुळे उत्पादन खर्चात वाढ होते आणि परिणामी तयार माल तेवढ्या प्रमाणात महागतो. भरमसाट करांमुळेही किंमती वाढतात. यापेक्षा कारखानदारीवरील कर कमी करावे आणि त्यांना एकही सवलत देऊ नये, हे अर्थव्यवस्थेस गतिमान करण्यासाठी जास्त चांगले. तसेच, सरकारी क्षेत्रातील कारखानदारी अतिशय गलथान आहे. ती अतिशय कार्यक्षम करावी आणि मग ठरीव उद्दिष्ट गाठण्यासाठी उपाय योजण्याची या कारखानदारीला पूर्ण मुभा ठेवावी. त्यात मग उपऱ्यांची लुडबूड नको.

८. **कर्जाच्या परत फेडीसाठी परकी हुंडणावळ नसल्यास निदान रुपयांत तेवढी रक्कम रिझर्व्ह बँकेत जमा करणे.** हा उपाय ऋणमुक्ततेच्या दृष्टीने व आजच्या हलाखीचा विचार करता फार महत्त्वाचा. आपल्याला समजा, १० कोटी डॉलर्सचे कर्ज परत करायचे आहे. तेवढे डॉलर्स नाहीत, तर निदान ७५ कोटी रुपये आपल्या सावकाराच्या नावे आपल्या रिझर्व्ह बँकेत खाते काढून जमा करण्याचा शिरस्ता ठेवला पाहिजे. म्हणजे आपली पत राहील व कर्जाचा बोजा हळूहळू उतरत जाईल.

पण नंतर काहीशा सचिंत होत तारकेश्वरी मला म्हणाल्या, " पण खरं सांगू ? आज घडत असलेल्या घटना पाहिल्या, तर मी सुचवल्याप्रमाणे काहीही घडेल असे वाटत नाही ! कारण कोणालाही यामुळे देशावर कोणते संकट येत आहे याची कल्पनाच नाही ! काळाचा प्रवाह झपाट्याने आमच्या उलटीकडे वेग घेतो आहे. अशा वेळी हा सर्व गाडा वेळेवर सावरला नाही, तर सर्व परिस्थिती आपल्या आटोक्याबाहेर जाईल····आणि मग काय होईल, ते कुणालाही सांगता येणार नाही !!"

ते कुणालाही सांगता न येणारे म्हणजे 'क्रांती' तर नसेल ना, हा विचार माझ्या मनाला चाटून गेल्यावाचून राहिला नाही हे मात्र खरे.

या क्रांतीच्या भाषेशी विशेष जवळीक असणारे मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते श्री. पी. राममूर्ती यांना सविस्तर मुलाखतीस वेळ नव्हता. पण ते एकच वाक्य बोलून गेले, **" सर्व कर्ज परतफेडीवर १०–१५ वर्षांकरता बंदी घालणे, आणि त्या काळात अर्थव्यवस्था सावरणे असाच काहीतरी जालीम उपाय करावा लागेल."**

## दोन

# मध्यप्रदेशाने असा निश्चय केला आहे की....

# जनसंघाचा सात कलमी कार्यक्रम

भारतीय जनसंघाला आर्थिक ध्येयधोरण पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्रयत्नपूर्वक दिले होते. तेव्हा त्या पक्षाला परकी कर्जाच्या डोंगराबाबत काय म्हणायचे आहे तेही आजच्या परिस्थितीत उद्बोधक ठरण्याची शक्यता आहे. म्हणून खा. अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी विषय काढला. परंतु ते फार कामात असल्याने त्यांनी आर्थिक बाबतीत अभ्यास केलेले त्यांच्याच पक्षाचे एक तरुण खासदार श्री. सुंदरसिंह भंडारी यांच्याशी माझी रुजुवात करून दिली.

प्रथमतःच श्री. भंडारी म्हणाले 'ऋणमुक्ततेचा' पाया स्वावलंबनानेच घातला जाऊ शकतो. या स्वावलंबनाची क्षमता अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात निर्माण करणे हे पहिले काम आहे. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आपल्याजवळ नसेल तर ते किमान स्वरूपातच एक तर आपण आयात केले पाहिजे किंवा विकत घतले पाहिजे. तीच गोष्ट परकी सहकार्याने उभ्या करावयाच्या योजनाबाबतही लक्षात ठेवली पाहिजे. यासाठी त्यांनी सात कलमी योजना माझ्यापुढे मांडली. या योजनेला त्यांनी अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण असे नाव दिले.

१. आजचे औद्योगिक जगत इतके गुंतागुंतीच्या आणि सूक्ष्मतम यन्त्रयुगाच्या मागे लागले आहे की आज माणसांची जागा यन्त्रे घेऊ लागली आहेत. अशा वेळी मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढण्याचा धोका आहे. म्हणून, लघु उद्योगधंद्यांवर जास्तीत जास्त विसंबायला हवे आहे आणि मोठ्या औद्योगिक प्रकल्पांच्या गरजा आणि लघु उद्योगाचे उत्पादन यांची शास्त्रशुद्ध सांगड घालून राष्ट्रीय नियोजन आखले पाहिज.

२. आज सरकारी उद्योगधंद्यांत आणि कारखान्यांत तीन हजार कोटी रुपये गुंतवले आहेत. त्यावर जितके व्याज द्यावे लागते तेवढादेखील फायदा या कारखान्यांना होत नाही. यामुळ एवढी अफाट सम्पत्ती अडकून पडली आहे. तिच्यातून अर्थव्यवस्थला मजबुती आणणारे उत्पादन होत नसल्यामुळे चलन फुगवटा निर्माण होतो आहे

आणि विकास व वाढ व्यस्त प्रमाणात खुंटते आहे. एवढे भांडवल गुंतवूनसुद्धा अर्थ-व्यवस्थेला उठाव देणाऱ्या अन्य उद्योगांत पुन्हा गुंतवण्यासाठी आवश्यक तेवढी रक्कम आपल्या हाती येत नाही. यासाठी सरकारी कारखान्यांची घडण ही राष्ट्राच्या गरजांनुरूपच करायला हवी. या कारखान्यांतून चांगले काम काढता येईल. **त्यांचा उगाच विस्तार करीत न बसता, निर्माण केलेल्या क्षमतेचा पुरेपूर आणि अत्यंत कार्यकुशल व्यवस्थापनाने जास्त उपयोग करून घेण्यावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे.**

३. खासगी उद्योगधंद्यांतून अर्थव्यवस्थेसाठी भांडवल—साठवण उत्तम प्रकारे होत असते. त्यामुळे आर्थिक विकासही साधत असतोच. परंतु या खासगी क्षेत्राला ते निव्वळ खासगी आहे एवढ्याच खातर मोकळे रान देता कामा नये. या क्षेत्राला अनियंत्रित सोडून चालणार नाही. खासगी क्षेत्रातील सर्व देवघेवीचे नियमन करून समाजाच्या गरजा आणि आकांक्षा यांना पोषक ठरेल अशा स्वरूपातच या क्षेत्राला मुभा दिली पाहिजे.

४. लायसन्स देताना घातलेल्या नियंत्रणामुळे आज सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. तेव्हा लायसन्स देताना नियन्त्रणे घालायचीच असतील तर ती अगदी किमान घालावीत आणि ज्या उद्योगांना परकी चलनाची आवश्यकताच नसेल त्यांना लायसन्स घेण्याची आवश्यकता नसावी. ज्यांना तशी थोडीफार गरज असेल त्यांनादेखील लायसन्स देण्यासाठी एक मुदत घालून देण्यात यावी म्हणजे त्या मुदतीत लायसन्स द्यावाच लागणार असल्याने भ्रष्टाचाराला बराच आळा बसू शकेल.

५. आज परदेशातून घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येणेदेखील कठिण झाले आहे. आपल्या योजना वाढतातच आहे. त्यांच्या कर्जावरचे साधे व्याजही वाढते आहे आणि या कर्जावर तर चक्रवाढीने व्याज घेतले जाते. त्यामुळे कर्जाचा डोंगर वाढतोच आहे. यासाठी परकी कर्जातील पै न् पै ची काळजी घेतली पाहिजे. तो पैका वाया जाणार नाही, आणि वापरताना अशा प्रकारे वापरला जाईल की त्यातून कर्जाच्या परतफेडीसाठी आवश्यक तेवढी तरी प्राप्ती किमानपक्षी हाती येईल याची खबरदारी घेणे अगत्याचे. तसे व्हायला लागले की कर्जे आपोआप वितळायला लागतील, कमी व्हायला लागतील.

६. सरकारा—सरकारात होणारी कर्जाची देवघेव एरव्ही चांगली असली तरी त्या कर्जाची रक्कम नेहमीच सरकारी कारखान्यात लावली जाते आणि त्या कारखान्यातून फरगुंतवणीसाठी आवश्यक लाभ हाती येत नसल्यामुळे ही सारी गुंतवणूक ही अर्थव्यवस्थेवरील प्रेताच्या ओझ्यासारखी ठरते. यासाठी परकी सहकार्य त्यांचे ४९ आपले ५१ या भाग-तत्त्वावर मिळत असेल तर घ्यायला हरकत नाही. परंतु हे सहकार्य फक्त शेअर्सच्याच स्वरूपात यावे आणि तेही जेथे अगदी अनिवार्यच असेल तेथेच. इतर सर्व क्षेत्रांत स्वावलंबनाचा मंत्रच आपल्याला तारील.

७. पोकळ शब्दांनी भव्य वाटणाऱ्या योजनांच्या मागे लागण्यापेक्षा मध्य प्रदेशात

केला तो प्रयोग सर्व देशात व्हावा. शेतीच्या स्वावलंबनाखेरीज अर्थव्यवस्था जोम धरायची नाही आणि तिने जोम धरल्याशिवाय देश ऋणमुक्त व्हायचा नाही. म्हणून मध्यप्रदेशाने असा निश्चय केला आहे की प्रत्येक शेताला शेतीसाठी लागणारे पाणी पोचते करतील अशा लहान लहान योजना हाती घ्यायच्या. मोठमोठ्या योजनांपायी अब्जावधी रुपये घालवण्यापेक्षा पाटबंधाऱ्यांच्या लहान लहान योजनांना जास्त महत्त्व दिले पाहिज.

## तीन

# ही काही स्वावलंबी होण्याची लक्षणे नव्हेत

माजी नियोजन–मंडळ सदस्य आणि माजी पोलाद मंत्री श्री. त्रिभुवन नारायण सिंग यांची भेट घेतली असता ते म्हणाले–

कोणताही देश पूर्णार्थाने स्वयंपूर्ण होऊच शकत नाही. आज विश्वसंबंधांची घडणच अशी आहे की प्रत्येक देश हा दुसऱ्याशी अन्योन्याश्रित राहणारच. मात्र स्वयंपूर्ण होता आले नाही तर स्वावलंबी नक्कीच होता येईल आणि तेच आपल्याला साधायचे आहे. यासाठी आपण दोन क्षेत्रांचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे–शेतकी आणि औद्योगिक. या दोन क्षेत्रांत आपण जर स्वावलंबी होऊ शकलो तर मग आपल्याला ऋणमुक्त व्हायलाही वेळ लागायचा नाही.

शेतकीच्या क्षेत्रापुरते प्रथम पाहू. या क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट आपले तंत्रज्ञ, इंजीनियर्स कोणाचीही मदत न घेता तयार करू शकताहेत. कालवे, पाटबंधारे, धरणे, नलिका–कूप सर्व आपण देशातल्या देशात आपल्याच माणसांकरवी करू शकत आहोत. राहिला प्रश्न खतांचा. तर आज देशात रासायनिक खते तयार करण्याची क्षमता २० लाख टनांची आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र जेमतेम पाच लाख टन खतेच तयार होतात. स्वावलंबनाची क्षमता आली आहे कारण यंदा भरपूर पीकपाणी होऊनही आमच्या शेतकऱ्याने जेमतेम निम्मेच खत वापरले. अशा परिस्थितीत उगाच खतकारखान्यांची वाढ करण्यासाठी अवाच्या सवा अटींवर आम्ही परकी हितांना आपल्या येथे मोकळे रान देताहोत. सरकारची नेहमीच ही चूक होत आली आहे. गरजेपेक्षा कागदोपत्रीची गरज भलतीच फुगवून सांगण्यात येते आणि ती भागवण्यासाठी आधीच ठरलेल्या

लोकांना लायसन्स देण्यात येतात. लायसन्स मिळवू इच्छिणाऱ्यांचा प्रचार-गोट (लॉबी) इतका चतुर आणि वस्ताद आहे की त्यांचे हात खुद्द नियोजन-मंडळात पोचलेले असतात. तेथूनच खताच्या आवश्यकतांचे मोजमाप पद्धतशीरपणे फुगवले जाते आणि ते भागवण्यासाठी लायसन्स दिले जातात. वास्तविकता लक्षात घेण्यास कोणी तयार नाही. जो तो बुद्धयाच सांगून शेतकीच्या गरजा फुगवतो आहे आणि आणि त्यातूनच देशावर येणाऱ्या कर्जाचा बोजाही फुगतो आहे.

औद्योगिक क्षेत्राचा विचार केला तर आम्ही आज पुष्कळशा गोष्टी करू शकण्याच्या स्थितीत आहोत. ॲलॉय स्टील, स्टील, यासारखे महत्त्वाचे धातू आपण आज तयार करू शकत आहोत. कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रांचे कारखानेही आपल्याकडे होऊ लागले आहेत. हिंदुस्थान मशीन टूल्स आणि रांची येथील कारखान्यातील यंत्रांची ख्याती वाढत आहे. काही खासगी कारखान्यातूनही उत्तम प्रतीची यंत्रे तयार होऊ लागली आहेत आणि किर्लोस्कर कारखान्याचे नाव, टाटा, पिलानी वगैरे नावे मशहूर होत चालली आहेत. कारखानदारीची वाढ करायची असेल तर यंत्रोत्पादन हा तिचा पाया आधी मक्कम केला पाहिजे. यासाठी नवी यंत्रे आयात न करता आपण त्यांचे नकाशे, आराखडे परदेशातून विकत घ्यावेत आणि आपल्या तंत्रज्ञांना त्याबरहुकूम यंत्रे तयार करायला सांगावे हेच दूरदर्शीपणाचे होणार आहे.

परकी मदत मिळते आणि आपण घेत सुटतो असा प्रकार गेली वीस वर्षे चालला आहे. या मदतीबरोबरच देशाचे कर्ज वाढत असते. परिणामी हा सौदा महाग पडतो. अमुक एका मुदतीनंतर आम्ही मदत घेणार नाही या म्हणण्यात अर्थच नाही. **मी तर म्हणेन सर्व परदेशांनी जर भारताला कवडीही न देण्याचा निर्णय घेतला तर आपल्या दृष्टीने ते फार चांगले होईल.** निदान त्या लाचारीतून तरी आपण आपल्या पायावर उभे राहायला शिकू. चीनचे उदाहरण पाहा. रशियन तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ चीन सोडून जाताच चीनची खरी प्रगती झाली. परिस्थितीने अशी बळजबरी लादल्याशिवाय राष्ट्र उफाळून उठत नसते. रशियन तंत्रज्ञ गेल्यानंतर काही दिवस चीनमध्ये एक प्रकारचा गोंधळ माजला. पण त्यातूनच हायड्रोजन बॉंब तयार करू शकण्याइतकी ताकद चीनमध्ये आली. छोट्या इस्रायलचेही तसेच झाले. आपल्या घरातच पाहा. एक आई मुलगा पाच वर्षांचा होईपर्यंत त्याला बोट धरून चालवीत असते. आईने बोट सोडले तर ते मूल लगेच रडते आणि खाली बसते. पण तेच दुसऱ्या एखाद्या गरीब बाईच्या पोराचे पाहा. त्याला बोट धरून चालवीत बसायला तिला वेळ नसतो. ते मूल स्वतःच्या पायावर लौकर उभे राहते. लौकर चालायला आणि धावायलाही लागते. देशाचेही तसेच आहे. स्वतःवर विसंबल्याने स्वावलंबन वाढते, दुसऱ्यावर विसंबल्याने परावलंबनाशिवाय काहीही वाढत नसते.


१९७० पर्यंत स्वावलंबी होऊ अशा अंदाजाने पावले टाकीत टाकीत आज

(पृष्ठ १०२ वर चालू)



पिकल्या केसांचे पण घराची वाट हरवलेल्या मुलासारखे.....

हाही एक प्रकारे ऋणविमोचनाचाच कार्यक्रम झाला म्हणायला हरकत नाही. नाही नाही म्हणता कॉलेजच्या सभागारात पाच–सातशे डोकी जमली. पार प्रथम वर्षाच्या कॉलेजकुमार–कुमारींपासून दर्दी टीकाकारांपर्यंत आणि साक्षेपी संपादकांपर्यंत सारे तिथे होते. मराठी येणारे होते आणि न येणारेही होते. कवी होते, काव्यरसिक होते, नुसतेच बघ्ये होते, पत्रकार होते, प्राध्यापक तर होतेच. वक्त्यात दोन प्राचार्य होते. एक स्वतःला ' व्यावसायिक नट ' असे आवर्जून म्हणून घेणारा महाराष्ट्राचा लाडका पद्मश्री होता. नव्हते कोण, विचारा. एखादा मंत्रीच काय तो नव्हता. पण तो नव्हता हे एक प्रकारे संयोजकांचे उपकार वाटले. मंत्र्यांहून निश्चयाने श्रेष्ठ अशा एका ज्येष्ठ, तपस्वी कवीचा सत्कार. त्यासाठी मराठी साहित्यातले छोटेमोठे मानकरी आणि पायिक जमलेले. त्यात आणखी तो, कोणताही विषय राजकारणाला नेऊन भिडवणारा अतिनम्र, आढ्यताखोर, तेच तेच विनोद करून स्वतःच हसणारा पायघोळ प्राणी कशाला ?



रातराणी

# दोन ऑगस्ट दुपारी चार

विजय तेंडुलकर

एलफिन्स्टन कॉलेजात गेल्या दोन ऑगस्टला प्राचार्य पु. शि. रेगे यांचा सत्कार झाला त्याविषयी मी लिहितो आहे. हा सत्कार वस्तुतः प्राचार्य रेगे वर्ध्याच्या आगामी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले आहेत म्हणून असल्याचे सांगण्यात आले होते, परंतु योगायोगाने तो दिवस रेग्यांचा वाढदिवसही होता. आणि कॉलेजातील त्यांच्या निवृत्तीची कुजबूजही या समारंभाच्याच वेळी आवारात ऐकू येत होती. वेळेआधी चांगले पंधरा वीस मिनिटे सभागार गजबजले होते. प्रसिद्ध अप्रसिद्ध चेहरे एकामागून एक उगवत होते.

प्रथम व्यासपीठावर चढल्या 'नाऊ टु बिझिनेस' असेच जणू चेहऱ्याने एकसारख्या दटावीत आहेत असे वाटणाऱ्या एल्फिन्स्टन कॉलेजच्या गोऱ्यागोऱ्या चष्मेवाल्या प्राध्यापिका वूडबाई आणि त्यांच्याबरोबर एक स्नेहार्द्र श्यामल चेहऱ्याच्या हसऱ्या बाई. कुणी तरी म्हणाले, मिसेस रेगे. मागाहून टाळ्यांच्या दणदणीत गजरात पु. ल. देशपांडे व्यासपीठ चढून गेले. एक तर सेंच्युऱ्या मारणारा नाहीतर 'डक्' मध्ये जाणारा बॅट्समन

मैदानात जाऊन हजर होतो आणि अंपायरकडे रुबाबात 'क्रीज' मागतो तसे पु. ल. दे. यांचे एकंदर युयुत्सू अवसान होते. त्यांच्या मागून प्राचार्य मे. पु. रेगे ओलीसुकीसाठी हजर व्हावे तसे संघाच्या जबाबदार कप्तानासारखे व्यासपीठावर पोचले. किंचित्काळात प्रा. सरोजिनी वैद्य दुसऱ्या बाजूने चटचट पायऱ्या चढून वर आल्या. आणि पाठोपाठच स्टँपिंग आणि टाळ्यांच्या गजरात पुढे प्राचार्य गंगाधर गाडगीळ आणि मागोमाग प्राचार्य पु. शि. रेगे व्यासपीठावर हजर झाले.

व्यासपीठावरील शोभा श्रोते जरा कुठे पहात आहेत तो वूडबाईंनी उठून दूरध्वनिक्षेपकावरून कार्यक्रमाची इंग्रजी प्रस्तावना केली. 'नाऊ टू बिझिनेस' हाच त्यांचा सूर होता. प्रथम हारतुरे झाले. ते इतके की त्यामागे पुरु. शिव. रेगे अदृश्यच झाले. मग खास विनंतीवरून हारतुरे हलविण्यात आले. काही विद्यार्थी नंतर पाळीपाळीने येऊन रेग्यांच्या मूळ मराठी आणि इंग्रजीत भाषांतरित झालेल्या कविता आणि एक गोष्ट वाचून गेले. कविता आठ–दहा सेकंदात संपत होत्याच पण गोष्ट सुद्धा वीस पंचवीस सेकंदात संपली ! नशीब, रेग्यांच्या कथालेखनातून पंथ वगैरे उद्‌भवला नाही. एरवी दिवाळी अंकांच्या मोसमात संपादकांची पंचाईत झाली असती. गोष्टींपेक्षा जाहिरातीच लांबीला जास्त भरल्या असत्या.

पहिले वक्ते उठले प्रा. गंगाधर गाडगीळ. नव्या मराठी कथेचे प्रवर्तक अशी त्यांची एक ओळख करून देण्यात आली होती. ती न देण्यात येती तरी प्रा. गाडगीळ कशाचे ना कशाचे तरी प्रवर्तक त्यांच्या उंची आणि कडक सुटावरून वाटलेच असते. मराठीत बोलायचे की इंग्रजीत असा एक मूलभूत प्रश्न त्यांनी आरंभीच सोडवून घेतला. मग ते मराठीतून प्राचार्य रेगे यांच्या कवितेवर बोलले. त्या आधी प्राचार्य रेगे यांच्या शरीरावर ते बोलले. मग प्राचार्य रेगे यांचे शरीर आणि त्यांची कविता यांची सांगड घालून प्राचार्य रेगे यांच्या कवितेच्या शरीरावर ते बोलले. मधून मधून चष्म्याआत बोट खुपसून एक डोळा बारीक करणाऱ्या साक्षेपी प्रा. गाडगीळांच्या व्यासंगाचा प्रत्यय, रेग्यांची कविता न वाचलेल्यांना देखील, गाडगीळांच्या शब्दाशब्दांतून येत होता. उदाहरणे न देता ते विलक्षण सफाईने विधाने करीत होते. प्रा. रेगे यांच्या कवितेविषयी त्यांचा ग्रह फारच चांगला आहे एवढे सर्वांना समजले. ते म्हणाले, कवितेऐवजी तोच आशय गद्यात अधिक चांगला मांडता आला असता असे अनेक कविता वाचून आपल्याला वाटते. केवळ आळसामुळेच अनेक कविता केल्या जातात असा ग्रह होतो. पण रेग्यांची कविता ही फक्त कविताच असू शकते, हेच तिचे अनन्यसाधारण सामर्थ्य होय. या कवितेचे 'शरीर' ठसठशीत आणि शब्द मंतरलेला असतो. रेग्यांप्रमाणे या कवितेचे 'डोके' 'शरीरा'शी एकजीव झालेले दिसते. रेग्यांच्या कवितेच्या शरीराच्या गोष्टी करता करता गाडगीळ चष्म्याआत बोट सरकवून एक डोळा बारीक करीत हातासरशी रेग्यांच्या कथा कादंबऱ्यांवर आणि टीकावाङ्मयावरसुद्धा विहंगमावलोकन म्हणतात तसे फिरून आले.

गाडगीळांपाठोपाठ श्रीमती वूड यांच्या 'नाउ टू बिझिनेस' पद्धतीच्या नव्या घोषणेनुसार श्रीमती सरोजिनी वैद्य रेग्यांच्या 'सावित्री' या कादंबरीवर बोलण्यासाठी उभ्या राहिल्या. सरोजिनीबाईंना एकाच कादंबरीवर बोलायचे होते. शिवाय त्या चष्मा लावीत नव्हत्या. त्यामुळे त्यांनी विहंगमावलोकन किंवा सर्वसाधारण विधानांचा व्याप न घालता सरळ 'सावित्री' या कादंबरीचे अत्यंत मुद्देसूद विवेचन केले. हे विवेचन मुद्देसूद असूनही आक्रमक किंवा ठाशीव नव्हते. एकशे चार की पाच पृष्ठांच्या 'सावित्री' कादंबरीचा नाजूक जीव कुठे न गलबलेल आणि दुखावेल अशा काळजीने सरोजिनीबाईंनी आपले हे विवेचन आणि मूल्यमापन केले. त्या म्हणाल्या की प्रथमत: ही कादंबरी सावित्री आणि अनामिक असा 'तो' यांची आहे. परंतु ती एक स्त्री आणि एक पुरुष यांचीही आहे. आणि याशिवाय आणखी एक प्रचिती ही वाचताना जाणवते ती, प्रकृती आणि पुरुष यांच्यातल्या चिरंतन द्वंद्वाचे चित्रण रेग्यांना अभिप्रेत असावे अशी. यासाठी पुरावे देतानाही पलीकडे बसलेल्या 'सावित्री'च्या कर्त्याचे भान ठेवून 'हे रेग्यांना अभिप्रेत आहे की नाही ते ठाऊक नाही. कदाचित् नसेलही—पण जाणवते' अशी कलाकृतीची आणि तिच्या कर्त्याची आदब त्या फार सहजतेने राखीत होत्या. रेग्यांच्या कवितेप्रमाणे त्यांची ही कादंबरीदेखील व्यापाने छोटी तितकीच आशयाने मोठी आहे असे नमूद करून 'रणांगण'नंतर मराठी कादंबरीने गाठलेला प्रगतीचा दुसरा महत्त्वाचा पल्ला हे या कादंबरीचे त्यांना पटलेले मोल त्यांनी खुल्लम-खुल्ला आणि थंडपणे सांगून टाकले. विरळ विरळ एकशे चार नाहीतर पाच पानांची 'सावित्री' ही कादंबरी वगैरे नसून फार तर एक दीर्घकथा आहे—किंवा ती तितकीही नसून 'नव' आणि हुषार टीकाकारमंडळींनी माजवलेले ते एक 'बंड' आहे असे मानणाऱ्या, पुढील रांगांतल्या काही ज्येष्ठ श्रोत्यांनी या सरशी छताकडे नाहीतर व्यासपीठावरल्या पु. ल. देशपांड्यांकडे असहाय्य नजरा लावल्या. पण पु. ल. दे. या वेळी वक्त्यांमागून वाकड्या नजरेने श्रोते न्याहाळीत छताइतकेच निर्विकार बसलेले दिसले. त्यांनी लगेच डोळे मिटून आत्मचिंतन आणि 'बोला झाले काय बोलता ते' या दरम्यानची एक पोज घेतली.

यानंतर प्राचार्य मे. पुं. रेगे यांना वूडबाईंनी उठवले. त्यांनी, आपल्याला रेग्यांच्या टीकावाङ्मयावर बोलण्याला सांगण्यात आले आहे अशी भावी आपत्तीची भयसूचक कल्पना देणारी प्रस्तावना गंभीर स्वरात करून समस्त रेगे हे कसे भले जीव असतात आणि त्यांना बायका कशा सुगरण मिळतात, पु. शि. ना लोक आद्याक्षरांवरून कसे आपले तीर्थरूप समजतात त्याचे विवेचन आरंभले. हा खेळकरपणा आहे हे कळण्याला सर्वांनाच जरा वेळ लागला. आणि हे लक्षात येऊन मंडळी दिलखुलास हसू लागतात तो मे. पुं. नी सर्वांना टीकावाङ्मयाच्या गहन गंभीर डोहात ओढून त्यांची आस्ते आस्ते दमछाक करण्याला सुरुवात केली. अक्षरश: श्रोत्यांच्या नाकातोंडात मे. पुं

# JEBIVAK

## HIGH VACUUM PUMPS

*For*

## INDUSTRIES AND LABORATORIES

- *Renowned for Quality*
- *Largest Sales in India*
- *Best After-Sale Service*

*Manufactured by :*

**J. B. Savant Engineering Pvt. Ltd.**

Udyog Nagar, S. V. Road,
Goregaon (West), Bombay 62

Phone : 692407
Gram ; Jebivak-Bombay 62

चे टीका-विवेचन जाऊ लागले आणि प्राण कंठाशी आले. स्वतः हे ' रेगे द सेकंड ' या उद्योगात घामाघूम होऊ लागले. सभागृहाच्या पुढील एकचतुर्थांश भागानंतरचा कॉलेज-विद्यार्थ्यांचा चळबुळता श्रोतृसमुदाय आता प्रथमच ' जाणवू ' लागला. अलीकडच्या पलीकडच्या रांगांतून आणि खुर्च्यांतून ठसके, खोकले, दबल्या जांभया यांची लाट उसळू लागली. दरम्यान मे. पुं. दोहो हातांनी हवेचे वेगवेगळे आकार वळीत, भारतीय संस्कृती, सौंदर्यशास्त्र, रेग्यांची ( म्हणजे पु. शि. ) सौंदर्य कल्पना, त्यांची टीका आणि इतर टीका यातील फरक ( उदा. इतरांच्या साहित्या-वर त्यांनी कधी लेखन केले नाही, ते स्वतःच्याच साहित्यामागील मूलप्रवृत्तींचा शोध घेतात; ) अशी मजल दरमजल करीत आपल्या धीम्या गतीने चाललेच होते. त्यांच्या विवेचनात पुष्कळच तळमळ होती आणि तथ्यांश बहुधा असावा पण तो जाणवण्याजोगी परिस्थिती नव्हती. प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असतेच; तशी या भाषणाचीही मर्यादा अखेर केव्हातरी आली आणि मे. पुं. आनंददर्शक टाळयांच्या प्रदीर्घ गजरात एकदाचे खाली बसले. असे वाटले की शक्य असते तर त्यांनीही टाळया वाजवल्या असत्या ! सौ. पु. शि. त्यांच्याशी लगेच सस्मित काही बोलल्या. ते स्मित कुणालाही दिलासा देणारे होते; त्यावरून, बहुधा रेग्यांच्या धैर्याचे त्यांनी कौतुक केले असावे. आसपास तेवढयात कोणी म्हणाले की या बाईंची ऋजूता काही विलक्षण आहे. स्वतः मे. पुं. देखील भाषणाच्या गंभीरपणे खेळकर आरंभात असे म्हणाले होते की पु. शि. चे काव्य वाचण्याऐवजी अनेक मराठी साहित्यिक आणि साहित्यभक्त ते ऐकण्यासाठी त्यांच्या घरी वारंवार का जातात त्याचे महत्त्वाचे कारण आपल्याला सौ. रेग्यांच्या सुगरणपणात आणि प्रत्येकाला काहीतरी चांगले-चुंगले करून वाढण्याच्या त्यांच्या हौसेत आढळून आले आहे.

' नाऊ टू बिझिनेस ' वूडबाईंनी नवी घोषणा केली; यानंतर, ज्यांच्यासाठी तुम्ही सारे उत्सुक आहात, हे आम्हांला ठाऊक आहे आणि इथून फ्लोरा फाउंटन-पर्यंत लोकांची रांग या समारंभाला लागेल या भीतीने ज्यांचे नाव आम्ही शक्य तितके गुप्त ठेवले ते पु. ल. देशपांडे पु. शि. रेगे यांच्या कवितांचे वाचन करतील.

टाळयाच टाळया. मे. पुं. ना भाषण संपवताना मिळाल्या त्या टाळया वेगळ्या आणि या वेगळ्या. पहिला दोन हातांनी सोडलेला निःश्वास तर दुसरी साऱ्या शरीराने व्यक्त केलेली उतावीळ. पु. ल. दे. हातातली वही सावरीत उभे राहिले. टाळयांचा त्यांनी किंचित झुकून आपणच ते पु. शि. रेगे असल्याप्रमाणे स्वीकार केला. मग आधीच्या विद्वान आणि व्यासंगी वक्त्यांच्या भाषणांचा केवळ उल्लेख करून सलामीचा हशा पिकविला. हशा वसूल करण्यासाठी समोरच्या माणसाला नेहमीच काही करावे लागते असे नाही, आधीची माणसे त्यासाठी बरेच काही अनवधानाने करून गेलेली असतात हेच खरे.

एका पुरुषोत्तमाच्या कविता, दुसरा पुरुषोत्तम त्या वाचणारा. बहुसंख्य श्रोत्यांच्या

लेखी गहन असे काव्य आणि विनोदी म्हणून गाजणारे व्यक्तिमत्त्व या काव्याचे माध्यम म्हणून समोर उभे. दोहोंचे काय होणार याचा अंदाज बांधता येत नव्हता. एक सामान्य, नम्र, साधाबगडा पण हळवा वाचक आणि 'व्यावसायिक नट' ही भूमिका घेऊन, त्या भूमिकेद्वारे या अतितलम, एखाद्या कोड्याप्रमाणे क्रमशः उलगडत जाणाऱ्या आणि अनेकदा, उलगडूनही न उलगडल्याप्रमाणे राहणाऱ्या अंतर्मुख कवितेची खेळकर प्रस्तावना पु. लं. नी केली. जाता जाता आजच्या कवितेला आणि कवींना, तसेच टीकाकारांना कोपरखळ्या मारल्या, आणि पु. शि. रेगे यांच्या आकाराने अगदी छोट्या पण आशयाने ओसंडणाऱ्या आपल्याला आवडलेल्या कवितांपासून आरंभ केला. यातले 'आपल्याला आवडलेल्या' हे कलम अखेरपर्यंत महत्त्वाचे राहिले. 'आपल्याला आवडल्याप्रमाणे' असेही एक कलम अद्याहृत राहिले. कारण रेग्यांची आशयाचे थरांमागून थर सुचविणारी गहिरी, सूचक कविता पु. ल. दे. यांनी अभिनयांकित आणि पुष्कळशी 'दृश्य' केली. शब्दांच्या अन्वर्थक उच्चारांना मुद्रेच्या साजेशा विभ्रमांची आणि अनेकदा आंगिक अभिनयाचीही जोड त्यांनी दिली. एक सामान्य वाचक आणि व्यावसायिक नट ही नम्र भूमिका त्यांनी अखेरपर्यंत शब्दांनी सोडली नाही पण हळूहळू रेग्यांच्या शब्दांतला नर्म उपरोध, भावुक इरसालपणा, आशयाच्या अनेक छटांचा निसुटतेपणा, गूढ कळले—नकळलेपण, बरीचशी अव्यक्तपणेच व्यक्त होणारी उत्कटता हे सारे गळून पडू लागले आणि ठसठशीत शब्दांतली एकच एक काव्यात्म आकृती समोर उभी राहू लागली. ही आकृती अनेक प्रकारच्या दडपणांखाली दबून गेलेल्या तरीही अनावरपणे उसळत्या अशा एका भावड्या, चतुर, टारगट, बोलघेवड्या, काव्यात्म, लोभस व्यक्तिमत्त्वाची होती. मध्येच रेग्यांच्या एका जुन्या कवितेचे साधे सरळ पण सुरेल गायनदेखील पु. ल. दे. नी केले. शेवटी शेवटी, आपल्याला आवडलेल्या रेग्यांच्या दोन दीर्घ कविता भरपूर अभिनयानिशी मुक्तपणे म्हणून सारे सभागार त्यांनी कबजात घेतले. हशांवर हशे उसळत राहिले. टाळ्याच टाळ्या पडत राहिल्या. रेग्यांच्या कविता इतक्या टाळ्याबिळ्या घेऊ शकतील आणि निखळ हास्यकारक ठरतील हे कोणाच्या कल्पनेतसुद्धा त्यापूर्वी आले नसेल ! असे वाटून गेले की, असे कार्यक्रम पु. ल. दे. नी आणखी केले तर रेगे हे एक चक्क लोकप्रिय कवी होतील !

पु. ल. दे. खाली बसले. जे ऐकले त्याहीपेक्षा जे दिसले त्याने श्रोते तृप्त झाले होते. संध्याकाळ सार्थकी लागली होती.

गंमत म्हणजे आता काही क्षण, यानंतर काही बाकी म्हणून राहिले असे कुणाला वाटलेच नाही. पण राहिले होतेच—पु. शि. रेगे.


मग लक्षात आले की पु. लं. च्या काव्यवाचनाच्या फार वेधक कार्यक्रमातून साकार झाली होती ती लोभस आणि उसळत्या रक्ताची बोलघेवडी आकृती दुसऱ्या तिसऱ्या कुणाची नव्हती, ती होती पु. ल. देशपांडे यांचीच.

कारण दूरध्वनिक्षेपकासमोर आले ते पिकल्या केसांचे पण घराची वाट हरवलेल्या मुलासारखे पोरके वाटणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे होते पु. शि. रेगे. आपल्या कवितेसारखे हे व्यक्तिमत्त्व पुष्कळसे अव्यक्तपण व्यक्त होऊ पाहणारे होते. उच्चारित शब्दाचे त्याला बरेचसे वावडेच होते. शब्द म्हणज भावनेचे एकांतातील अपरिहार्य अर्धेच स्वगत प्रकटीकरण–उरलेले अर्धे अप्रकटच राहते आणि राहावे असे मानणारे ते व्यक्तिमत्त्व. कमालीचे खोल, अंतर्मुख, गर्दीत पोरके आणि एकांतात बहरणारे• पु. शि. रेग्यांनी एकाच वाक्यात आपली कृतज्ञता व्यक्त केली. श्रोत्यांना हे कमी वाटेल या जाणीवेने आपली एक कविता वाचली. अगदी न वाचू पाहत वाचली. हे कवितावाचन मात्र पु. शि. रेगे यांचेच होते. शब्द पल्लेदारपणे सभागारभर फेकले जाण्याऐवजी उच्चारताच जणू गर्दीला बुजून पुन्हा आत वळत होते. नाटचाचा, अभिनयाचा अंशही नव्हता. गर्दीने भरलेल्या त्या सभागारात हे काव्य अगदी अगदी एकटे वाटत होते. त्याच्या आतबाहेर भरले होते केवळ अनेकानेक चिरंतन, चिरनूतन, सुंदर, धुंद, गहिऱ्या, अबोध, उदास, रित्या–दाटत्या, पाझरत्या–कोसळत्या भावभावनांचे चित्तथरारक निःस्तब्ध कल्लोळ. दूरध्वनीक्षेपकासमोरचे जड, स्थूल, वयोवृद्ध शरीर या असल्या विलक्षण काव्याने जणू आपल्यात क्षणकाल संपूर्णपणे विरघळवून घेतले आणि पुढल्या क्षणी कविताच संपली. नंतरच्या टाळचात आणि कोलाहलात हा चुटपुटता प्रत्यय रेग्यांनी वाचलेल्या कवितांबरोबरच कुठच्या कुठे हरवला.

राहून गेले ते पु. ल. देशपांडे; आणि सौ. सरोजिनी वैद्य याचे खूप संवेदनाक्षम तरीही अलिप्त, घोटपणे समीक्षणात्मक तरीही मूळ कलाकृतीची आदब राखणारे, शांत, संथ, एखाद्या कलाकृतीइतकेच उत्स्फूर्त आणि बांधेसूद असे ओघवते वक्तृत्व.

हे सारे ज्या प्रतिभेच्या चरणी खुषीने, हौसेने, परिश्रमपूर्वक आणि उत्साहाने समर्पण झाले ती प्रतिभा म्हणजे पुरु. शिव. रेगे. एवढे म्हटले तरी, मराठी काव्यात मर्ढेकरांबरोबरीने युगप्रवर्तन करून पुन्हा युगप्रवर्तनाच्या आवेगांपासून वा श्रेयापासून सतत लांब व अलिप्त राहून आपली कविता आपल्याच व्यक्तिमत्त्वाच्या भव्य, खोल, एकांतात अप्रतिहतपणे जपणाऱ्या–जोपासणाऱ्या या तपस्वी कवीची महत्ता जाणवते.

काही वेळा लोकप्रिय न होणेसुद्धा फारफार कठीण असते ! ○



## दार—शब्दकोशासाठी

बाहेर जाताना दार लावावे.
आत आल्यावर दार ओढून घ्यावे.

दारात उभे राहू नये—उगाच;
पण दारापर्यंत पोचवायला जावे.
दारातून टा–टा करावे.

दाराला फट असावी—दुसऱ्यांच्या;
कारण मग त्यांना आपले डोळे असतात—
आपल्या भिंतींना जसे दुसऱ्यांचे कान असतात.

दारावरून जावे, टाळण्यासाठी आणि टेहळण्यासाठीही.

दार फोडतात ते डाकू असतात,
किंवा बंबवाले,
किंवा आतून पुष्कळ वेळ उत्तर येत नाही म्हणून
आपले जागरूक शेजारी.

दार लावतात ते भित्रे,
उघडतात ते आपले मित्र,
उघडून देतात ते फितूर.

दार धाडकन बंद करून बाहेर ठेवतात,
ते आपले मालक;

क्वचित् सिनेमातील प्रेयस्या—
आपल्या सुसज्ज खोलीच्या दाराआड
पलंगावर अंग टाकून
मुक्तपणे रडायला अवसर मिळावा म्हणून.

(आजूबाजूच्या उशा या वेळी खूप मऊ असाव्यात.
सिनेमातील, गोष्टीतील.)

दाराच्या बाबतीत
ठोठावा म्हणजे उघडेल
असे नेहमी दडपून सांगत राहावे—
कोणत्याही विवक्षित दाराचा विशेष उल्लेख न करता.

दारावर टिचकी मारावी, टक् टक् करावे.
वेळ, प्रसंग आणि मूड यांचे भान ठेवून.
(दारही चुकू नये, आपल्या स्वास्थ्यासाठी.)

दारापाशी धरणे धरावे—
वेळ असल्यास,
आपला फोटो छापून येत असल्यास.

दाराशी तिष्ठत राहावे, वरिष्ठांच्या, मंत्र्यांच्या.
त्यांच्या शिपायांशी ओळख करावी, त्यांना बसू द्यावे.
कारण ते उठण्याची शक्यता नसते.

घर–दार सोडावे, सोडू नये;
परंतु काहीही एक करताना,
या वदललेल्या दाराची व्युत्पत्ती नीट लक्षात ठेवावी.
हे नेहमी पुल्लिंगी अनेकवचनी असते—
संस्कृतात बायकोची रास्त भीती लक्षात घेऊन
घराला जोडलेले.

दाराला कड्या असाव्यात, अडसर असावेत,
कुलपे असावीत,
किल्ली विसरण्याची शक्यता नसल्यास
अंगचे आधुनिक लॉकही असावे.

दार उघडे टाकू नये;
टाकावेही,
कारण एखादा मेगॅस्थेनिस त्यावर मग लिहितोही.
दार नीट लावावे–रात्री, असल्यास.

—पुरुषोत्तम शिवराम रेगे. 'दुसरा पक्षी'

# पारतंत्र्याचा नवा आविष्कार...




१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास राजकीय स्वातंत्र्य मिळाले आणि दीडशे वर्षांच्या पारतंत्र्यात आर्थिकदृष्ट्या मागास राहिलेल्या भारताने राजकीय स्वातंत्र्याबरोबर नियोजनात्मक आर्थिक विकासाची घोषणा केली. १ एप्रिल १९५१ रोजी भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरवात झाली.

आर्थिक विकासास आवश्यक ती यंत्रसामुग्री आणि इतर माल जो देशात तयार होत नाही तो परदेशातून आणण्याकरता परदेशी चलन लागते. आपला माल निर्यात करून परदेशी चलन मिळते. परंतु त्यातील पुष्कळसे चलन नित्य लागणारी आयात करण्यातच खर्च होते. त्यातून उरले तरच आर्थिक विकासास लावावयाचे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस आपल्याला निर्यातीतून मिळणारे परदेशी चलन नित्याच्या आयातीतच खर्च होत होते. सुमारे ६५० कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात आणि ६५० कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात अशी परिस्थिती होती. सुदैवाने त्या वेळी आपणाजवळ सुमारे ९०० कोटी रुपयांचे परदेशी चलन शिल्लक होते. आर्थिक विकासास आवश्यक म्हणून आपण या गंगाजळीतून खर्चास सुरुवात केली. गंगाजळीतून पहिल्या पंचवार्षिक योजनेत सुमारे १२५ कोटी रुपयांचे आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सुमारे ६०० कोटी रुपयांचे परदेशी चलन आपण उचलले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी गंगाजळी एवढी घटली होती की तिसऱ्या पंचवार्षिक योजनेकरता त्यातून आणखी उचल करण्याची मुळीच सोय नव्हती.

आपल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमास गंगाजळीतील परदेशी चलन पुरे पडणार नाही हे पाहून आपण प्रथमपासूनच जागतिक बँकेकडून परदेशी चलनाची कर्जे काढण्यास सुरुवात केली. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात जागतिक बँकेने आणि तिच्याशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळाने आपणास सुमारे ७४१ कोटी रुपये किंमतीच्या परदेशी चलनाची एकूण ३४ कर्जे दिली. यातील बहुतेक कर्जे १५ ते २० वर्षे मुदतीची असून ४ ते ५ टक्के व्याजाची आहेत. कर्जे

स्वतंत्र जनता आणि परतंत्र सरकार
असा ह्या पारतंत्र्याचा नवा अविष्कार आहे.

# डॉ. वि. म. दांडेकर

देणाऱ्या संस्था आंतरराष्ट्रीय असल्याने या कर्जांचा उपयोग करून त्या संस्थांचे समासद असलेल्या कोणत्याही देशातून हवा तो माल आपणास आणता येतो. या काळात मंजूर कर्जांपैकी प्रत्यक्ष सुमारे ५८१ कोटी रुपये किंमतीच्या परदेशी चलनाची उचल आपण केली आहे.

परंतु एवढ्यानेही न भागल्याने आपण अनेक देशांकडे आर्थिक साहाय्याची विनंती केली. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतासारख्या अविकसित देशात नव्याने, नव्या ढंगाने चंचुप्रवेश करण्याची संधी पाश्चात्य प्रगत राष्ट्रे पाहतच होती. त्यांनी भारतास विविध रीतींनी साहाय्य देऊ केले. अविकसित देशांना प्रगत देशांनी आर्थिक साहाय्य देण्याचा परिचित प्रकार म्हणजे परदेशी चलन देणगी म्हणून किंवा कर्जाऊ देणे. अशा वेळी दान अथवा कर्ज देणारा देश साहजिक अशी अट घालतो की त्याने उपलब्ध करून दिलेल्या परकीय चलनाचा उपयोग करून अप्रगत देशाने त्याचाच माल घ्यावा. ही इच्छा अथवा अट साहजिकच म्हणण्याचे कारण इतकेच की या सर्व व्यवहाराला आर्थिक साहाय्य असे शिष्टसंमत नामाभिधान असले तरी वास्तविक आंतरराष्ट्रीय व्यापारव्यवहाराचाच तो एक भाग आहे असे मानणे अधिक उचित होईल. असे मानणे किंवा निदान उघड म्हणणे म्हणजे कृतज्ञतेच्या अभावाचे लक्षण आहे असे पुष्कळ सज्जनांना वाटते. परंतु त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय व्यवहारांचे वास्तविक स्वरूप समजणे अवघड जाते एवढेच.

साहजिकच आपणास मिळालेली आर्थिक मदत सुरवाती सुरुवातीस पुष्कळशी देणगी स्वरूपात होती. पुढे पुढे ती अधिकाधिक कर्जाऊ होऊ लागली. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपणास एकूण सुमारे ४०० कोटी रुपयांचे परकीय चलन देणगीदाखल मिळाले. त्यात अमेरिकेकडून सुमारे १६८ कोटी रुपयांच्या, कॅनडाकडून सुमारे १७६ कोटी रुपयांच्या आणि ऑस्ट्रेलियाकडून सुमारे २५ कोटी रुपयांच्या अशा प्रमुख देणग्या होत्या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या निधीतून सुमारे ८·५ कोटी रुपयांची देणगी मिळाली. बाकीच्या देणग्या आठ राष्ट्रांकडून प्रत्येकी एक ते

पाच कोटी रुपये किमतीच्या परकीय चलनाच्या होत्या.

आंतरराष्ट्रीय व्यवहारात अशा देणग्यांचा राजकीय व व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याकरता चांगला उपयोग होतो. अर्थातच अशा देणग्या एक देश दुसऱ्या देशास केवळ व्यापारी दृष्टीने फार काळ देऊ शकत नाही. आवश्यक ते व्यापारी संबंध प्रस्थापित झाले म्हणजे आर्थिक मदतीचे स्वरूप कर्जाऊ होते. कोणताही कारखानदार, दुकानदार हेच करतो. बाजारात मालाला उठाव नसला म्हणजे दुकानदार माल उधार, हप्तेबंदीने देऊ करतो. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात सतरा देशांनी सुमारे २८३४ कोटी रुपये किमतीचो अशातऱ्हेची व्यापारी कर्जे आपणास दिली आहेत. त्यापैकी अमेरिकेने सुमारे ९९१ कोटी, रशियाने सुमारे ४८४ कोटी, पश्चिम जर्मनीने सुमारे ४४७ कोटी, इंग्लंडने सुमारे ३६५ कोटी, जपानने सुमारे १६५ कोटी रुपये किमतीची कर्जे दिली आहेत. या सर्व कर्जांचा उपयोग आपणास त्या त्या देशांतून लागेल तो माल खरेदी करण्याकरताच करता येतो. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपण प्रत्यक्ष सुमारे १९१० कोटी रुपयांचे कर्ज उचलले आहे. त्यापैकी ३१६ कोटी रुपयांची कर्जे कम्युनिस्ट राष्ट्रे म्हणजे रशिया' झेकोस्लोव्हाकिया, पोलंड आणि युगोस्लाव्हिया यांजकडून घेतलेली आहेत. बाकीची १५९४ कोटी रुपयांची कर्जे मांडवलवादी राष्ट्रांकडून घेतलेली आहेत. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडून उचललेली ५८१ कोटी रुपयांची कर्जे यात मिळविली म्हणजे तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपण सुमारे २५०० कोटी रुपये किमतीची परदेशी कर्जे घेतली आहेत असे दिसते. खेरीज ७००–७५० कोटी रुपयांची गंगाजळी संपविली ती वेगळीच.


## आयात – निर्यातीतील तफावत

परदेशी चलनात घेतलेली ही बहुतेक सर्व कर्जे परदेशी चलनातच सव्याज परत करावयाची आहेत. अशा परतफेडीला आवश्यक ते परदेशी चलन आपली निर्यात जेव्हा आपल्या आयातीपेक्षा जास्त होईल तेव्हाच मिळू शकेल. कम्युनिस्ट राष्ट्रांकडून घेतलेली कर्जे त्या त्या देशांना हवा असलेला तेवढ्या किमतीचा माल त्यांना देऊन परत करावी लागतात. म्हणजे पुन: निर्यातीचाच प्रश्न आला. परंतु आयातीपेक्षा आपली निर्यात जास्त होण्याचा संभव नजीकच्या भविष्यकाळात तरी दिसत नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस आपली निर्यात सुमारे ६५० कोटी रुपयांची होती हे सांगितलेच आहे. १९६०–६१ साली म्हणजे दहा वर्षांनी दोन पंचवार्षिक योजनांच्या शेवटी, ती तेवढीच राहिली, मुळीच वाढली नाही. उलट आयात मात्र ६५० कोटी रुपयांवरून ११०० कोटी रुपयांवर गेली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात निर्यात सुमारे १५० कोटी रुपयांनी वाढून ८०० कोटी रुपयांपर्यंत गेली, परंतु त्याचबरोबर याच काळात आयातही जवळ जवळ २५० कोटी

रुपयांनी वाढून १३०० कोटी रुपयांवर गेली. म्हणजे निर्यात आयातीपेक्षा अधिक होण्याचे दूरच राहो, आयातनिर्यातीतील तफावत सतत वाढतच गेली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत म्हणजे १९६४–६५, आणि १९६५–६६ या साली आपली निर्यात आयातीपेक्षा सुमारे ५७५ कोटी आणि ५५० कोटी रुपयांनी अधिक होती. १९६६ साली रुपयाचे अवमूल्यन झाल्याने आयातनिर्यातीतील ही तफावत आणखी वाढली. १९६६–६७ साली ती ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक होती.

दरम्यान कर्जफेडीचे हप्ते सुरू झाले आहेत. सध्या सुमारे २० कोटी डॉलर मुद्दली आणि १५ कोटी डॉलर व्याजापायी असे ३५ कोटी डॉलरचे वार्षिक हप्ते आपणास भरावे लागतात. हे हप्ते यापुढे काही वर्षे वाढतच जाणार. हे हप्ते भरण्यास आवश्यक ते परदेशी चलन आपणाजवळ नाही. म्हणून अब्रू झाकण्याकरता नवीन कर्जे काढून जुनी कर्जे फेडणे आपण सुरू केले आहे. पण हे फार काळ जमणार नाही. आता नवीन कर्जही मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे यंदा जागतिक बँक, इंग्लंड, कॅनडा, जपान, पश्चिम जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया यांचे सुमारे १० कोटी डॉलरचे हप्ते आपण देऊ शकलो नाही. या सावकारांनी कृपाळू होऊन किंवा नाइलाजाने काही कर्जांत सूट दिली आहे. काही कर्जांची मुदत वाढवून दिली आहे. बाकी सर्व कर्जांबाबतही अशीच याचना आपण सर्व सावकारांकडे सुरू केली आहे.

अशा लाचार वागण्याने अब्रू उघडी पड़ायची ती पडतेच. शिवाय नाना तऱ्हेच्या राजकीय दडपणांना आपण असहाय्यपणे बळी पडतो. यापेक्षा अधिक स्वाभिमानाचा आणि स्वनिष्ठेचा मार्ग स्वीकारावयास हवा. ही सारी कर्जे व्यापारी हिशेबाने दिलेली आणि घेतलेली आहेत. या कर्जांबाबत आपले व्यापारी हिशेब चुकले आहेत हे उघड आहे. देणाऱ्याचेही हिशेब चुकले आहेत असे स्पष्ट सांगून मोकळ होणे हाच आता राजमार्ग आहे. आम्ही सर्व कर्जे सव्याज परत करू, पराकाष्ठा करून ठरलेल्या हप्तेबंदीने फेडू, परंतु हप्ता चुकला तर नाइलाज आहे, तगादा लावून उपयोग होणार नाही, असे स्पष्ट सांगून टाकणेच आपल्या राष्ट्रीय हिताचे आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात काही काळ आपली पत राहणार नाही. आपणास कोणी नवीन कर्जे देणार नाही एवढेच. परंतु त्याचबरोबर आपली निर्यात वाढली नाही तर आपण कर्जे फेडू शकत नाही हे सर्वांस कळत असल्याने, ज्याला आपली कर्जफेड हवी असेल तो देश आपला माल विकत घ्यायला तयार होईल. आज आपली निर्यात न वाढण्याचे एक प्रमुख कारण असे आहे की आपला चांगला मालही प्रगत राष्ट्रे विकत घेण्यास तयार नाहीत, कारण कर्जवसुलीपेक्षा भारतावरील कर्जाचा बोजा वाढवून त्यावर शक्य तेवढे राजनैतिक वर्चस्व प्रस्थापित करणे हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. कर्जाबाबतचे आपले हिशेब चुकले आहेत. तेव्हा देणाऱ्यांचेही चुकविले पाहिजेत. आता त्यांनी नाही म्हणण्यापूर्वीच आपण नवीन



आपणास खाण्यास कोण देईल ?

कर्ज काढणे एकदम बंद करावे, निर्यातीतून मिळेल त्या परदेशी चलनातून कर्जाचे हप्ते देऊन बाकी राहील त्यातून होईल तेवढीच आयात करावी. आज होणारी पुष्कळशी आयात देशातील उत्पादनास मारक ठरत आहे. ती बंद झाली की आज खुंटलेले, मंदावलेले आर्थिक जीवन नव्या जोमाने, नव्या निष्ठेने पुढे सरकेल. या राष्ट्राची स्वनिष्ठा आणि पुरुषार्थ अजूनही जागृत आहे. परंतु वीस वर्षे जनतेपासून हळू हळू दुरावत गेलेले लोकनेते आज जनतेस कोणतेच आवाहन करू शकत नाहीत. उलट जनतेशी प्रतारणा करून राष्ट्राची अब्रू जगाच्या बाजारात मांडीत आहेत.

परंतु काही झाले तरी परदेशी चलनात परत करावयाच्या या व्यापारी कर्जापायी सावकार सहजगत्या घरात शिरत नाही. तो सहसा बाहेरच उभा राहतो. पण आपण एवढ्यावरच थांबलो नाही. सुरुवातीपासूनच आपल्या आर्थिक विकासाकरता म्हणून आपण काही अन्य प्रकारचेही आर्थिक साहाय्य स्वीकारले. त्याचे स्वरूप निव्वळ व्यापारी वा आर्थिक नव्हते तर राजकीय आणि सांस्कृतिक होते. या साहाय्याचे निमित्ताने परकीयांचा घरात दिवसा ढवळ्या थेट प्रवेश झाला आहे आणि या घराचा खरा मालक कोण, घर निर्वेध आहे की गहाण आहे असा प्रश्न घरातील आणि घराबाहेरील माणसे विचारू लागली आहेत. अशा प्रकारची मदत मुख्यतः अमेरिकेकडून मिळालेली आहे. त्या मदतीचे स्वरूप स्पष्ट समजण्यासाठी तिची सुरुवात कशी झाली आणि राष्ट्राच्या आर्थिक जीवनात ती कसकशी रुजत गेली ते समजावून घेणे जरूर आहे.

अमेरिकेकडून आपणास होत असलेल्या आर्थिक साहाय्याची सुरुवात आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीसच झाली. युद्धकाळात सुरू झालेला आपला

अन्नधान्याचा प्रश्न स्वातंत्र्यानंतरही चालूच राहिला होता. युद्धकाळात आपत्काल म्हणून सुरू केलेले नियंत्रित शिधावाटप चालू ठेवावे की नाही याबाबत सरकारचे धोरण धरसोडीचे झाले. शेवटी १९५१ साली, पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीसच अन्नधान्य परिस्थिती बिकट झाली. म्हणजे नियंत्रित दरात शिधावाटपाची जी जबाबदारी सरकारने पत्करली होती ती पुरी करण्यास आवश्यक तेवढे धान्य नियंत्रित दरांत शेतकऱ्यांकडून वसूल करणे सरकारला अशक्य झाले. परदेशातून धान्य आणावे तर त्याकरता लागणाऱ्या परदेशी चलनाची चणचण होती. त्याकरिता गंगाजळीतून आणखी पैसे काढणे योग्य वाटेना. जागतिक बँकही धान्य आयातीकरता कर्ज देण्याचा संभव नव्हता. अशा परिस्थितीत भारत सरकारने अमेरिकेकडे अमेरिकन गहू उधारीने देण्याची विनंती केली. अमेरिकेने ही विनंती मान्य करून जून १९५१ मध्ये भारताला सुमारे १९ कोटी डॉलर (सुमारे ९० कोटी रुपये) किमतीचा २० लक्ष टन गहू उधार दिला. त्याची परतफेड डॉलरमध्ये करावयाची होती. त्यावर अडीच टक्के व्याज होते. परतफेड जून १९५७ पासून अठरा सहामाही हप्त्याने व्हावयाची होती. अमेरिकेने भारतास दिलेले हे पहिले डॉलर कर्ज.

भारतानेही एखाद्या परराष्ट्राकडून काढलेले हे पहिलेच कर्ज. जागतिक बँकेकडून काढलेल्या कर्जात आणि या कर्जात असलेला फरक समजावून घेतला पाहिजे. शेतकरी सहकारी सोसायटीतून कर्ज काढतो आणि खाजगी सावकाराकडून काढतो त्यात जो फरक आहे तोच हा फरक आहे. आपण बँकेतून तारण ठेवून कर्ज काढतो ते कर्ज आणि वाण्याची उधारी ठेवतो यात जो फरक आहे तोच हा फरक आहे. खेरीज ज्या परिस्थितीत वा ज्या पद्धतीने भारताने या कर्जाकरता याचना केली तीही लक्षात ठेवली पाहिजे. शेतकरी विहिरीकरता, पंपाकरता, ट्रॅक्टरकरता कर्ज मागतो तसे हे कर्ज नव्हते. तर शेतकरी खावटीकरता धान्य मागून आणतो तसे हे कर्ज होते. आपण घराकरता, कारखान्याकरता कर्ज काढतो तसे हे कर्ज नव्हते, तर आज रेशन आणण्याला पैसा नाही म्हणून सावकाराकडे जातो तसे हे कर्ज होते. या कर्जाने आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ झाला.

फार दिवस पिंजऱ्यात बसून खाणारा पोपट त्याचा मालक एखादे दिवशी पिंजऱ्याचे दार उघडे टाकून निघून गेला तर आज आपणास खाण्यास कोण देईल या विवंचनेत पिंजऱ्यातच बसून राहतो असे म्हणतात. काहीसा तसाच हा प्रकार आहे हे अमेरिकन राजनीतिचतुरांनी ताडले असल्यास नवल नाही. शिवाय फार दिवस धन्याबरोबर राहून या पोपटाला अस्खलित इंग्रजी बोलता येत होते. पिंजऱ्यात बसल्या बसल्या आधुनिक राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, आणि आर्थिक विकासाचे सिद्धांत तो येणाऱ्या-जाणाऱ्याला घडाघडा म्हणून दाखवीत असे. त्यामुळे अमेरिकेला त्याचेशी संभाषण सुरू करणे अवघड पडले नाही.

# शास्त्रार्थ नवा, मतितार्थ जुना

या संभाषणाची भाषा नवी असली, त्यातील शास्त्रार्थ आधुनिक असला तरी मतितार्थ जुना होता, प्राचीन होता. तो असा की ज्या घरात वाण्याची उधारी होते, ज्या घरातील गृहलक्ष्मीचे दागिने सावकाराकडे गहाण पडतात, पण जे घर कायदेशीररीत्या निर्वेध आहे त्या घरात परक्याचा चंचुप्रवेश आणि यथावकाश मुसलप्रवेश शक्य असतो आणि असा प्रवेश करणे उधारी थकलेल्या वाण्यास अथवा सावकारास सर्वात सुलभ असते. वाणी घरमालकास म्हणतो, "आपली उधारी फार झाली आहे. आपला जुना स्नेह म्हणून आम्ही मानीत नाही. आपले मालकीचे घर आहे. पैसे कोठे जात नाहीत. परंतु आपला स्नेह म्हणून सांगतो की थोडे आमच्या सल्ल्याने घ्याल तर दोघांनाही सोईचें होईल. मुलाला दुकानात धाडा. आमच्या दुकानात बसेल. धंद्याची माहिती होईल. एखाद्या रात्रीच्या शाळेत घालू आणि हायस्कूल पुरते करून घेऊ. फीची काळजी करू नका." सावकार म्हणतो, "वहिनींचे दागिने गहाण घेऊन तिजोरीत ठेवणे आम्हास बरे वाटत नाही. आता दिवाळी आली. त्यांच्या अंगावर दागिना नाही. दागिने परत घेऊन जा. त्यांना सांगा भावाने दिले म्हणून, चार दिवस सणासुदीला घाला आणि गहाळ होऊ नयेत म्हणून परत आणून ठेवा. वहिनींना सांगा दागिने तुमचेच आहेत. लागतील त्या दिवशी घेऊन जात जा. त्या सुखी तर आम्ही सुखी. पैसे कोठे जात नाहीत." परकीयांच्या चंचुप्रवेशाचे हे पुरातन मार्ग आहेत. आपण त्याला अपवाद ठरण्याचा संभव नव्हता.

जानेवारी १९५२ मध्ये म्हणजे कर्जाऊ गहू दिल्यानंतर केवळ सहा महिन्यातच अमेरिकेने भारताशी तांत्रिक सहकार्याचा करार केला. त्या अन्वये अमेरिकेने भारताच्या विकास योजनेकरता लागणारे तांत्रिक आणि आर्थिक तज्ज्ञ व सल्लागार अमेरिकेतून पुरवावेत आणि भारतीय शिकाऊ उमेदवार तंत्रज्ञांना अमेरिकेत उच्चशिक्षण देण्याची व्यवस्था करावी, त्याकरिता अमेरिकेत करावयाचा खर्च अमेरिकेने करावा आणि भारतात होणारा खर्च भारताने करावा असे ठरले. हा कार्यक्रम आजतागायत चालू आहे. या कार्यक्रमाकरता तीन पंचवार्षिक योजनांच्या पंधरा वर्षांत अमेरिकेने सुमारे १४७ कोटी रुपये किंमतीचे डॉलर देणगीदाखल दिले. अमेरिकेने भारताला एकूण १६८ कोटी रुपयांचे डॉलर देणगी दिल्याचा उल्लेख केला आहे. त्यापैकीच हे १४७ कोटी आहेत. (बाकीचे २१ कोटी रुपयांचे डॉलर फोर्ड फौंडेशनने दिले आहेत.) या सहकार्याकरता भारताने किती कोटी रुपये खर्च केले त्याचा एकंदर आकडा उपलब्ध नाही. परंतु तो बराच मोठा असण्याचा संभव आहे. या सहकाराची निष्पत्ती म्हणून या पंधरा वर्षात १२७१ अमेरिकन तज्ज्ञ व सल्लागार भारतात घेऊन गेले आणि ४५४२ भारतीय शिकाऊ उमेदवार तज्ज्ञ अमेरिकेत जाऊन आले. अमेरिकन आहे तेव्हा तो तज्ज्ञ असणारच या भाव-

नेने आम्ही १२७१ अमेरिकन तज्ज्ञांचे स्वागत केले. त्यांना प्रधानमंत्र्यापर्यंत सर्व रस्ते मोकळे होते. सर्व कागदपत्र त्यांना उपलब्ध होते. भारतात त्यांच्या आवती-भवती काम करणारी माणसे साहेबाची ओळख झाली, मेहेरबानी झाली तर आपल्याला अमेरिकेत जाता येईल या आशेने आपली सर्व कामे बाजूस ठेवून साहेबाच्या मागे मागे हिंडत होती. त्यापैकी ४५४२ लोकांची वर्णी लागली. हे त्यांच्या आयुष्यातील अपूर्व यश म्हणून आम्ही त्यांचे अभिनंदन केले आणि सत्कारपूर्वक बोईंग ७०७ विमानाने त्यांची अमेरिकेस रवानगी केली. जे अमेरिकन तज्ज्ञ आले त्यांची अमेरिकेतील लायकी काय, त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा भारताला लाभ होण्याचा संभव काय याची आम्ही केव्हाच चौकशी केली नाही. आम्ही ज्यांना अमेरिकेस पाठविले ते तेथे काय शिकले, ते परत आल्यानंतर त्याचा काय उपयोग करीत आहेत याचीही आम्ही कधी विचारपूस केली नाही. अमेरिकेला जाऊन येणे हीच आयुष्याची इतिकर्तव्यता मानल्याने तेथून परत आल्यानंतर ते येथे काय करीत आहेत हे विचारण्याचे कारणच नव्हते.

१९५२ साली केलेल्या तांत्रिक सहकार्याच्या करारात आणखी दोन महत्त्वाच्या तरतुदी होत्या. तांत्रिक सहकार्याच्या कार्यक्रमाकरता लागणारे पुष्कळसे साहित्य अमेरिकेने अमेरिकेत खरेदी करून भारतास दिले. त्यात रासायनिक खते, पोलाद, आगगाड्यांचे डबे व बाघिणी, मच्छीमारीची अवजारे इत्यादि विविध माल होता. हा माल अमेरिकेने भारतास दिला परंतु तो देणगी स्वरूपात न देता कर्जाऊ दिला. त्याची किंमत ४२·२२ कोटी रुपये झाली. या कर्जावर चार टक्के दराने व्याज आकारावयाचे होते आणि त्याची परतफेड चार वर्षांनंतर सुरू करून ३६ वार्षिक हप्त्यांनी करावयाची होती. १९५१ साली कर्जाऊ गहू दिला त्यावर अडीच टक्के दराने व्याज आकारले जात होते. त्या मानाने हे व्याज जास्त होते. परंतु या कर्जाच्या परतफेडीत एक विशेष सवलत होती. गहू—कर्जाची परतफेड डॉलर-मध्ये करावयाची होती. उलट तांत्रिक सहकार्याच्या या कर्जाची फेड रुपयात करावयाची होती. एका अर्थाने ही फार महत्त्वाची सवलत होती. म्हणून आपण तिचे स्वागतही केले. या तरतुदीमुळे एका देशाने दुसऱ्या देशास द्यावयाच्या मदतीत एक नवीन प्रकार प्रस्थापित झाला. त्याचे होणारे दूरगामी परिणाम त्याचवेळी आपल्या लक्षात आले नाहीत. आज ते भोवत आहेत.

तांत्रिक सहकार्याच्या करारानुसार अमेरिकेकडून आलेल्या या साहित्यात भारत सरकारने पदरची भर घातली, हे सर्व साहित्य तांत्रिक सहकार्याच्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या संस्था आणि सरकारी परंतु व्यापारी तत्त्वावर चालणारी रेल्वे-सारखी खाती यांना विकत दिले गेले. राज्यसरकारांना कर्जाऊ दिले गेले. या मालाच्या विक्रीची रक्कम आणि राज्य सरकारकडून येणारे कर्जफेडीचे हप्ते भारत सरकारने एका खास विकास निधीत जमा करावेत. आणि या निधीचा उप-

योग अमेरिकन सरकार संमत करील अशा विकास कार्यांवर खर्च करावा अशी या करारात दुसरी तरतूद होती. त्यानुसार तीन पंचवार्षिक योजनांच्या पंधरा वर्षांत या खास विकास निधीत ७५·६८ कोटी रुपये जमा झाले. त्यापैकी ७·५ कोटी रुपये भारतीय औद्योगिक पतपुरवठा आणि गुंतवणूक महामंडळाला भांडवल म्हणून देण्यात आले आणि बाकीचे गटविकास योजनांवर खर्च केले. या रकमा खर्च झाल्या ते कार्यक्रम महत्त्वाचे होते की नाही हा गौण मुद्दा आहे. त्याकरिता अमेरिकन सरकारची संमति घ्यावी लागली हा मुख्य मुद्दा आहे. एवढे करूनही मूळ कर्ज रुपयात का होईना परतफेड करण्याची जबाबदारी डोक्यावर राहिली ती राहिलीच.

## तैनाती फौजेचा आधुनिक अवतार

अशा रीतीने १९५२ च्या तांत्रिक सहकार्याच्या करारानुसार भारत—अमेरिका आर्थिक सहकारात प्रारंभीच दोन महत्त्वाची तत्त्वे प्रविष्ट झाली. मदतीचा एक नवीन प्रकार आंतरराष्ट्रीय व्यवहारात निर्माण झाला. ज्यायोगे परदेशी कर्जाची परतफेड रुपयात करण्याची सोय झाली, सरकारमार्फत आणलेला परदेशी माल बाजारात विकला जाऊ लागला, अशा विक्रीचे रुपये तसेच कर्जफेडीत दिलेले रुपये एका स्वतंत्र निधीत जमा करण्याची व्यवस्था झाली आणि या निधीच्या पुढील विनियोगावर परकीय अधिकार प्रस्थापित झाला. जी मदत द्यावयाची तिच्या जोरावर ज्याला मदत द्यावयाची त्याच्या जीवनावर आणि धोरणावर अधिकाधिक प्रभुत्व प्रस्थापित करावयाची आंतरराष्ट्रीय राजनीती मदतीच्या या प्रकारात स्पष्ट झाली. अठराव्या शतकातील वॉरन् हेस्टिंग्जच्या तैनाती फौजेचा हा आधुनिक अवतार होता. परंतु या तैनाती फौजेचा धोका अजूनही आमच्या लक्षात आलेला नाही. फुकट मिळते ना? मग ते काहीही असो, त्याकरिता पदर पसरावयाचा ही आमची राजकीय अर्थनीती आहे. फुकट मिळते ते पदरात पाडून घेण्याकरिता पदरचा किती खर्च होतो याचे भान आम्हाला राहत नाही. ज्या बाबींवर तो खर्च होतो त्यांना किती प्राधान्य द्यावयाचे याचा आम्ही विचार करीत नाही. आणि जे फुकट मिळाले त्याची किंमत पैशात दिली नाही पण दुसऱ्या कशात दिली का हा प्रश्न आम्ही कधी स्वतःस विचारीत नाही. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्राला चंचुप्रवेश करावयाला आदर्श परिस्थिति या देशात होती.

अमेरिकन माल देशात विकून त्यातून एक विकास निधी उभा करावयाचा आणि त्याचा विनियोग अमेरिकेच्या संमतीने करावयाचा ही कल्पना आपल्या गळी इतक्या सहज उतरली हे पाहताच अमेरिकेने याच दिशेने आणखी एक पाऊल टाकले. १९५५ साली अमेरिकेत गहू, कापूस आणि इतर काही शेतमालाचे शिलकी साठे पडून होते. आंतरराष्ट्रीय बाजारात ते साठे काढणे शक्य नव्हते. आणि सालो-

साल ते वाढतच जाणार अशी भीती निर्माण झाली होती. त्यातील काही माल भारतात विकून त्या रुपयांचा एक निधी निर्माण करावा आणि त्यातून आपणांस इष्ट वाटतील त्या विकास कार्यक्रमास मदत घ्यावी अशी कल्पना अमेरिकन सरकारच्या मनात आली. ती भारत सरकारच्या गळी उतरवण्याकरता अमेरिकेने एक नवीन सवलत दिली. जून १९५१ मध्ये अमेरिकेने २० लक्ष टन गहू खरेदी करण्याकरता जे सुमारे १९ कोटी डॉलरचे कर्ज दिले होते त्याची परतफेड जून १९५७ पासून सुरू व्हावयाची होती. ती करणे भारतास अवघड होईल म्हणून अमेरिकेने या कर्जाच्या पतरफेडीची मुदत सुमारे तीस वर्षांनी वाढवून दिली. आता १९५१ साली गहू खरेदी करण्याकरता म्हणजे खावटीकरता काढलेल्या या १९ कोटी डॉलर कर्जाची परतफेड भारत डिसेंबर १९८६ पासून अठरा सहामाही हप्त्यांनी करणार आहे. आणखी कृपाळू होऊन अमेरिकेने या वाढीव मुदतीचे व्याजही माफ केले आहे. या व्यवहाराने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची पत किती वाढली असेल ते सांगणे नकोच.

परंतु आम्हांला त्याची खंत नव्हती. १९५५ साली अमेरिकेने आपल्या शिलकी साठ्यातून काही शेतमाल-विशेषत: गहू-भारतास देऊ केला. ही देणगी नव्हती पण हे कर्जही नव्हते. भारताने हा माल आयात करावयाचा होता. परंतु आयातीची किंमत डॉलरमध्ये देण्याची आवश्यकता नव्हती. तो रुपयांत देऊन भागणार होते. किंमत डॉलरमध्ये म्हणजे परकीय चलनात द्यावी लागली नाही म्हणज आम्ही तो माल फुकट मिळाला असेच समजतो आणि काहीही फुकट मिळत असले तर दुसरा कोणताही विचार न करता ते पदरात पाडून घ्यावयाचे हे आमच्या राजकीय अर्थनीतीचे मुख्य तत्त्व आहे. वास्तविक १९५३-५४ आणि १९५४-५५ ही दोन्ही वर्षे आपले शेतमालाचे उत्पादन उत्तम होते. १९५५ मध्ये तर धान्याच्या किंमती अतोनात घसरल्या होत्या. परंतु अमेरिकेने गहू व इतर शेतमाल देऊ केला आणि आम्ही तो


क्र. ३७ मध्ये रु. ४०,००० जिंकाच !

**प्रवेश-पत्रिका रविवारच्या नवशक्तिमध्ये प्रसिद्ध होते.**

मुंबई व महाराष्ट्रांत ठिकठिकाणी एजन्टस आहेत.

**लिट्‌क्विझ वीकलीचा नवीन अंक मोफत मागवा:-**

**लिट्‌क्विझ प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई ७**

१५ भाषेत १०० एजन्टस, १८५ पत्रांत जाहिरात

घेण्यास तयार झालो कारण का तर त्याची किंमत डॉलरमध्ये द्यावी लागणार नव्हती.

अशा तऱ्हेने अविकसित देशांना शिलकी साठ्यातून शेतमाल देण्याकरिता अमेरिकेने १९५४ मध्ये दोन कायदे मंजूर केले होते. त्यातील एक म्हणजे 'परस्पर संरक्षणाचा कायदा,' जो अमेरिकन सार्वजनिक कायदा क्रमांक ६६५ म्हणूनही ओळखला जातो. या कायद्याच्या ४०२ कलमाखाली अशा तऱ्हेने शेतमाल पुरविण्याची तरतूद होती. सन १९५५, १९५६, आणि १९५७ या तीन वर्षांत या कायद्यान्वये आपण सुमारे ३२ कोटी रुपये किंमतीचा गहू आणि कापूस आयात केला. त्याची किंमत रुपयांत द्यावी लागली. या रुपयांचा अमेरिकेत काहीच उपयोग नसल्याने अमेरिकन सरकारने भारतात या रुपयांचा एक निधी उभा केला. त्यातून भारताला रिहांड नदी प्रकल्पाकरता सुमारे १० लक्ष रुपयांची देणगी दिली. अमेरिकेस संमत असलेल्या विकास योजनांकरता सुमारे २० कोटी रुपयांची कर्जे भारतास दिली. या कर्जांची परतफेड भारतास यथावकाश रुपयांतच करावयाची आहे. मग त्या रुपयांतून अमेरिकन सरकार भारतास पुनश्च कर्जे देईल. निधीपैकी उरलेले सुमारे १२ कोटी रुपये अमेरिकन सरकारने आपल्या मर्जीनुसार भारतात खर्च केले. त्यातून अनेक अमेरिकन, कोणी सल्लागार, कोणी तज्ज्ञ, कोणी प्राध्यापक, कोणी संशोधक, कोणी काही कोणी काही, भारतात येऊन गेले. त्यांचा भारतात होणारा खर्च या निधीतून झाला. त्यांनी त्यांच्या सान्निध्यात आलेल्या महत्त्वाच्या आणि उपयुक्त भारतीयांचा पाहुणचार केला. अमेरिकेस विशेष आस्था वाटत असलेल्या व्यक्ती, संस्था आणि विकासयोजना यांना या निधीतून मदत मिळाली.

याच प्रकारची मदत आणखी मोठ्या प्रमाणावर करण्याची तरतूद करणारा दुसरा कायदा म्हणजे व्यापार आणि विकास साहाय्याचा कायदा, जो अमेरिकन सार्वजनिक कायदा क्रमांक ४८० म्हणूनही ओळखला जातो. या कायद्यान्वये तीन प्रकारांनी मदत देण्याची तरतूद आहे. त्यातला प्रमुख प्रकार म्हणजे अमेरिकन शिलकी शेतमाल अप्रगत देशांना त्यांच्या चलनाच्या बदल्यात विकत द्यावयाचा, त्या चलनाचा निधी त्या त्या देशात करावयाचा आणि त्या निधीतून त्या त्या देशांच्या सरकारांना विकासयोजनांकरता काही प्रमाणात देणग्या व कर्जे द्यावयाची आणि उरलेला निधि अमेरिकन राजदूतकार्याकरता खर्च करावयाचा. या कायद्यानुसार दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या दहा वर्षांत भारत सरकारने वेगवेगळे नऊ करार करून एकूण सुमारे १५६३ कोटी रुपये किंमतीचा अमेरिकन शिलकी शेतमाल रुपयांत किंमत देऊन आयात करण्याची व्यवस्था केली. त्यात मुख्यतः म्हणजे सुमारे दोन तृतीयांश भाग गहू होता. शिवाय थोड्या थोड्या प्रमाणात तांदूळ, ज्वारी, मका, कापूस, तंबाखू, सोयाबीन तेल, दुधाची भुकटी इत्यादी माल होता. एकूण किंमतीपैकी सुमारे २०५ कोटी रुपये सागरी वाहतुकीचा खर्च होता. त्यांपैकी निदान निम्मी वाहतूक अमेरिकन जहाजातून केली पाहिजे अशी कायद्यातच




फुकट मिळेल ते घेणे

तरतूद होती. परंतु वाहतूक अमेरिकन जहाजातून केली तरी भाडे रुपयात देण्याची सोय असे. जून १९६५ पासून ही सवलत काढून घेतलेली आहे. आता अमेरिकन जहाजातून होणाऱ्या वाहतुकीचे भाडे आपणास डॉलरमध्ये द्यावे लागते.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० नुसार अमेरिकन शिलकी शेतमालातून मदत मिळण्याचे आणखी दोन प्रकार आहेत. त्यातील एक प्रकार असा की एखाद्या देशावर दुष्काळ, पूर, धरणीकंप इत्यादी नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास अमेरिकन सरकार आपल्या शिलकी शेतमालातून निव्वळ देणगी म्हणून मदत देते. भारतास आजपावेतो सुमारे ७·५ कोटी रुपये किंमतीचा माल अशा रीतीने देणगीदाखल मिळाला आहे. मदतीचा दुसरा प्रकार देणगी स्वरूपाचाच आहे. परंतु असा माल अमेरिकन सरकार त्या त्या देशांच्या सरकारांना देणगी न देता सार्वजनिक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना देते. या तरतूदीनुसार भारतात काम करणाऱ्या देशीविदेशी विविध संस्थांना १०९ कोटी रुपये किंमतीचा माल आजपावेतो मिळाला आहे.

पहिल्या प्रकारानुसार आयात केलेल्या मालाची किंमत रुपयात द्यावी लागते हे सांगितलेच आहे. माल अमेरिकेतून निघाल्याबरोबर भारत सरकार मालाची किंमत रिझर्व्ह बँकेत अमेरिकन सरकारच्या नावे एका खास खात्यात जमा करते. या रकमेचा विनियोग कसा करावयाचा, त्यापैकी भारत सरकारला देणगी म्हणून आणि कर्जाऊ किती द्यावयाचे आणि अमेरिकन सरकारने भारतातील स्वतःच्या खर्चाकरिता किती ठेवावयाचे हे आयातीच्या प्रत्येक करारात ठरते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जे पाच करार झाले त्यांत सर्व मिळून सुमारे तिसरा

हिस्सा रक्कम भारत सरकारास देणगीदाखल देण्याची तरतूद होती. परंतु तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जे चार करार झाले त्यांत देणगीची मुळीच तरतूद नाही. एकूण नऊ करार लक्षात घेता आयात मालाची किंमत सुमारे १५६३ कोटी रुपये होते. करारानुसार या रकमेचा विनियोग सुमारे ३७५ कोटी रुपये भारत सरकारला देणगीरूपाने, ८७३ कोटी रुपये कर्जरूपाने आणि उरलेले ३१५ कोटी रुपये अमेरिकन सरकारच्या खर्चाकरिता असा व्हावयाचा आहे.

तात्पर्य, मालाच्या एकूण किंमतीपैकी सुमारे पंचवीस टक्के रक्कम भारत सरकारास देणगीरूपाने मिळते. म्हणजे थोडक्यात मूळ किंमतीत तेवढी सूट मिळते. अमेरिकन शेतमालाच्या अमेरिकेतील किंमती आंतरराष्ट्रीय किंमतीच्या मानाने पाच पंचवीस टक्के वर ठेवलेल्या आहेत. त्यामुळे सूट वजा घातली तर भारत सरकारास अमेरिकन माल ढोबळ मानाने आंतरराष्ट्रीय बाजारभावाने मिळतो असे म्हणावयास हरकत नाही. परंतु एक मख्खी राहतेच. देणगी दिलेले हे ३७५ कोटी रुपये भारत सरकारने कोणत्या कारणाकरिता खर्च करावेत ते अमेरिकन सरकार ठरविते. तीच गोष्ट कर्जाऊ मिळणाऱ्या रकमेची. कर्जाऊ द्यावयाच्या रक्कमा कोणकोणत्या बाबींवर खर्च करावयाच्या ते तपशीलवार अमेरिकन सरकार ठरविते. त्या बाबी महत्त्वाच्या की गैरमहत्त्वाच्या हा प्रश्न पूर्वी म्हटल्याप्रमाणे गौण आहे. एवढ्या मोठाल्या रक्कमांचा भारतात होणारा विनियोग परकीय सरकारचे संमतीने करावा लागतो हे महत्त्वाचे आहे.

अमेरिकन सरकारच्या अखत्यारीतील उरलेले ३१५ कोटी रुपयांपैकी सुमारे १०९ कोटी रुपये अमेरिकन सरकारने भारतातील अमेरिकन कारखानदार आणि त्यांच्याशी सहकार्य करणाऱ्या देशी कारखानदारांना कर्जाऊ द्यावयाचे आहेत. उरलेले २०६ कोटी रुपये अमेरिकन सरकारच्या भारतातील दूतावासाच्या खर्चाकरिता आहेत. दूतावासातून चालणाऱ्या सर्व उद्योग–उपद्व्यापाचा त्यात समावेश होतो.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली केलेल्या उपरिनिर्दिष्ट नऊ करारानुसार भारताने दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या दहा वर्षांत प्रत्यक्षात १३७० कोटी रुपयांचा अमेरिकन शेतमाल खरेदी केला आणि भारत सरकारने एवढी रक्कम अमेरिकन सरकारच्या नावे रिझर्व्ह बँकेत जमा केली. करारानुसार करावयाच्या विनियोगाप्रमाणे ३१ मार्च १९६६ पर्यंत प्रत्यक्षात ९८३·५ कोटी रुपयांचा खर्च झाला होता. यात ३१६·४ कोटी रु. भारत सरकारास देणगीदाखल ५२८·९ कोटी भारत सरकारास कर्जाऊ, ४४·७ कोटी खाजगी कारखानदारांस कर्जाऊ आणि ९३·५ कोटी अमेरिकन दूतावासाचा खर्च अशा रकमांचा समावेश आहे. उरलेले ३८६·५ कोटी रुपये यथावकाश खर्च होणार होते परंतु ३१ मार्च १९६६ रोजी ते रिझर्व्ह बँकेत शिल्लक पडून होते. अमेरिकन सरकारच्या माल-

कीच्या अशा शिल्लक रकमा रिझर्व्ह बॅन्क एका खास सरकारी कर्जरोख्यात गुंतवते. म्हणजेच पर्यायाने भारत सरकारास कर्जाऊ वापरावयास देते.

## हसावे की रडावे ?

तात्पर्य, अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली अमेरिकन गहू किंवा इतर शेतमाल आयात केला की भारत सरकारला त्याची किंमत रुपयात द्यावी लागत असली तरी प्रत्यक्षात यापैकी बहुतेक सर्व रुपये भारत सरकारला पुनश्च वापरावयास मिळतात. आपण वर पाहिल्याप्रमाणे या रुपयांतून अमेरिकन दूतावासाचा जो प्रत्यक्ष खर्च होईल तो आणि अमेरिकन सरकारमार्फत भारतातील अमेरिकन कारखानदार किंवा अमेरिकन सहकाराने चाललेल्या देशी कारखानदारांना जी कर्जे या रुपयातून दिली जातील ती वजा करता बाकीचे सर्व रुपये भारत सरकारला पुनश्च वापरावयास मिळतात. काही रुपये देणगी म्हणून मिळतात. काही रुपये दीर्घ मुदतीच्या कर्जाने मिळतात. बाकीचे शिल्लक रुपये रिझर्व्ह बँक खास सरकारी कर्जरोख्यात गुंतविते त्यामुळे भारत सरकारला ते अल्पमुदतीच्या कर्जाने मिळतात. कर्जाऊ मिळणाऱ्या सर्व रकमांवर व्याज द्यावे लागते हे खरे. तसेच देणगीदाखल किंवा दीर्घमुदतीच्या कर्जाने मिळणाऱ्या रकमा कोणत्या कामाकरिता खर्च कराव्यात यासंबंधी अमेरिकन सरकारची संमति घ्यावी लागते हेही खरे. परंतु कोणत्याही अटीवर का होईना एवढे रुपये वापरावयास मिळतात हे भारत सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.


अमेरिकन सरकारच्या मालकीचे हे कोटयावधी रुपये जे भारत सरकारास कर्जाऊ वापरावयास मिळतात, त्यांतच आणखी एक प्रकारची भर सतत पडत असते. तांत्रिक सहकार्याच्या करारानिमित्ताने अमेरिकेने भारतास दिलेल्या सुमारे ४२ कोटी रुपये किंमतीच्या डॉलर कर्जाचा उल्लेख मागे केला आहेच. त्याची सव्याज परतफेड डॉलरमध्ये न करता रुपयात करण्याची सवलत दिल्याचेही सांगितले होते. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अमेरिकेने अशाच तऱ्हेची आणखी सुमारे २५१ कोटी रुपये किंमतीच्या डॉलरची कर्जे भारतास दिली आहेत. त्यांची सव्याज परतफेडही रुपयांत करण्याची सोय आहे. अमेरिकन गहू आणि इतर शेतमालाच्या विक्रीतून भारत सरकार आणि खाजगी कारखानदार यांना जी सुमारे ६०० कोटी रुपयांची कर्जे दिली आहेत त्यांची सव्याज परतफेडही रुपयांतच व्हावयाची आहे. कर्जफेडीच्या हप्त्याचे हे सर्व रुपये अमेरिकन सरकारच्या नावे रिझर्व्ह बँकेत जमा होतात. शिवाय या खात्यात वेळोवेळी शिल्लक असलेल्या रकमेवर रिझर्व्ह बँक व्याज देते ते जमा होते. ३१ मार्च १९६६ रोजी कर्जफेडीचे आणि व्याजाचे मिळून सुमारे २०८ कोटी रुपये या खात्यात जमा होते. अमेरिकन सरकार या रुपयांचे काय करणार ? ते तसेच बँकेत पडून राहतात. रिझर्व्ह बँक ते

सरकारी कर्जरोख्यांत गुंतविते म्हणजेच भारत सरकारास पुनश्च कर्जाऊ देते.

आता हसावे की रडावे ? आम्हांस वाटते छान आहे. कर्ज फेडले तरी पुनः आपणांकडेच येते. आणखी काय हवे ? परंतु त्याचाच अर्थ असा की या कर्जाची फेड कर्जफेडीने होणार नसून वस्त्रफेडीने होणार आहे. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात अशा तऱ्हेचे सुमारे १००० कोटी रुपयांचे कर्ज अमेरिकेने भारत सरकारास दिले आहे. ते फेडून फिटणार नाही. अमेरिकेने एक दिवस या सर्व रकमेचे दानच केले तरच ते संपेल. परंतु त्यांचा हेतू सफल होईपर्यंत अमेरिकेने त्याचे दान करून टाकण्याचे काहीच कारण नाही. अमेरिकन सरकारने हे सारे रुपये एकदा खर्च करून टाकले तर हे कर्ज नष्ट होईल. पण ते शक्य नाही. या कर्जावरचे व्याजही अमेरिकन सरकारच्या भारतातील सर्व व्यवहारास पुरेसे आहे. मग अमेरिकन सरकार तरी या सर्व रुपयांचे काय करील ? अमेरिकन सरकार हे रुपये भारत सरकारास पुनः पुनः कर्जाऊ देईल आणि प्रत्येक वेळी ते कसे खर्च करावेत यासंबंधी भारतास तांत्रिक व आर्थिक सल्ला देईल. आपण यानंतर अमेरिकन माल मुळीच आणला नाही, रुपये फेडीचे नवीन कर्ज काढले नाही तरी १००० कोटी रुपयांचा हा वरवंटा भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात अनंत वर्षे फिरत राहणार हे उघड आहे. या वरवंटयाखाली राष्ट्रीय चारित्र्य आणि स्वत्त्व यांचा चक्काचूर झाला नाही तरच नवल. परंतु हा सर्व व्यवहार भारतसरकारला इतर सर्व दृष्टींनी इतका सोयीचा आणि गरजेचा झाला आहे की या राष्ट्रीय आपत्तीकडे दुर्लक्ष करून भारत सरकार या सर्व व्यवहारास खुषीची संमती देते; किंबहुना हा व्यवहार सालोसाल असाच वृद्धिंगत होत राहावा म्हणून अमेरिकन सरकारची मनधरणी करते.

या व्यवहारात भारत सरकारची काय विशेष सोय होते ते नीट समजावून घेतले पाहिजे. म्हणजेच भारत सरकार या व्यवहाराला आज अव्याहत बारा वर्षे एवढे का लोभावले आहे ते लक्षात येईल. अमेरिकन गहू आणि इतर माल अमेरिकेतून निघाला म्हणजे त्या मालाची किंमत भारत सरकार स्वतःच्या तिजोरीतून रिझर्व्ह बँकेत अमेरिकन सरकारच्या खात्यात भरते हे सांगितलेच आहे. थोड्याच दिवसांत हा माल भारतात येतो आणि स्वस्त धान्याची दुकाने इत्यादी मार्गांनी बाजारात विकला जातो. भारत सरकारला त्याची पूर्ण किंमत मिळते आणि त्या मालाचे पोटी अमेरिकन सरकारच्या खात्यात पूर्वीच आगाऊ भरलेली आपली रक्कम भारत सरकार वसूल करून घेते. पर्यायाने असे मानण्यास हरकत नाही की भारत सरकार अमेरिकन गहू आणि इतर माल आयात करते आणि तो बाजारात विकून विक्रीची रक्कम अमेरिकन सरकारच्या खात्यात जमा करते.

या व्यवहारात भारत सरकारला व्यापारी लाभ होत नाही. परंतु अमेरिकन सरकारच्या खात्यात भरलेली ही बहुतेक सर्व रक्कम वर वर्णन केल्याप्रमाणे भारत



मिंधेपणामागील भारत सरकारचे अर्थकारण

सरकारला वापरण्यास मिळते. त्यातील काही भाग देणगी म्हणून तर काही भाग कर्ज म्हणून मिळतो. या व्यवहारातील भारत सरकारने प्रथम अमेरिकन सरकारच्या खात्यात भरणा करण्याचा आणि त्या खात्यातून अमेरिकन सरकारने भारत सरकारास देणग्या व कर्ज देण्याचा तपशील बाजूस ठेवला तर या सर्व व्यवहाराचे स्वरूप थोडक्यात असे होते की अमेरिकन सरकार भारत सरकारास गहू आणि इतर माल देते, भारत सरकार हा माल बाजारात विकते, आणि विक्रीचा पैसा स्वतःच्या खर्चाकरता वापरते. हे या व्यवहाराचे सत्य स्वरूप आहे. म्हणूनच मिंधेपणा, कर्जबाजारीपणा आणि स्वतःच्या घरात सावकाराची ये-जा पत्करूनही भारत सरकार या व्यवहारास चिकटून राहिले आहे.

ही कपोलकल्पित कथा नव्हे. अमेरिकन गहू आणि इतर माल सालोसाल देशात विकून उभा केलेला पैसा भारत सरकार दरसाल आपल्या वार्षिक अंदाजपत्रकात आणि जमाखर्चात जमेच्या बाजूस दाखवीत आहे. जेवढा जास्त माल आणावा आणि जेवढी जास्त किंमत देऊन आणावा भारत तेवढा सरकारला अधिक पैसा उभा करता येतो. सन १९६४–६५ साली अशा तऱ्हेने अमेरिकन माल विकून भारत सरकारने २३० कोटी रुपये उभे केले होते. पुढील वर्षी १९६५–६६ मध्ये दुष्काळामुळे जास्त गहू आयात केला आणि भारत सरकारला जास्त पैसे मिळाले. त्या वर्षी २५२ कोटी रुपये जमेस होते. त्याच्या पुढील वर्षी १९६६–६७ साली माल जास्त मिळाला नाही परंतु रुपयाच्या अवमूल्यनामुळे त्याची रुपयात किंमत वाढली आणि भारत सरकारला आणखी जास्त पैसे मिळाले. त्या सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकात

३२८ कोटी रुपये जमेस धरले होते. १९६७–६८ सालच्या अंदाजपत्रकात २९१ कोटी रुपये जमेस धरले आहेत. तात्पर्य, या सर्व व्यवहारामुळे भारत सरकारला सध्या दरसाल सुमारे ३०० कोटी रुपये अंदाजपत्रकात जमेस धरता येतात. केवळ स्वातंत्र्याकरता, स्वाभिमानाकरता हे सोडून देणे, नको म्हणणे सरकारला सोपे राहिलेले नाही.

भारत सरकारच्या आर्थिक स्थैर्याकरता या रकमांचे महत्त्व जाणले पाहिजे. भारत सरकार आणि सर्व राज्य सरकारे यांचे जमाखर्च एकत्र केले तर चालू जमा आणि चालू खर्च यात १९६४–६५ साली १४२२ कोटींची, १९६५–६६ साली १८२६ कोटींची आणि १९६६–६७ साली २२७७ कोटी रुपयांची तूट होती. १९६७–६८ साली तुटीचा अंदाज १८२३ कोटी रुपये होता. ही तूट भरून काढून जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याचे दोनच मार्ग सरकारास उपलब्ध आहेत. एकतर देशात जनतेकडून कर्ज उभारणे, नाहीतर परदेशची मदत घेणे. बाजारांतील कर्जे, अल्पबचत योजना, प्रॉव्हिडंट फंड, सक्तीची बचत योजना इत्यादी सर्व जमेस धरून वरील तीन वर्षी अनुक्रमे ४६४ कोटी, ५०५ कोटी आणि ४३९ कोटी एवढ्याच रकमा भारत सरकार आणि राज्यसरकारे या सर्वांस मिळून उभ्या करता आल्या. १९६७–६८ साली या रकमेचा अंदाज ४४३ कोटी रुपये होता. या रकमांशी तुलना केली म्हणजे अमेरिकन गहू आणि इतर माल बाजारात विकून याच तीन वर्षी उभ्या केलेल्या अनुक्रमे २३० कोटी, २५२ कोटी आणि ३२८ कोटी रुपयांचे आणि १९६७–६८ साली जमेस धरलेल्या २९१ कोटी रुपयांचे महत्त्व लक्षात येईल.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० नुसार भारतात आयात होणारा अमेरिकन गहू आणि इतर शेतमाल यांचे भारत सरकारास असणारे हे महत्त्व लक्षात घेतले म्हणजे पुष्कळ अवघड प्रश्नांची उत्तरे मिळतात. सन १९६५–६६ आणि १९६६–६७ ही दोन वर्षे अवर्षणाची गेली म्हणून त्या वर्षी अमेरिकन गहू आयात करावा लागला असे म्हणतात. परंतु १९६४–६५ साली पीक उत्तम होते. त्या वर्षीही पिकाचे मानाने आयात कमी झाली नाही. १९६७–६८ साली तर धान्य उत्पादनाने उच्चांक गाठला. गव्हात क्रांती झाली. ती जगजाहीर करण्याकरता आपण पोस्टाची तिकीटेही काढली. पण गव्हाची आयात चालूच आहे. कारण उघड आहे. देशात धान्याचे उत्पादन जास्त झाले तर ज्याच्या शेतात जास्त पिकेल त्या शेतकऱ्याचा फायदा होईल. भारत सरकारला त्याचा काय फायदा? सरकारला आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरता त्याचा काय उपयोग? सरकारच्या जमाखर्चाच्या तोंडमिळवणीकरता उपयोगी यावयाचे असेल तर धान्य देशात जास्त पिकून भागत नाही. ते अमेरिकेत पिकून अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली आयात करावे लागते. म्हणून भारत सरकार ते आयात करते.

या कायद्यान्वये होणारी धान्याची व इतर शेतमालाची आयात ही भारताला आर्थिक मदत नसून भारत सरकारला मदत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भारतीय जनतेने भारत सरकारला सरकारी खर्चाला पुरेसे कर दिले नाहीत, कर्जे दिली नाहीत तरी भारत सरकारचे नडू नये, भारत सरकारचे भारतीय जनतेवरील अवलंबन कमी व्हावे म्हणून भारत सरकारला ही मदत मिळत आहे. ही मिळणारी मदत अगदी क्षुल्लक आही. १९६४–६५, १९६५–६६ आणि १९६६–६७ ही तीन वर्षे भारतातील केंद्र आणि राज्यसरकारांचा एकूण वार्षिक महसूल लक्षात घेतला तरी त्या मानाने भारत सरकारने अमेरिकन माल बाजारात विकून उभ्या केलेल्या रकमांचे प्रमाण दहा टक्के बसते. उत्पन्नाची ही एवढी मोठी बाब सोडून देण नको म्हणणे, सरकारला कसे शक्य होईल ?

## व्हिएटनाम आणि भारत

म्हणून आपले अन्नधान्याचे उत्पादन दोन तीन वर्षांत वाढेल आणि तीन वर्षांत आपण अन्नधान्याची आयात पूर्णपणे बंद करू असे सरकार म्हणते ते शक्य वाटत नाही. देशात धान्याचे उत्पादन कितीही वाढले तरी जोवर देशातील धान्याचे भाव अमेरिकन धान्याच्या भावाच्या फार खाली जात नाहीत, जोवर अमेरिकन धान्य आयात करून, विशेष नुकसान न सोसता बाजारात विकून त्याचे रुपये सरकारी खर्चास घेणे शक्य आहे तोवर ही आयात बंद करणे सरकारला अवघड आहे. अन्नधान्यांचे उत्पादन वाढेल तसा अन्नधान्याचा वापरही वाढेल हे लक्षात ठेवले पाहिजे. वाढत्या लोकसंख्येला अधिक अन्न लागेल. तिला पुरेसे धान्य पिकले तर जादा धान्य कोंबडयांना, शेळ्या–मेंढयांना, डुकरांना, गाई बैलांना घालण्यास सुरुवात होईल आणि आहारात दूधदुभते, अंडी आणि मांसाचा समावेश होईल. या कारणांनी आपल्या धान्याच्या किंमती अमेरिकन धान्याच्या किंमतीच्या फार खाली येण्याचा नजीकच्या भविष्यकाळात संभव नाही. तोवर सध्याच्या पद्धतीने होणारी धान्याची आयात थांबवणे सरकारी दृष्टीने व्यवहार्य होणार नाही.

शिवाय, आपल्या धान्याच्या किंमती फार घसरल्या आणि त्यामुळे अमेरिकेतून धान्य आयात करणे अवघड झाले, पण याच पद्धतीने दुसऱ्या काही वस्तू मिळत असल्या तर भारत सरकार त्या आयात करू लागेल. अमेरिकन सरकारने भारत सरकारला मदत करण्याचेच ठरविले तर अमेरिकेजवळ देण्याजोग्या कितीतरी गोष्टी आहेत. कापूस आहे, सोयाबीन तेल आहे, दुधाची भुकटी आहे. शिवाय अशी मदत केवळ धान्य व इतर शेतमाल यापुरतीच मर्यादित ठेवण्याचे कारण नाही. आर्थिक विकासाकरता शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्याकरता स्वस्त पाठ्यपुस्तकांची गरज आहे. अमेरिकन सरकार सर्व विषयांची, सर्व वर्गांची पाठ्यपुस्तके तयार करवून, छापून हव्या तेवढ्या संख्येने भारत सरकारास


देऊ शकेल आणि भारत सरकार ती बाजारात विकून हवे तेवढे रुपये स्वतःच्या खर्चाकरता उभे करू शकेल. कारण कोणतीच देशी पुस्तके अनेक वर्षे या पुस्तकांची गुणवत्तेत, छपाईत आणि किमतीत बरोबरी करू शकणार नाहीत. पाठ्यपुस्तका-प्रमाणेच ट्रान्झिस्टर रेडिओ, टेलिव्हिजन सेट, कुटुंबनियोजनाची नवी उपकरणे आणि शेवटी अमेरिकन विमानाने अमेरिकेत तीन महिने, सहा महिने किंवा नऊ महिने हिंडून येण्याकरता प्रवासी तिकिटे अशा अनेक गोष्टी अमेरिकन सरकार भारत सरकारास देऊ शकेल की ज्या विकून भारत सरकारच्या प्रपंचास मदत होईल. वर सांगितल्याप्रमाणे आज भारतातील केंद्र आणि राज्यसरकारांच्या महसूलाचा फक्त दहावा हिस्साच अमेरिकन माल देशात विकून मिळतो. भारत सरकारचे भारतीय जनतेवरील अवलंबन खरोखरीच कमी करावयाचे असेल तर हे प्रमाण पुष्कळच वाढविले पाहिजे हे उघड आहे.

अमेरिकेने आपले सार्वजनिक कायदे ६६५ आणि ४८० यांच्याखाली अशा तऱ्हेची मदत जगातील अनेक देशांच्या सरकारांना आजपावेतो केली आहे. उदाहरणार्थ, दक्षिण व्हिएटनाममध्ये १९६० साली सरकारी वार्षिक महसूलाच्या जवळ जवळ दोन तृतीयांश भाग तेथील सरकार विविध अमेरिकन माल बाजारात विकून मळवीत असे. आज बहुधा तेथील सरकारचे उत्पन्न शंभर टक्के अमेरिकन माल बाजारात विकूनच निघत असेल असे वाटते. सरकारच्या दृष्टीने केवढी ही सोय. जनतेवर कर बसवायला नकोत, ते वसूल करायला नकोत, जनतेकडून कर्ज काढायला नकोत, ती परत फेडायला नकोत. अमेरिकन माल आणावा, बाजारात विकावा आणि सरकारी खर्च चालवावा. स्वतंत्र जनता आणि परतंत्र सरकार असा हा पारतंत्र्याचा नवा आविष्कार आहे.

□

[प्रा. के. एन्. राज यांच्या 'भारत, पाकिस्तान आणि चीन' या लेखाचा उत्तरार्ध जागेअभावी या अंकात देता येत नाही. तो पुढील अंकी येईल. —सं.]

अनेक स्वर,
एक गीत!



कोटी कोटी लोक,
एक देश!

प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# दादा

उल्हास लुकतुके

## सोडवणारे देव तसबिरीत असतात

' लक्षे ' –

आवाजासरशी बिगी बिगी झोपडीकडे जाणारी लक्षी पायात फास अडकल्यागत थांबली. तिची चोळी हिंदकळली. मागं वळून पाहिलं तर खाटकाच्या दुकानात युनूस ! खाटीक मोठ्या सुऱ्यानं मटण फटाफटा उडवत होता.

नुसत्या हाताच्या खुणेनं त्यानं तिला जवळ बोलावलं. जाणं भाग होतं – तो झोपडपट्टीचा दादा, ती इतर माद्यांसारखी एक – त्यानं खालच्या आवाजात काहीतरी सांगितलं. कुऱ्हाड लाकडाच्या गाठीत गपकन बसावी तसे ते शब्द तिच्या काळजात घुसले.

' सुना क्या तुने मेरे कबूतर '



**क्यों ब, तुम्हारा मरद क्यों है अभीतक अंदर ?**

मानेला हिसडा मारून तिनं पाऊल उचललं. नळाचं पाणी गेलं होतं – आता नाल्यावर जावं लागणार – पाणी नसलं तर महादू मारील. काम मिळालं नसलं मग तर पाठीचा बुकणा करील.

पचकन् पानाची पिंक टाकून युनूस तिथून सरकला.

ती घाईघाईनं झोपडीकडे निघाली – ठसकन् आंगठ्याला काहीतरी लागलं – ती कळवळली – पाहिलं तर फुटका माठ –

पाण्याचं मडकं उचललं. मडक्याच्यावर भिंतीवर तिनं देवांच्या तसबिरी लावल्या होत्या. एका तसबिरीत खूप हातांची देवी सिंहावर बसली होती – देवी राक्षसाला ठार करीत होती आणि सिंह राक्षसाच्या रेड्याला.

नाल्याच्या वाटेवर कैकाड्यांनी एका डुकराला घेरलं होतं – डुकराला त्याचं काहीच वाटत नव्हतं – सगळ्यांच्या हातात कांबी होत्या. एक दोन घाव वर्मी घालून ते त्या डुकराला ठार करणार होते. भाजून विकणार होते. तिला वाटलं आपण मधे पडून त्या डुकराला सोडवावं – पण ती पुढे निघाली. ती थोडीच देवी होती ?

गटाराच्या पाण्यात डुकरं, माणसं, म्हशी, जनावरं एकत्र डुंबत होती – माणसांत जनावरं की जनावरांत माणसं? कुणास ठाऊक. गटाराच्या बाजूला एक खड्डा खणला होता त्यातलं पाणी ती भरू लागली. पण तिला पाणी भरावसं वाटेना. भरलेलं मडकं पालथं केलं.

परत येईपर्यंत कैकाड्यांनी आपला उद्योग उरकला होता. तिनं डुकराकडे पाहिलं. ती मादी होती..

महादू आधीच झोपडीवर आला होता. म्हणजे काम मिळालं नव्हतं – पुढचं लक्षीला माहीत होतं.

'लक्षे पानी कुठाय?'

'न्हाई भरलं'

'न्हाई भरलं? मग नाल्यावर कशाला ग्येलतीस रांडे? शिदळकी करायला?'

लक्षीला वाटलं, आपणही खेकसावं, 'तोंड आवर ए बाप्या'. पण ती गप बसली. ती गप पाहून तो भडकला. तिरिमिरीत उठून दाणकन् एक लाथ पेकाटात हाणली – त्याला वाटलं ती नेहमीसारखी बोंब ठोकेल. पण ती गप् – तो बराच वेळ बदडत राहिला. ती गप्पच – त्याला नवल वाटलं – थोड्या वेळानं तिचं मुट-कुळं भिंतीशी टाकून तो बाहेर उन्हात येऊन बसला –

'च्या मारी, काय तरी उन्हाचा कडाका' तो मनातल्या मनात तापला होता. थोड्या वेळानं त्याला वाटलं काही झालं तरी आपण इतकं मारायला नको होतं. पण आपल्याला पाणी लागतं हे तिला माहीत नव्हतं का? शिवाय काम मिळालं नाही – पण म्हणून काय झालं. आपण इतकं मारायला नको होतं. 'लक्षी आप-ल्याला लई जीव लावती'. तसाच तो उन्हात सुकत बसून राहिला.

'चला टुकडा खाऊन घ्यावा बिगिबिगी. मला उशीर हुईल कामाला जायाला.' आतून आवाज. तो आत गेला. ती चुलीसमोर बसली होती. त्याला कळेना, कालवण कढ येऊन करपलं होतं.

रात्री त्यानं सहा आणे मागितले तिनं चटकन् बारा आणे काढून दिले.

'आयला, बारा आने, म्हंजी दोन फिरेंच पालिस! पर लक्षीला आज काय झालया? रोज तर सहा आन्यासाठीबी किचकिच करती मायदळ'

दारावर थाप पडली – महादूनं मोडकं दार आत ओढलं. अन् थिजल्यागत बघूच लागला – दारात युनूस! लक्षीच्या वागण्याचा लख्ख प्रकाश त्याच्या डोक्यात पडला.

'क्यों बे, ए रांड, तुम्हारा मरद क्यों है अभीतक अंदर? असको बाहर भेजो करके कहा था न तुमे?' – युनूस गुरगुरला.

महादू गुमान बाहेर पडला – इतर नवरेही असेच बाहेर पडले होते – पाय बांधून चाप लावलेल्या बैलासारखं त्याला वाटलं.

लक्षीला वाटलं, पुरुषांचं बरं – त्यांना पिता येतं –

थोड्या वेळानं महादू परत आला. तोडलेल्या गांडुळासारखी लक्षी पडली होती. हजारो गोगलगाई चिरडून अंगात भराव्या तसं बुळबुळीत त्याला वाटलं.

तो त्याच रकट्यावर पडला. त्याला खूप वाटलं की लक्षीला जवळ घ्यावं, तिला छान छान गोष्टी सांगाव्या, तिची समजूत काढावी – तो तिच्याकडे वळला-देखील. पुन्हा त्याला बुळबुळीत वाटलं – मग रात्रभर ते तसेच वेगवेगळे पडून राहिले.

सकाळी उठून दोघंही कामाला गेले.

मोडवणारे देव तसबिरीत असतात.

**‘ लक्षे--’**

आवाजासरशी विगीविगी झोपडीकडे जाणारी लक्षी पायात फास अडकल्यागत थांबली. तिची चोळी लटकन् हिंदकळली. मागं वळून पाहिलं तर खाटकाच्या दुकानात युनूस ! खाटीक मोठ्या सुऱ्यानं मटण फटाफट उडवत होता–

‘ लक्षे, आज रातीला यईल तुझ्याकडं ’ कुऱ्हाड - लाकडाच्या गाठीत गपकन बसावी तसा युनूसचा हुकूम तिच्या काळजात घुसला. युनूस : झोपडपट्टीचा दादा. ती : इतर माद्यांसारखी एक.

तिनं पुन्हा पाऊल उचललं. नळा पाणी गेलं होतं–आता नाल्यावर जावं लागणार– पाणी नसलं तर महादू मारील. काम मिळालं नसलं मग तर पाठीचा बुकणा करील.

‘ सुना क्या तूने, मेरे कबूतर— ’

मानेला हिसडा मा  न ती चालायला लागली. पाणी नसलं तर महादू मारील.

युनुसनं खाटकाकडे पाहून पचकन पिंक टाकली. ‘ फिर आज रातको तुम्हारी मजा है युनुसदादा ’–

‘ अरे उसमे क्या मजा है भेंचोद–हर रातकोच ये चलता है–मेरा बापभी ऐसाच दादा था–साला गांडू, करके भाग गया– आपुनने तो पक्का

सर्दी, खोकला
डांग्याखोकला
त्वरीत दूर
होण्यासाठी
५० वर्षांवर नावाजलेले
साठे
कफ सीरप
के. के. साठे आणि कं.
चंद्रेश्वर बिल्डींग, गिरगांव, मुं. ४:
RAJS

किया है, सब कुच करेंगे–फिरमी भाग नही जायेंगे–अपनी औलाद की नयी झोपडपट्टी बनायेंगे ! ' म्हणत युनूस खदखदा हसला.

ती कशीबशी झोपडीत आली अन् सुन्न होऊन मट्कन् खाली बसली. पुन्हा उठली. पाण्याचा माठ घेतला. माठाच्यावर भिंतीवर तिनं तसबिरी लावल्या होत्या–कुठून कुठून धुंडून आणल्या होत्या–त्यातली एक देवीची होती–खूप हातांची देवी सिंहावर बसली होती. देवी राक्षसाला ठार करीत होती आणि सिंह राक्षसाच्या रेड्याला–तिला वाटलं आज रात्री देवीनं यावं. कमीत कमी सिंहानं तरी. ती मनाशीच हसली. स्वतःची तसबीर सोडून देवी कशाला येईल ? दुसरी तसबीर द्रौपदी वस्त्रहरणाची होती अन् तिसरी रासलीलेची–कृष्ण तरी तसबीर सोडून कशाला येईल–जाऊ दे–पाणी आणायला नाल्यावर जायला पाहिजे. तिथे मात्र रासलीलेतला कृष्ण येईल बाई एखादे वेळेस छट्, काहीतरीच–मडकं घेऊन ती घाईनं निघाली.

वाटेत कैकाड्यांनी एका डुकराला घेरलं होतं–सगळ्यांच्या हातात कांबी होत्या–एकदोन घाव वर्मी घालून ते त्या डुकराला मारणार होते–भाजून विकणार होते. तिला वाटलं आपण मधे पडून त्या डुकराला सोडवावं. पण ती पुढे निघाली. ती थोडीच देवी होती ? अन् नकोच ते देवी होणं ! तसबिरीत बसावं लागेल. नवरा मारतो, युनूस येतो–तरीपण हेच बरं.

विचारांच्या भरात नाला आलासुद्धा–गटाराच्या पाण्यात म्हशी आणि माणसंजनावरं डुंबत होती. बाजूला खळगा केलेला होता. ती पाणी भरू लागली. तिला पुन्हा वाटलं–कृष्ण येईल–रासलीलेला. छट् भलतंच काय काहीतरी. तो मथुरेतला यमुना नदीचा तट होता. इथे कशाला येईल कृष्ण तसबीर सोडून या गटारात ! महादूचा शेठ कुठे येतो आपला कारखाना सोडून ! शेठाणी कुठे येते आपला बंगला सोडून ? लालचुटुक ओठांच्या पऱ्या नंदनवनात असतात. शेठाणीची मुलगी कुठ येते नंदनवन सोडून ? अन् तेहि बरंच. ज्याचं त्यानं जिथल्या तिथं असावं. गटाराकाठी कृष्ण ! झोपडीत शेठाणी !! ई ग बाई ! देव कुठे माणसात राहतात का ? जनावरं जनावरात राहतात, माणसं जनावरात राहतात, जनावरं माणसात राहतात–आपण नाही का झोपडपट्टीत रहात ? युनूस नाही का आपल्यात रहात ? पण म्हणून काय झालं ? देवांनी कशाला आपल्यात राहयचं ? ते तर तसबिरीत असतात.

लक्षीला पाणी भरावंसं वाटलं नाही. तिनं भरलेलं मडकं पालथं केलं आणि परत निघाली. तोपर्यंत कैकाड्यांनी आपला उद्योग उरकलेला होता. तिनं डुकराकडे पाहिलं. ती मादी होती.

झोपडीत ती गुमान सुन्न बसून राहिली. तिला तसबिरी फेकून द्याव्याशा वाटल्या. ती उठली. तसबिरीपर्यंत पोहोचली–पण हात अडखळला. तसबिरी फक्त

पालथ्या घालून ती परत सुन्न बसून राहिली. तेवढयात महादू आला. इतक्या लवकर आला म्हणजे काम मिळालं नव्हतं–पुढचं तिला माहीत होतं.

'लक्षे, पानी कुठाय ?–' तो खेकसला.

'न्हाई भरलं.' ती वैतागून म्हणाली. तो भडकला.

'न्हाई भरलं ? मग नाल्यावर कशाला ग्येलतीस रांडे ? शिदळकी करायला ?,

तिचा तोल सुटला. 'तोंड आवर ए बाप्या !'

तो तिरिमिरीनं उठला अन दाणकन् पेकाटात लाथ घातली–ती कोसळली–बराच वेळ तो तिला मारत होता. शवटी तिचं मुटकुळं भिंतींशी फेकलं आणि उन्हात येऊन बसला.

'च्या मारी काय तरी उन्हाचा कडाका.' तो मनातल्या मनात तापला होता. थोड्या वेळानं त्याला वाटलं काही झालं तरी आपण इतकं मारायला नको होतं. पण आपल्याला पाणी लागतं हे माहीत नव्हतं का ? शिवाय काम मिळालं नाही. पण म्हणून काय झालं ? आपण इतकं मारायला नको होतं. 'लक्षी माजी बायकू हाय, अन् मला लई जीव लावती.' लाडीगोडी लावण्याच्या निमित्तानं तो आत आला. लक्षी घुसमुसत कोपऱ्यात पडली होती.

जवळ जाऊन, तिच्या अंगावरून हात फिरवून तो कुजबुजला 'लक्षे...'

एक नाही न् दोन नाही.

'लक्ष्ये ऽऽ' आणखी मऊ आवाज.

पुन्हा तेच.

'ए भडवे, काय आयकू यई ना का तुला ?'

ही किल्ली परिचयाची होती. प्रेमाचं कुलूप चटकन् उघडलं. तिचा बांध फुटला–ती हमसाहमशी रडू लागली. महादूला काही कळेना.

'काय झालं गा ?'

नुसतं रडू–फुटून फुटून रडू–

त्यानं तिला जवळ घेतलं. तशी त्याच्या कुशीत घुसून ती खूप रडली अन् शेवटी म्हणाली,

'आज राती लई वंगाळ घडनार हाय.'

'काय त्ये ?'

'रातच्या पारी युनूस येनार हाय.'

महादूच्या अंगावर वीज पडली.

'येऊ तर दे तो भडवा.–न्हाई तुकडं करून ठिवलं तर नवरा न्हाय तुझा...' अन् असंच काही काही बरंच बोलला तो–तिला बरं वाटलं–रागाच्या भरात तो कुऱ्हाड, कांब शोधायला लागला तेव्हा त्याच्या लक्षात आलं, झोपडीत फुटक्या डबड्याखेरीज काहीच नव्हतं–मग तो गुमान बसून राहिला.

संध्याकाळी लक्षी कामावरून परत आली. तशी त्यानं बारा आणे मागितले.

'बारा आने ? अन् ते कशापायी ?' फ्रेंच पॉलिशला सहाच आणे लागतात हे तिला माहीत होतं.

'हा, हा, बारा आने – आज गुळाची प्यायची हाय.'

'गुळाची प्यायची हाय ? अन् हो बादशाई वो कशापायी ? '

'लक्षे, उगाच भडकव् नगो माजं डोचकं – तू त्ये सांगितल्यापून आदीच गरम झालोय मी.'

'अरं वा रं वा ! गुदरलंय माझ्यावर अन् दारू पायजे तुला ! वराय की हा न्याव. सहा आने दोन पायजे असतील तर घ्यावा.'

महादूनं विचार केला, बायको आधीच कावली आहे– 'बरं चल, काढ सहा आने.'

फ्रेंच पॉलिश पिऊन परत आला तर ती सुन्न बसली होती. मोडक्या दारावर थाप पडली – दार उघडलं तर दारात युनूस !

महादू मुसक्या लावल्यासारखा बाहेर पडला – बाकीचे नवरेही असेच बाहेर पडले होते. पाय बांधून चाप लावलेल्या बैलासारखं त्याला वाटलं–


युनूस बाहेर पडला.

महादू परत आला तेव्हा लक्षी तोडलेल्या गांडुळासारखी पडली होती. हजारो गोगलगाई चिरडून आपल्या अंगात आतून बाहेरून भरल्याइतकं बुळबुळीत महादूला वाटलं.


तिच्याशेजारीच रकटचावर तो पडला. त्याला खूप वाटलं तिला जवळ घ्यावं, तिला छानछान गोष्टी सांगाव्या– तिची समजूत काढावी– तो वळलादेखील. पण पुन्हा त्याला बुळबुळीत वाटलं– रात्रभर ते दोघेजण वेगळेच पडून राहिले.

सकाळी उठून दोघंहीजणं कामाला गेले.

सोडवणारे देव नसविरीत असतात. ○



# हा प्रश्न मुळींच "गुंतागुंतीचा" नाहीं..!



"प्रकाशचें माक्याचें तेल" हा त्यावर साधा, सरळ आणि खात्रीचा उपाय आहे. तें नियमित वापरण्यास सुरुवात करा आणि पहा .... हा प्रश्न कधीं उद्भवलाच नाहीं, असें आपणांस वाटेल! केंस गळावयाचें तर थांबतिलच, शिवाय तजेलदार, निरोगी नि लांबसडक केशसंभार आपल्या सौंदर्यांत मोलाची भर घालील.

## प्रकाशचें
# माक्याचें तेल




**प्रकाश ट्रेडिंग कंपनी**
गोखले रोड (नॉर्थ) दादर, मुंबई २८

मध्यपूर्वेच्या मरुभूमीवर सांडलेल्या रक्ताश्रूंची कहाणी




२ नोव्हेंबर १९५६. इस्रायल-अरब युद्धाला तोंड लागून आठ दिवसही उलटले नव्हते. २९ ऑक्टोबरला रात्री इस्रायलचे सुमारे ४०० छत्रीधारी सैनिक इजिप्त सरहद्दीलगतच्या सिनायच्या वाळवंटातील मिटला खिडी ( उतरले होते. त्यांची कोंडी होण्यापूर्वी, सिनाय वाळवंटाचा कबजा करण्यासाठी इस्रायलच्या फौजा तीन दिशांनी सरहद्द ओलांडून वेगाने निघाल्या होत्या. नासरशहाला, इस्रायल, सिनायवर चढाई करील अशी सुतराम कल्पना नव्हती. चढाईपूर्वी आठवडाभर, भांडण जॉर्डनशी आहे, असा देखावा इस्रायलचे पंतप्रधान बेन गुरियान व संरक्षण प्रमुख मोशे दायान यांनी निर्माण केला होता. इजिप्तच्या फौजा तर वाळ वंटातून जवळ जवळ पळत सुटलेल्या होत्या.

ले खां क



सुवेझ कालव्याच्या दिशने निघालेल्या इस्रायलच्या फौजांना, वाटेवरच्या एल्-अरिश या गावी मोठी झुंज द्यावी लागेल, अशी इस्रायली सैनिकांची अपेक्षा होती. परंतु २ नोव्हेंबर १९५६ ला इस्रायली सैनिक एल-अरिश शहरात शिरले तेव्हा इजिप्तच्या फौजांनी तेथून पळ काढलेला होता. त्या दिवशी पहाटे इजिप्तहून दोन आगगाड्या एल-अरिशला आल्या. अरिश ते कंतारा या मार्गाने सैन्य पायी पळत होतेच. आलेल्या आगगाड्यांतून व कंताराच्या दिशेने, वाहनांतून मुख्यतः निसटले, ते सर्व सेनाधिकारी! सैनिक पायीच रखडत निघालेले होते. परंतु, वाहनांनी पळू पाहणाऱ्या अधिकाऱ्यांनीच, इस्रायलच्या विमानदलाचे लक्ष वेधून घेतले, व पायी फरपटणाऱ्या अरब सनिकांच्या टोळ्यांच्या वाटेलाही १

विमानदल गेले नाही.

अधिकाऱ्यांनी वंचित केलेल्या या इजिप्तच्या सैनिकांनी, सर्व शस्त्रास्त्रे व लष्करी सामानसुमान शहरातच टाकले होते. लष्करी बूटही पळताना अडचण नको म्हणून त्यांनी काढून टाकले होते. वाळवंट रेताड होते. ते तुडवताना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष होते. नशिबाने समुद्रकिनाऱ्याने मैलच्या मैल खजुराची झाडे लगडलेली होती. एका दगडात खजुराची पिकली फळे खाली कोसळत होती. लष्करातील उपासातही अखेर खजूर उपयोगी पडत होता! आकाशातून इस्रायली वैमानिक, पांढऱ्याशुभ्र गंजिफाकांतल्या या अरब सैनिकांचा लोंढा कुतुहलाने पाहत होते.

एल–अरिश शहरांत कसलीही नासधूस केलेली नव्हती किंवा घातपात देखील केलेला नव्हता. लष्करी सामानाची लहानसहान कोठारे फक्त आगी लावून नष्ट करण्यात आलेली होती, ती धुमसत होती. परंतु जे लष्करी साहित्य इस्रायलच्या हाती लागले, त्या मानाने हे जाळण्यात आलेले सामानसुमान फारच अल्प होते. शहर खाली करण्याची आज्ञा सुटताच प्रत्येकजण हातातले काम जसेच्या तसे टाकून पळत सुटलेला होता. कारण रुग्णालयातील देखावा फारच भीषण होता. शस्त्रक्रियेच्या मेजावर, एक पाय कापून काढण्यात आलेला सैनिक तसाच गतप्राण झालेला होता. पाय कापून होताच जखम न बांधताच डॉक्टर व नर्स सर्वजण पळालेले होते. सैनिक मेलेला होता तो रक्तस्रावाने! रुग्णालयात जे अपंग होते त्यांना तसेच टाकून, सर्व रुग्णालयाचा अधिकारीवर्ग अॅम्ब्युलन्स गाड्यांतून सूं–बाल्या करता झाला होता. आत एकही डॉक्टर तर सोडाच, पुरुष नर्सही राहिलेला नव्हता. अत्यवस्थ असलेले १८ रुग्ण त्याच दिवशी सकाळी मरण पावले ते डॉक्टर अभावी.

एल–अरिश–कंतारा रस्त्यावर तर लष्करी वाहनांनी झिम्मड उडवलेली होती. गाड्या एकमेकांना धक्के मारीत होत्या–उलटत होत्या. अबू अग्येलाच्या विमानतळाच्या दिशेने निघालेल्या लष्करी वाहनांवर, इस्रायली विमानदलाने हल्ला चढवला होता. रॉकेटस् व बंदुका यांनी केलेल्या हल्ल्यात या रस्त्यावर उध्वस्तता निर्माण झाली होती.

जनरल दायान व त्याचे सहकारी एल–अरिश शहरात पोचले, तेव्हा इस्रायली फौजा सुवेजच्या दिशेन पळणाऱ्या अरब सैनिकांच्या पाठीवर सुटलेल्या होत्या. एक ब्रिगेड, शहराची व्यवस्था लावण्यासाठी मागे राहिली होती.

जनरल दायान त्या सैनिकांना दिसताच काही सैनिकांनी त्याला घेरले. कुणी त्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी, शहरात हाती लागलेल्या इजिप्तच्या अधिकाऱ्यांच्या निरनिराळ्या वस्तू पुढे केल्या. लष्करी नकाशे, पळालेल्या सैनिकांची सेवा–पुस्तके, माग टाकलेल्या सिगारेटच्या पेट्या, जे कुणी काही पुढे करील, त्याच्यावर दायान स्वाक्षऱ्या करत होता. दायान ज्या चौकात उभा होता त्या चौकात एका केस

कापण्याच्या दुकानाच्या बाहेर, गमाल अब्दुल नासरचे एक मोठे रंगीत भित्तीचित्र लोंबत होते. एका कनिष्ठ इस्रायली सेनाधिकाऱ्याने ते चित्र ओढून काढले व मोशे दायान पुढे धरून सांगितले–

" यावर स्वाक्षरी करा. आजचा दिवस केवळ लष्करी विजयाचा नाही ! आज २ नोव्हेंबर आहे. बाल्फोर जाहीरनाम्याचा आज वाढदिवस आहे ! "

हा बाल्फोर जाहीरनामाच मध्यपूर्वेतल्या सर्व कटकटींचे मूळ कारण होता. हा बाल्फोर कोण होता ? ज्यू नव्हता की अरब नव्हता. ए. जे. बाल्फोर हा होता इंग्रजी माणूस. त्याच्या नावाने निघालेला हा जाहीरनामा होता कसला ? ह्या जाहीरनाम्याचा पंचनामा करण्यापूर्वी थोडा मागला इतिहास माहीत हवा !


## सत्तास्पर्धेचा आखाडा

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून मध्यपूर्वेची भूमी हा सत्तास्पर्धेचा आखाडा झालेला होता. अरब जगताचा विस्तार हा मोरोक्कोपासून तो इराणच्या आखातापर्यंत असा ४,००० मैल पसरलेला आहे. भूमध्य समुद्राच्या चार बाजूंपैकी दोन बाजू या भूमीला भिडलेल्या असल्याने, अतिपूर्वेकडील भारत-ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश या देशांशी होणाऱ्या व्यापाराची नाडी या प्रदेशातून वाहते. म्हणूनच अरब राष्ट्रे ही लष्करी दृष्टया कमकुवत असूनही, त्यांच्या ताब्यातील प्रदेश मात्र अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे.

इतिहासातील सर्वांत मोठी साम्राज्ये म्हणजे ख्रिस्तसनापूर्वीचे पर्शियन साम्राज्य, ग्रीकांचे साम्राज्य, रोमन साम्राज्य, अरब खलिफांचे साम्राज्य आणि ब्रिटिश साम्राज्य ही होत. या सर्व साम्राज्यांच्या विस्ताराचे आणि दीर्घायुष्याचे मर्म हे होते, की त्यांनी इजिप्त देशावर व भूमध्य समुद्रावर कबजा केलेला होता.

रोमन लोकांनी सहाशे वर्षे युरोपवर अधिराज्य चालवले ते भूमध्य समुद्राच्या लाटांवरून. अरब खलिफांनी एकेकाळी सिरिया, इजिप्त, उत्तर आफ्रिका, स्पेन, सिसिली, माल्टा, दक्षिण इटाली हा सर्व टापू कबजात घेतलेला होता.

–आणि ज्या सत्ताधीशांना भूमध्य समुद्राच्या पाण्यावर स्थिरता मिळवता आली नाही, त्यांची अवस्था काय झाली ? १७९८ मध्ये नेपोलियन बोनापार्ट आपल्या पराक्रमी आयुष्याच्या उंबरठ्यावर होता. सर्व युरोप त्याच्या विरुद्ध गेलेले होते, परंतु नेपोलियनने झडपेसरशी इजिप्तचा कबजा केला. त्याच्या चाणाक्ष बुद्धीला याचे आकलन झाले होते, की युरोपला टाचेखाली ठेवायचे तर इजिप्तवर हुकूमत बसायलाच हवी. परंतु नेपोलियनने मोठी चूक केली, भूमध्य समुद्रावर आरमारी वर्चस्व बसवण्यापूर्वीच त्याने इजिप्त जिंकले ! नाईलच्या लढाईत त्याचा ब्रिटिश आरमाराने पराभव करताच नेपोलियनच्या आकांक्षांची मृत्युघंटा वाजू लागली. वाटर्लूच्या पराभवानंतर सेंट हेलेना बेटात कैदी म्हणून दिवस कंठीत असताना, जेव्हा जेव्हा आपल्या लष्करी जीवनाचा तो आढावा घेत असे तेव्हा




□

तेव्हा तो विषादाने म्हणत असे– "मला मध्यपूर्व लाभली नाही म्हणून माझा नशिबाचा फासा उलटला!" हेलेना बेटाचा ब्रिटिश गव्हर्नर सर हडसन याला नेपोलियनने सांगितले होते– "इजिप्त हा जगातला महत्त्वाचा देश आहे!" युरोपखंड पादाक्रांत केलेला हा चक्रवर्ती सम्राट अखेर भूमध्य समुद्राच्या खारट लाटांत गुदमरला.

गेली दोन्ही महायुद्धे दोस्तांनी जिंकली, कारण दोन्ही युद्धांत इंग्लंडने इजिप्त-वरची पकड कायम ठेवली होती. हिटलरने युरोपचा घास घेतला होता. परंतु इजिप्तचे हाड चघळताना ते त्याच्या घशात अडकवण्याची कामगिरी चर्चिल यांनी पार पाडली. १९४० साली ब्रिटनवर जर्मनांच्या स्वारीचा अहोरात्र धोका असताना, चर्चिल यांनी त्याही परिस्थितीत केपला वळसा घालून आफ्रिकेत इजिप्तला सतत सैन्य मदत चालू ठेवली ती, याच हिशेबाने की अखेर हिटलरचे मरण त्याला इजिप्तचा कबजा न करू देण्यातच आहे. म्हणूनच गेल्या महायुद्धात पहिली सलामी झडली ती एल-अलमीन येथे. अेल-अलमीनलो जर्मनांचा जो पराभव झाला, तीच त्यांच्या अंतिम पराभवाची नांदी ठरली! हिटलरनेही भूमध्य समुद्राचे महत्त्व ओळखून आपला महत्त्वाचा सेनानी रोमेल याला आफ्रिकेच्या वाळवंटातच बहुतांशी झुंजवला.

आणि गेली दीडशे वर्षे भूमध्य समुद्रात चंचुप्रवेश करण्यासाठी रशियाची धड-पड चालू आहे. अरब राष्ट्रांना आपल्या कच्छपी लावण्यात रशियाचा हाच प्रमुख राजकारणी डाव तूर्त आहे.

पहिल्या महायुद्धात अरब जगतावरचे तुर्की साम्राज्य गडगडले, परंतु त्याचा फायदा क्रांतिग्रस्त रशियाला घेता आला नाही. या मध्यपूर्व भागात एक सत्ता-पोकळी अचानक निर्माण झाली आणि शांतता करारानुसार या भागाचे मुखत्यार म्हणून इंग्लंड व फ्रान्स या अरबी घोड्यांवर स्वार झाले. सिरिया व लेबानन या प्रदेशांची जोखीम फ्रेंचांनी घेतली व इराक, ट्रान्सजॉर्डन, व पॅलेस्टाईन हे प्रदेश ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली देण्यात आले. अरबांच्या ठिकाणी स्वत्व व स्वामित्वाची आकांक्षा त्या वेळी प्रादुर्भूत होण्यास सुरुवात झालेली होती, परंतु इंग्लिश व फ्रेंच साम्राज्यवाद्यांचे ग्रह त्या वेळी उच्चीचे असल्याने, सर्व प्रदेश त्यांनी लाटला आणि यांत फारसे चुकले असेही कुणाला वाटले नाही.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून मध्यपूर्वेच्या या प्रदेशाला आणखी महत्त्व प्राप्त झाले ते तेथील भूमीत सापडलेल्या तेलाच्या साठ्यामुळे! अँग्लो-पर्शियन तेल कंपनी १९०१ मध्ये स्थापन झाली, व कंपनीला ५० वर्षे पुरी होण्यापूर्वीच ३२ मिलियन टन एवढे तेल वर्षाला ही कंपनी मिळवू लागली. १९१४ मध्ये तुर्कांच्या कचाट्यातून सुटलेला कुवेत, हा ब्रिटिशांच्या ओंजळीत आला. ५०-५० टक्के भांडवल घालून इंग्लंड व अमेरिकेने तेथे तेल कंपनी स्थापन केली. कुवेतच्या सुलतानाला वार्षिक १००,००,००० पौंडांचा तनखा सुरू झाला. बहेरिन, मस्कत, ओमान यांच्या सुलतानांनाही असेच लहान-मोठे तनखे अँग्लो-अमेरिकनांनी दिले. १९०२ ते १९२६ या कालात बहुतेक अरेबिया हा राजे इबन सौद यांच्या अंमला-खाली गेला. इबन सौद याने मुसलमानी धर्मावर अधिष्ठित अशी कडवी सत्ता प्रस्थापित केली. तरीही सौदचे राज्य दरिद्रीच होते. १९३० साली अमेरिकेची

स्टॅन्डर्ड ऑईल कंपनी इबन सौदच्या वाळवंटात प्रस्थापित झाली, आणि मग १९३८ पर्यंत इबन सौदची शान पुरी पालटून गेली. कुवेतच्या सुलतानाहून अधिक तनखा इबन सौद यांना मिळू लागला. सर्व सुलतान मंडळी खुष होती. असंख्य विलासात पैसा उधळला जाऊ लागला. काहींना असंख्य बायका होत्या. शंभर शंभर पोरं होती. सर्व जनानखाने पाळण्यांनी मरू लागले. इबन सौद १९५३ साली मरण पावला तेव्हा मरताना चिंताग्रस्त होता! अरेबियात मुसलमानी जीवनाचा सेतू कोसळू लागला होता. पैसा आणि तोही श्रमाशिवाय उपलब्ध झाल्याने, सर्वजण फक्त विलासात दंग होते. इंग्लिश व अमेरिकन लोक रस्ते बांधीत होते, शाळा बांधून देत होते, रुग्णालये उभी करत होते. सुलतानी प्रजा तशी आनंदात होती. त्यांना मिळणाऱ्या पैशाच्या कितीतरी पट पैसा परदेशात जात होता; याची मात्र त्यांना शुद्ध नव्हती. प्रयत्ने – अरबांना रगडून अँग्लो–अमेरिकन मंडळी वाळूतले तेल उपशीत होती. अँग्लो–अमेरिकन जीवनपद्धतीचा परिणाम अरब जीवनावर मोठ्या प्रमाणावर होत होता. परक्या स्वामींची सेवा करताना, अरबांचे स्वत्व संपत चालले होते.

## १५ ओळींचे पत्र

पहिल्या महायुद्धाच्या ज्वाला भडकल्याबरोबर अरब जगतातल्या निद्रिस्त राष्ट्रीय शक्तींना लहान लहान धुमारे फुटू लागले. समान मुसलमानी धर्म आणि अरबी भाषा या दोन गोष्टींमुळे सर्व अरब एक ही भावना काही प्रमाणात सर्वांच्या मनात होतीच. या भावनांना फुंकर घालून फुलविण्यासाठीही प्रमुख प्रयत्न केले ते काही इंग्लिश–माणसांनीच! ब्रिटिशांच्या राजवटीची ही मोठी गंमत आहे, की जुलूमही तेच करतात आणि जुलुमाविरुद्ध लढायलाही तेच शिकवतात! भारतात जसे कर्झन झाले तसाच एखादा ह्यूमसाहेब आला आणि राष्ट्रसभेची स्थापना करून गेला! काँग्रेसच्या पितृस्थानी आहे तो एक गोरा साहेबच. अरबांना संघटित व स्वाभिमानी बनवण्याकरिता प्रमुखतः प्रयत्न केले ते लॉरेन्स, सर रोनाल्ड स्टोरर्स व जनरल अॅलेनबी या इंग्लिश माणसांनीच.

आपली अधिसत्ता अबाधित राहावी व राष्ट्रवादी कायमचे दुबळे राहावे, यासाठी जिंकलेल्या प्रदेशात तेथील जीवनाशी एकरूप न होण्यासारखी जी जमात असेल, तिला हाताशी धरून राष्ट्रवाद्यांच्या पायात कायमचा अडसर व देशात विद्वेषाचे आणि विद्रोहाचे धगधगते कुंड कायमचे निर्माण करण्याचा खेळ, ज्या प्रमाणे भारतात ब्रिटिश १५० वर्षे खेळले त्याचप्रमाणे अरबांच्या देशातही खेळले! अरबांच्या भूमीत ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र ब्रिटिशांनी १९४८ साली निर्माण केले आहे. या दिशेने त्याने टाकलेले पहिले पाऊल म्हणजे २–११–१९१७ रोजी त्या वेळचे ब्रिटीश परराष्ट्रमंत्री ए. जे. बाल्फोर यांनी जेरुसलेम येथील ब्रिटिश हायकमिशनर लॉर्ड रूथर्सचाईल्ड यांना लिहिलेले १५ ओळींचे पत्र! बाल्फोरचा जाहीरनामा–

जाहीरनामा असा ज्याचा ज्यूनी गवगवा केला आहे, ते आहे सारे १५ ओळींचे पत्र–एका इंग्रजी माणसाने दुसऱ्या इंग्रजी माणसाला लिहिलेले !

ज्या परिस्थितीत हे पत्र लिहिले गेले ती मोठी विचित्र परिस्थिती होती. १९१७ मध्ये इटलीचा पराभव झाला, फ्रेंच सैन्याने बंड केले आणि झारचा रशिया कोसळला. अशा या निराशाजनक परिस्थितीत ज्यू जमातीला पॅलेस्टाईनमध्ये मातृभूमी देण्याचे वचन देणारें पत्र लिहायला ब्रिटीशांना फुरसत तरी कशी झाली ?

याचे उत्तर असे आहे की जेव्हा बाल्फोर साहेबाने हे पत्र लिहिले, तेव्हा ब्रिटिश सरकारच्या पॅलेस्टाईनमधील प्रतिनिधीला मंत्रिमंडळाचा एक निर्णय कळवणे एवढाच उद्देश होता. दैनंदिन सरकारी कामकाजाचे हे एक साधेसुधे पत्र होते– पत्र असे होते–

परराष्ट्र मंत्रालय
नोव्हेंबर २, १९१७.

प्रिय लॉर्ड रुथर्स्चाईल्ड्–

झिओनिस्ट ज्यूंच्या आकांक्षांना सहानुभूती जाहीर करणारे जे निवेदन ब्रिटिश मंत्रिमंडळाला सादर करण्यात आले व ज्याला मंत्रिमंडळाने संमती दिली आहे, ते निवेदन ब्रिटिश राज्यांच्या सरकारच्या वतीने तुम्हाला कळविण्यास मला फार आनंद होतो आहे.

" पॅलेस्टाईनमध्ये ज्यू जमातीला मातृभूमी देण्यात यावी या विचाराशी ब्रिटिश राज्याचे सरकार सहानुभूतीपूर्वक सहमत आहे; व हे घडवण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन ब्रिटिश सरकार देत आहे. मात्र एक गोष्ट नीट ध्यानात घेण्यात यावी की पॅलेस्टाईनमध्ये ज्या ज्यू व्यतिरिक्त जमाती आहेत किंवा इतर देशांत जी ज्यू जमात नांदते आहे, त्यांच्या सामाजिक व धार्मिक अधिकारांना यामुळे कसलाही उपद्रव होता कामा नये."

हे निवेदन आपण झिओनिस्ट फेडरेशनला कळवल्यास मी आपला आभारी होईन––

आपला
ए. जे. बाल्फोर

हे पत्र दिसायला छोटे व साधे असले तरी त्याच्या अंतरी नाना कळा आहेत ! यातली योग्य ती 'कळ' योग्य वेळी अचूक दाबून, मध्यपूर्वेत आपले हितसंबंध व सुवेज कालव्यावरील वर्चस्व अबाधित ठेवण्याचे राजकारण यात साधलेले आहे. कारण पॅलेस्टाईनमध्ये ज्यू राष्ट्र जन्माला येताच, देशोधडीला लागलेले व युरोपात सैरावैरा पळालेले कर्तृत्ववान व हुशार ज्यू पॅलेस्टाईनकडे धाव घेतल्याशिवाय राहणार नाहीत, हे काय ब्रिटिशांना कळत नव्हते ? पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची गर्दी

उसळल्यावर तिथल्या मागासलेल्या अरबांना तेथून हुसकल्याखरीज, ज्यू जीवन तिथे सुखाने नांदूच शकणार नाहीत ही गोष्टही काय साहेबांना समजत नव्हती ? अरब हलवायाच्या घरावर हे ज्यू तुळशीपत्र, इतक्या सहजतेने इंग्लीश माणसाने ठेवले याचे तात्कालीक कारण असे होते, की यामुळे दोस्तांच्या जयाच्या आशा वाढणार होत्या. पेटलेल्या महायुद्धातला जय हा अधिक महत्वाचा होता. कारण सगळचा ब्रिटिश साम्राज्याचेच भवितव्य संकटात आले होते

वस्तुत: तुर्कस्तानविरुद्ध नोव्हेंबर १९१४ मध्ये युद्ध जाहीर होताच पॅलेस्टाईन देऊन ज्यू जमातीला वश करावे ही कल्पना लॉईड–जॉर्जपुढे मंत्रिमंडळाचे एक मंत्री हर्बट सॅम्युएल यांनी मांडली. लॉईड जॉर्ज यांना ही कल्पना तत्काळ आवडली, कारण ख्रिश्चन व मुसलमानांकडून ज्यूंच्या ज्या कत्तली झाल्या व ज्यू जमात जगात वणवण भटकू लागली या घटना मानवतेवरील मोठा काळीमा आहे असेच या सहृदय माणसाला मनोमन वाटत होते परंतु त्या वेळी लॉईड जॉर्ज काही पंतप्रधान नव्हता ! १९१७ साली दृश्य पालटले होते. लॉईड जॉर्ज तप्रधान झालेला होता. हर्बर्ट सॅम्युएल मात्र लॉर्ड ॲस्विचक्विथ बरोबरच मंत्रिमंडळातून गेलेला होता. परराष्ट्रखाते बाल्फोरकडे होते. १९०३ साली बाल्फोर स्वत: पंतप्रधान होता, तेव्हापासून ज्यूंच्या बाबतीत काहीतरी भरीव करण्याची इच्छा त्याला होती. त्या वेळी त्याने ज्यू जमातीला युगांडामध्ये वसतिस्थान देऊ केले होते. परंतु ज्यूंनी ही गोष्ट मनावर घेतलीच नाही. ज्यूंचा हट्ट होता – भूमी हवी ती आमच्या पुरातन भूमीत पॅलेस्टाईन मध्येच.

१९१७ च्या ऑक्टोबरात ब्रिटिश मंत्रिमंडळाला बातम्या मिळत होत्या की रशिया शरणागती पत्करून जर्मनांशी तह करण्याच्या विचारात आहे. रशियन ज्यूंपैकी बहुसंख्य ज्यू हे पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र मागणाऱ्या, वाईझमन यांच्या नेतृत्वाखालील झिओनिस्ट पंथाचे होते. जर ज्यू जमातीला पॅलेस्टाईनमध्ये भूमी देऊ केली, तर कदाचित जर्मनीविरुद्ध लढण्यासाठी रशियातील ज्यू जोर करतील अशी एक अटकळ होती. मंत्रिमंडळाच्या काही सभासदांचा हिशेब असा होता की–मध्यपूर्वेत आपल्या साम्राज्याच्या स्थिरतेसाठी, इंग्लंडच्या आशीर्वादाने निर्माण झालेले ज्यू राष्ट्र हे अरबांपेक्षा इंग्लंडला अधिक मदत करू शकेल व अरबांवर यामुळे इंग्लंडची अधिसत्ता अधिक बळकट होऊ शकेल म्हणजे पंतप्रधान लॉईड जॉर्ज भूतदयेपोटी, काही साम्राज्यवादी मंत्री इंग्रजी साम्राज्याच्या स्वार्थासाठी, तर परराष्ट्रमंत्री बाल्फोर हा युद्ध जिंकण्याच्या दृष्टीने एक पाऊल म्हणून ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये भूमी देण्यास अनुकूल झालेले होते.

अखेर ३१ ऑक्टोबर १९१७ या दिवशी मंत्रिमंडळाच्या संमतीसाठी बाल्फोर निवेदन ठेवले गेले व मंत्रिमंडळाची संमती मिळून २ नोव्हेंबर १९१७ ला बाल्फोर याने हे निवेदन पॅलेस्टाईनमधील ज्यूंना कळावे म्हणून पत्राने लॉर्ड रुथर्सचाईल्ड या

पॅलेस्टाईनमधील ब्रिटिश हायकमिशनरला धाडले.

बाल्फोरच्या जाहीरनाम्याचा असा फारसा गाजावाजा न होता जन्म झाला. या आश्वासनामुळे पुढे मध्यपूर्वेत रक्ताश्रूंचा कायम खेळ सुरू होणार आहे याची यथायोग्य कल्पना सर्वांना नसावी.

ज्या अरबभूमीत नवे ज्यू राष्ट्र जन्माला घालण्यासाठी, इंग्लंडने या निवेदनानुसार जबाबदारी पत्करली, त्या पॅलेस्टाईनमध्ये १९१७ मध्ये परिस्थिती काय होती? पॅलेस्टाईनमध्ये ज्यू व अरब जनता सुखासमाधानाने राहत होती. ज्यू होते फक्त ७ टक्के व अरबांची लोकसंख्या ९३ टक्के होती. आता हे चित्र पालटणार होते.

युद्ध संपले. अमेरिकेच्या अध्यक्षांनी १४ शांतितत्त्वे जाहीर केली. यात एक होते– "तुर्कांच्या अधिपत्याखालून मुक्त केलेल्या प्रदेशातील जनतेला, आपलयाला कोणते सरकार हवे याचा स्वयंनिर्णय करता येईल."




बृहन्मुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल अ‍ॅण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू अ‍ॅण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

पॅलेस्टाईन मुक्त झाले होते. तेथील ९३ टक्के अरबांना हा स्वयंनिर्णयाचा हक्क मिळाला का? मिळाला असता तर तेथे ज्यू राष्ट्र कसे निर्माण झाले असते? दोस्तांच्या परस्परविरोधी आश्वासनाचे हे स्पष्ट उदाहरण होते.

युद्ध संपताच ज्यूंचा लोंढा पॅलेस्टाईनकडे सुरू झाला. १९२० साली ८००० ज्यू आले. याच वर्षी पहिला अरब–ज्यू जातीय दंगा पॅलेस्टाईनमध्ये झाला. यात ५ ज्यू मारले गेले व २०० जखमी झाले. पुढल्या वर्षी या दंग्याची उग्रता वाढली. मे १९२१ मध्ये झालेल्या दंग्यात ४६ ज्यू ठार झाले व शेकडो जखमी झाले. ऑगस्ट १९२९ साली दु:खी–भिंतीपाशी उसळलेल्या दंग्यात १३३ ज्यू ठार झाले; परंतु ११६ अरबही ठार झाले. वर्षावर्षाला ज्यूंचा आकडा फुगू लागला. तरी अजून ज्यू–अरब संबंध किरकोळ दंग्यापलीकडे फारसे बिघडले नव्हते. १९३० साली जर्मनीत हिटलरने सत्ता काबीज करताच मात्र, युरोपातून ज्यूंची पळापळ सुरू झाली पॅलेस्टाईनमध्ये येणाऱ्या ज्यूंची संख्या इतकी वाढली की अरबांनी आता प्रतिकार सुरू केला. ब्रिटिश सरकारने पॅलेस्टाईनमध्ये येणाऱ्या ज्यू नागरिकांवर बंधने घातली. निराश्रित ज्यूंनी भरलेली जहाजे, जवळ जवळ बुडण्याच्या अवस्थेत कशी तरी पॅलेस्टाईनपर्यंत पोचत असत. ब्रिटिश अधिकारी पोटे खपाटीला गेलेल्या या निराश्रितांना पॅलेस्टाईनमध्ये उतरू देत नसत. मग चोरूनमारून गलबतांतून ज्यू पॅलेस्टाईनमध्ये घुसतच असत. ब्रिटीशांची पंचाईत झाली. ज्यू लोकांना पॅलेस्टाईनमध्ये निमंत्रण दिले म्हणून अरबांचा क्रोध व ज्यू निराश्रितांना अनिर्बंधपणे पॅलेस्टाईनमध्ये येऊ देत नाही म्हणून ज्यू जमातीचा रोष अशा कात्रीत ब्रिटिश सापडले.

जगात ब्रिटिशविरोधी राष्ट्रे कांगावा करू लागली, की– बिचाऱ्या ज्यू लोकांना ब्रिटनच आता पॅलेस्टाईनमध्ये येऊ देत नाही! या कांगावखोर राष्ट्रांनी आपल्या देशाचे दरवाजे भूतदयेपोटी ज्यूंना खुले केले की काय? छे: छे: –त्यांच्या देशाच्या सरहद्दी ज्यूंना बंदच होत्या! उलट आपल्या देशातल्या ज्यूंना ही राष्ट्रे सांगत होती – तिकडे पॅलेस्टाईनमध्ये तुमचे राष्ट्र होणार आहे तिकडे जा. देशाशी इमानी न होऊ शकणाऱ्या जमाती कुठल्याच देशाला आपल्या देशात नको असतात. त्यांना हाकलण्याची ही सुसंस्कृत पद्धत होती. !

पॅलेस्टाईनमध्ये अरबांचा विरोध आता उग्र स्वरुपात व्यक्त होऊ लागला. जेरुसलेमच्या मुफ्तीच्या नेतृत्वाखाली घातपाती चळवळी सुरू झाल्या. १९३६ मध्ये अरबांनी सार्वत्रिक संप पुकारला. गाड्या उडवल्या व पोलिसांचेही खून पाडले. दंगलो होताच चौकशीसाठी ब्रिटिश सरकारने आर्थर पील यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ धाडले. मुफ्ती–पील वाटाघाटी जानेवारी १९३७ साली झाल्या. पील साहेबाने पॅलेस्टाईनच्या फाळणीचे पिलू सोडले. ज्यू नेता बेन गुरीयान याने ताबडतोब फाळणी मान्य असल्याचे जाहीर केले. फाळणी याचा अर्थ अरब भूमीत

ज्यूंचे मोडके तोडके का होईना परंतु स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र जन्माला यणार होते अरब अधिकच पिसाळले. १९३६ ते १९३८ ही वर्षे अशाच अस्थिर परिस्थितीत गेली १९३९ साली ब्रिटिश सरकारने पॅलेस्टाईनमध्ये काही प्रमाणात शांतता प्रस्थापित केली आणि इतक्यात २ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने युरोपात दुसरे महायुद्ध पेटवले.

नाझी गरुडाचे पंख युरोपात संपूर्णपणे पसरण्याची शक्यता दिसू लागताच, जर्मनी सोडून इतर देशांत तग धरून राहिलेल्या ज्यूंचीही पळापळ होऊन शक्य त्यांनी पॅलेस्टाईनचा रस्ता धरला. परंतु आता इंग्लंडला साम्राज्य रक्षणासाठी अरबांची दोस्ती आवश्यक होती. अरबांना खूष करण्यासाठी १९३९ मध्ये इंग्लंडने पॅलेस्टाईन मध्ये अधिक ज्यूंना येण्यास कायमची बंदी जाहीर केली. अरबही गांगरले होते, मुसोलिनीच्या फौजा आपल्यावर कोसळल्या तर इंग्लंडच उपयोगी पडणार हे त्यांना समजत होते. पॅलेस्टाईनचा प्रश्न तूर्त खुंटीवर टांगणे इंग्लंडला व अरब राष्ट्रांना सोयीचे होते, व हा प्रश्न काही काळ दृष्टिआड झाला.

## ज्यूंचे सैनिकीकरण

संकटात सापडलेले इंग्लंड रातोरात अरबांचे कैवारी झाले आहे, परंतु याच परिस्थितीचा फायदा ज्यूंच्या हितासाठीही उचलता येईल. ही गोष्ट डॉ. वाईझमन या ज्यू नेत्याच्या लक्षात आली. विन्स्टन चर्चिल यांचेशी त्याचे घनिष्ठ संबंध होते. ज्यूंना आज ना उद्या अरबांशी झुंजावेच लागेल, तेव्हा ज्यू सैन्य तयार हवे. या हिशेबाने डॉ. वाईझमन याने ३०-४० हजार ज्यू तरुण व तरुणी यांना इंग्लंडच्या सैन्यांत दाखल करून घेतले. पुढे जन्माला येणाऱ्या इस्त्रायलची सेना सिद्ध होऊ लागली ! कुणीही वाइझमनची 'रिक्रूटवीर' म्हणून हेटाळणी केली नाही. केवळ अस्तित्वासाठीही प्रसंगी रक्तपात करावा लागतो. अशा पुढे होणाऱ्या अटळ रक्तपाताची ही तयारी होती. डॉ. वाईझमन यांची रासायनिक प्रयोगशाळांचा सल्लागार म्हणून चर्चिल यांनी नेमणूक करून घेतली.

अरब दंगेखोरांपासून ज्यूंचे रक्षण करण्यासाठी 'हॅगनाह' ही भूमिगत सशस्त्र संघटना निर्माण झालेली होतीच. जेव्हा रोमेलची सैन्ये सुवेजच्या दिशेने सरकू लागली तेव्हा ही ज्यू भूमिगत सेना उघडपणे ब्रिटिशांना मिळाली. अशा रीतीने पलेस्टाईनमधील भूमिगत संघटनेलाही युद्धानुभव प्राप्त झाला.

दुसरे महायुद्ध संपले, तेव्हा ९५,००० एवढी ब्रिटिश फौज पॅलेस्टाईनमध्ये अंतर्गत शांतता राखण्यात अयशस्वी ठरत होती. सेनेतून मोकळे झालेले हजारो ज्यू तरुण तरुणी, रणांगणाचा अनुभव घेऊन पॅलेस्टाईनमध्ये नागरीक झालेले होते. पॅलेस्टाईनमध्ये आता पाय रोवलेल्या ज्यू राष्ट्रवाद्यांनी ब्रिटिशांनीच चालते व्हावे म्हणून घातपाती चळवळ हाती घेतली. जेरुसलेममध्ये किंग डेव्हिड हॉटेलच्या इमारतीत ब्रिटिशांचे सचिवालय होते. ही इमारत जुलै १९४६ मध्ये 'हॅगनाह' क्रांतिकारकांनी

बॉम्ब स्फोटांनी उध्वस्त केली.

ज्यूंचा जोर वाढू लागताच, ७ मुस्लिम राष्ट्रांनी इजिप्तच्या नेतृत्वाखाली मार्च १९४५ मध्ये 'अरब लीग' स्थापन केली. ज्यू मालावर बहिष्कार पुकारण्यात आला. अरब तेवढे एक ही भावना काही प्रमाणात फैलावली.

जुलै १९४५ मध्ये चर्चिल मंत्रिमंडळाचा पराभव होऊन मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर आलेले होते. इंग्लंडचा परराष्ट्रमंत्री अर्नेस्ट बेव्हन होता. त्याची खात्री पटली की जर पॅलेस्टाईनमध्ये शांतता व कायद्याचे राज्य राखण्यासाठी अमेरिका प्रत्यक्ष सहकार्य करणार नसेल, तर पॅलेस्टाईनमधून ब्रिटिशांनी काढता पाय घेणेच हिताचे आहे. अध्यक्ष ट्रुमन यांना पॅलेस्टाईनमध्ये प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे याची फारशी पर्वा नव्हती. त्यांच्या डेमॉक्रेटिक पक्षाला, अमेरिकन ज्यू धनिकांचा पैसा हा अधिक महत्वाचा होता. अमेरिकेतील ज्यू धनिकांना खूष करण्यासाठी, अध्यक्ष ट्रुमन यांनी, बेव्हनच्या इशाऱ्यांकडे लक्ष न देता, ऑक्टोबर १९४६ मध्ये पॅलेस्टाईनमध्ये अधिक एक लाख ज्यूंना प्रवेश द्यावा असे जाहीर केले ! बेव्हनसाहेब खवळले व त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये ट्रुमनच्या या आगाऊपणावर प्रखर हल्ला चढवला. याचा अर्थ असा होता की पॅलेस्टाईनमध्ये अधिक अधिक ज्यू ब्रिटिशविरोधी होऊन, तेथून ब्रिटिश सरकारने काढता पाय घ्यावा अशीच अमेरिकेची इच्छा होती.

उपजत शहाणपणा हा इंग्लिश माणसाचा मोठा गुण असल्याने, फेब्रुवारी १९४७ मध्ये इंग्लंडने असे जाहीर केले की पॅलेस्टाईनचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसघाकडे सुपूर्त करून, ब्रिटन आपल्या फौजा पॅलेस्टाईनमधून काढून घेईल. ही घोषणा म्हणजे अरब–ज्यू यांना आता काय त्या मारामाऱ्या व कापाकापी सुरू करा, असा जणू इशाराच होता.

हिंदु–मुसलमान परस्परांना कंठस्नाने घालीत असताना जशी भारतातून ब्रिटिश राजसत्ता अंतर्धान पावली, तसाच प्रकार पॅलेस्टाईनमध्ये झाला. मात्र सर्व अरब राष्ट्रांत कसलेही मतैक्य नव्हते. ज्यूविरुद्ध संयुक्त आघाडी त्यांनी उभी केलेली नव्हती. कोठल्याही अरब राष्ट्राला पॅलेस्टाईनमध्ये ज्यू जमातीचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण होणे ही गोष्ट मुळीच मान्य नव्हती. या उलट ज्यू जमात संख्येने लहान असली, तरी अधिक कणखर व पुढारलेली होती. पॅलेस्टाईनमधूनही आपण आता पुन: हुसकले गेलो तर जगात इतरत्र कुठेही आपल्याला आसरा नाही, याची जाणीव त्यांना होती. सर्व दोर तोडलेले होते व ज्यू निकराने लढणार होते.

"स्टर्न गँग–" निधड्या छातीची क्रांतिकारकांची पथके ज्यूंनी तयार केली होती. रक्तपाताला ज्यू सिद्धच होते. अरबांना रक्त न सांडता न्याय हवा होता ! आपली बाजू न्यायाची आहे, तेव्हा जगातली सगळी शांतिपाठ गाणारी राष्ट्रे आपल्या मदतीला येणार आहेत, असल्या भयाण भ्रमात अरब राष्ट्रे होती.

इंग्लंडने पॅलेस्टाईनमधील आपली अखत्यारी (मँडेट) संपुष्टात आणल्याचे

जाहीर करताच, एप्रिल १९४७ मध्ये इजिप्त, इराक, सिरिया, लेबानन या सर्व अरब राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे अशी विनंती केली की पॅलेस्टाईनमधून इंग्लिश वर्चस्व जाताच तो देश स्वतंत्र होईल असे जाहीर करा. युनोने पॅलेस्टाईनमध्ये शिष्टमंडळ पाठवून त्यांच्या अहवालानुसार पॅलेस्टाईनची फाळणी करावी व त्यात एक ज्यूंचे व एक अरबांचे अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्याचा ठराव युनो-पुढे ठेवला. २९ नोव्हेंबर १९४७ रोजी ३३ विरुद्ध १३ मतांनी इस्त्रायल निर्मितीचा ठराव युनोने केला. १५ मे १९४८ हा दिवस प्रत्यक्ष फाळणीसाठी मुक्रर झाला.

अरब लीगने या ठरावाचा धिक्कार केला. या ठरावाप्रमाणे ६,७८००० ज्यूंना पॅलेस्टाईनची ५५%भूमि मिळते व १२,६९,००० पॅलेस्टाईन अरबांना फक्त ४५% भूमि मिळते असे गणित लीगने मांडून दाखवले. मोठा प्रक्षोभ माजला. दंगे उसळले जरुसलेम–जाफा येथील दंगलीत हजारो ज्यू व अरबांनी परस्परांना कंठस्नाने घातली.

### इस्त्रायलचा जन्म

मे १९४८ उजाडला. सर ॲलन कनिंगहॅम या जेरुसलेमधील अखेरच्या ब्रिटिश हायकमिशनरने जेरुसलेम सोडले. १४ मे १९४८ ला दुपारी ४ वाजता पॅलेस्टाईनच्या भूमित इस्त्रायलचा जन्म झाला. त्याच क्षणी ज्यू व अरबांनी पॅलेस्टाईनचा शक्य तितका प्रदेश बळकावण्यासाठी झुंज सुरू केली. जनरल ग्लब हा इंग्लिश सेनानीच जॉर्डनचा सेनाप्रमुख होता. त्याने जेरुसलेमचा काही भाग जॉर्डनमधून सैन्य घुसवून कबजात घेतला. सिरियन सेनेन उत्तरेकडून हल्ला केला. इजिप्तच्या सेना समुद्रकिनारपट्टीवरून पुढे आल्या.



इस्रायल निर्मितीच्या जन्मतिथीलाच अपशकून करण्याची जबर तयारी अरब देशांनी चालवली होती. कधी इंग्रजांच्या तर कधी रशियाच्या कुटील नीतीला अरब बळी पडून, अखेर ज्यूंचे राष्ट्र अरब भूमीवर लादण्याचे आता नक्की ठरले होते. बलवंतांचा हा बहुमुखी निर्णय होता. दुबळ्यांच्या शिव्याशापांनी आता काय होणार होते? १२ मे या दिवशी, इजिप्तने देशात आणीबाणी जाहीर केली. दोन दिवसांनी १४ तारखेला इजिप्त, इराक, जॉर्डन, सिरिया-लेबानन, या सर्व देशांनी देशात लष्करी कायदा पुकारला. या सर्व देशांच्या सरकारांनी संयुक्त राष्ट्राकडे तारा केल्या – "पॅलेस्टाईनमध्ये आम्ही घुसणार आहोत." अवघ्या पाच–सहा लक्ष ज्यू जमातीवर चार कोटी अरब तुटून पडणार होते. जन्माला येण्यापूर्वीच इस्रायलची भ्रूणहत्या करण्यासाठी अरब सैन्य सज्ज होत होते.

इकडे 'इस्रायल' ची राजधानी म्हणून नामकरण होणाऱ्या, तेल अव्हिव शहरात, ज्यूंच्या स्वतंत्र राष्ट्राचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी गडबड उडालेली होती. राष्ट्रपती म्हणून डॉ. वाईझमन निवडला गेला होता. पंतप्रधानपद बेन गुरियानकडे आलेले होते. १४ मे १९४८ ची सकाळ उलटली. त्या दिवशी शुक्रवार होता. तेल अव्हिवच्या महानगरपालिकेचे ग्रंथसंग्रहालय, प्रतिष्ठित पाहुण्यांनी गजबजून गेले होते. बेन गुरियान यांनी इस्रायलच्या जन्माची घोषणा करताना सांगितले –

"ज्यूंचे हे स्वतंत्र राष्ट्र आज जन्माला येत आहे. 'इस्त्रायल' या नावाने ते यापुढे ओळखले जाईल."

या वेळी सायंकाळ झालेली होती. समारंभ चालू असतानाच अरबांनी काही ठिकाणी इस्रायलच्या सरहद्दी ओलांडल्याच्या बातम्या बेन गुरियानच्या कानावर येत होत्या.

या बातम्या सर्वस्वी खऱ्या होत्या. सर्व दिशांनी, इस्त्रायल जन्मापासून मोजून आठ तासांनी अरब सैन्ये इस्रायलचा घास घेण्याकरता चालून आली होती. जॉर्डनची सेना जॉर्डन नदी पार करून एकदम बरीच पुढे घुसली. जेरुसलेम शहर जॉर्डनने ताब्यात घेतले. 'तेल अव्हिव'वर इजिप्तच्या विमानांनी बॉम्बफेक सुरू केली. गाझा पट्टी इजिप्तच्या कबजात आली व इजिप्तचे सैन्य तेल अव्हिवपासून काही ठिकाणी २५ मैलावर येऊन थडकले.

इस्रायलविरुद्ध युद्ध पेटवण्यापूर्वी अरब संघाचा चिटणीस अझमपाशा याने जाहीर धमकावणी दिली होती – "या सर्वंकश युद्धात – इतिहासात आजवर घडल्या नसतील त्याहून भीषण कत्तली होतील." आणि पहिल्या विजयाच्या उन्मादात काही शहरांतून ज्यूंच्या सरसहा कत्तली अरबांनी घडवून आणल्या.

बेन गुरियानने ताबडतोब संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वासाठी अर्ज दाखल करून संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीकडे, अरबांच्या आक्रमणाविरुद्ध दाद मागि-



'ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र आज जन्माला येत आहे.'

—बेन गुरियान

तली. युद्ध तहकुबीची याचना करीत असताना एकीकडे मात्र, पहिल्या धक्क्यांतून सावरलेले इस्रायली सैन्य आता प्रखर प्रतिकार करू लागले. लेबाननमध्ये इस्रायली सैन्याने आत मुसंडी मारून नवी आघाडी उघडली. इस्रायली विमानेही अरब प्रदेशावर बॉम्बफेक करू लागली.

सुरक्षा समितीत रशियन प्रतिनिधी ग्रोमिको याने पॅलेस्टाईनची बाजू उचलून धरली, व अरबांविरुद्ध कारवाईची मागणी केली. रशियाची पुढील नागमोडी वाटचाल समजून घेण्याच्या दृष्टीने हा तपशील महत्त्वाचा आहे. सुरक्षा समितीने अरबांना व इस्रायलला आदेश दिला की २४ मे ला सकाळी ९॥ वाजता युद्धबंदी करा !


इस्रायलची निर्मिती रद्द केल्याखेरीज युद्ध थांबणार नाही, असे अरब राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाला कळवले. एकतर्फी युद्धबंदी इस्त्रायलने केली असती तर त्याला फारसा अर्थ नव्हता. तेव्हा चकमकी चालूच राहिल्या. सुरक्षा समितीत चर्चा-आरोप—प्रत्यारोप झडतच होते. ३० मे ला ब्रिटनने एक महिन्यापुरती युद्धबंदी दोन्ही पक्षांनी स्वीकारावी असा पर्याय काढला. ही सूचना मान्य होऊन ११ जून १९४८ या दिवशी अखेर अरब-इस्रायल युद्धाची पहिली सलामी महिन्यापुरती थांबली.

संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी म्हणून काऊंट बर्नाडोट हे जेरूसलेमला आले. वाटाघाटीचा घोळ सुरू झाला. जेरुसलेम जॉर्डनने जिंकले होते ते तसेच राहू द्यावे या अटीवर अरब राष्ट्रांनी युद्धतहकुबी करावी अशी सूचना बर्नाडोटने केली.

गंमत अशी होती की १४ मे १९४८ ला पॅलेस्टाईनमध्ये दोन राष्ट्रे निर्माण होणार होती. एक ज्यूंचे इस्रायल व दुसरे अरबांचे पॅलेस्टाईन. पॅलेस्टाईनमधील अरब जनता ही जणू आपल्या अधिपत्याखाली यायला राजीच आहे, अशा भूमिकेत इराक, जॉर्डन, सिरिया, इजिप्त यांनी पॅलेस्टाईनचा अरब प्रदेश ओरबाडला होता. वाटाघाटी पॅलेस्टाईनमधील अरब व ज्यू यांच्यांत न होता आता त्या या इतर अरब राष्ट्रांतच सुरू होत्या. बर्नाडोटची सूचना मान्य करणे म्हणजे पर्यायाने अरब राष्ट्रांनी लहानशा का होईना–इस्रायलला अरबभूमीवर स्वतंत्र राष्ट्र म्हणून कायदेशीर मान्यता देण्यासारखे होणार होते. बर्नाडोट योजना अरब राष्ट्रांनी फेटाळली. ९ जुलैला युद्धबंदीची मुदत आणखी वाढवून घ्यायलाही अरब राष्ट्रांनी नकार दिला.

याचा अर्थ होता–पुन: शस्त्राघात ! इस्रायलचे नेते हे जाणूनच होते की अरब राष्ट्रांना इस्रायल नष्ट करण्याची हीच अखेरची संधी आहे. ही संधी अरब राष्ट्रे गमावणार नाहीत. युद्ध पुन: सुरू होईलच. युद्धतहकुबीच्या महिन्याभरात इस्रायलने टॅंक्स व विमाने पैदा केली होती.

पुन: युद्ध पेटले ते जणू अरबांचा नशा उतरवण्यासाठीच ! डॉ. वाईझमन् द्रष्टा ठरला होता. दुसऱ्या महायुद्धात त्याने केलेली ज्यूंची, ब्रिटिश सैन्यातली रिक्रुटभरती आता फळाला आली होती. युद्धाचा सर्व भयभीषण अनुभव घेतलेली व सुरुवातीच्या अल्प पीछेहाटीचा कलंक धुऊन काढण्यासाठी उत्सुक असलेली इस्रायली सेना आता अरबांवर ठिकठिकाणी तुटून पडली. पॅलेस्टाईनमधून अरबांची पळापळ सुरू झाली. ८००,००० अरब निर्वासित होऊन आपल्या कैवारी राष्ट्रांच्या सरहद्दीकडे पळत सुटले. यातले ५००,००० जॉर्डनच्या दिशेने तर उरलेले गाझा पट्टीत शिरले. ५००-६०० चौरस मैलांचा टापू इस्रायलने कबजात घेतला. दहा दिवसांच्या लढाईत अरबांची एवढी नाचक्की झाली की सुरक्षा समिती युद्धबंदी कधी घडवते याकडे सर्व अरब राष्ट्रे आशाळभूतपणे पाहू लागली. संयुक्त राष्ट्रांच्या ठरावानुसार इस्रायलचे जे क्षेत्रफळ ठरले होते त्यापेक्षा अधिक भूमी इस्रायली सेनेने व्यापली.



अरब राष्ट्रांचे दुर्दैव असे, की

पॅलेस्टाईनमधील अरबांचा प्रश्न जगापुढे कधीच नीट मांडला न गेल्याने व अरब जमात ही मागासलेली असल्याने, या पुनः पेटलेल्या युद्धात जेव्हा इजिप्त व जॉर्डन या दोन्ही देशांचा इस्रायलने नक्षा उतरवला, तेव्हा इस्रायलवर आक्रमण केल्याच्या पापाचे हे परिमार्जन झाले असेच जागतिक मत झाले. या सहानुभूतीचा फायदा उलट इस्रायललाच मिळून त्यांनी अधिक भूभाग दाबला याची दखल कुणी घेतली नाही. बर्नाडोट यांनी अहवाल दिला—" अरबांनीच युद्धबंदीची मुदत वाढवण्यास नकार दिल्याने हे युद्ध पुनः सुरू झाले आहे. उपाय अरब राष्ट्रांविरुद्धच करावे लागतील ! "

१५ जुलै १९४८ ला सुरक्षा समितीने दोन्ही पक्षांना इशारा दिला की—" युद्धबंदी न कराल तर संयुक्त राष्ट्रांना लष्करी कारवाई करावी लागेल. " १८ जुलैला इस्रायलने युद्धबंदी जाहीर केली. भरपूर मार खाल्लेल्या सर्व अरब देशांनी १९ जुलैला युद्धबंदी पत्करली. दोन्ही पक्षांत कागदोपत्री समझोता प्रत्यक्ष झाला तो २४ फेब्रुवारी १९४९ रोजी. ५००० ज्यू या पहिल्या युद्धात मारले गेले. परंतु अस्तित्व सिद्ध करण्याची ही किंमत होती. फाळणी योजनेनुसार मिळणाऱ्या भूमीपेक्षा २६०० चौरस मैल भूमी इस्रायलने अधिक लाटली. जुने जेरुसलेम जॉर्डनकडे राहिले तरी याची पश्चिम व दक्षिणेची उपनगरे इस्रायलकडे राहिली. जेरुसलेमचीच जणू फाळणी झाली.

इस्रायलशी अरब देशांनी समझोता केला याचा अर्थ अरब भूमीवरील इस्रायलचे अस्तित्व कितीही दुर्दैवी वाटत असले तरी अरब देशांनी ते आता मान्य केले असाच झाला. सर्व जगाने हाच अर्थ गृहीत धरला.

हा समझोता करताना १९४८ च्या या अरब-इस्रायल युद्धात जे प्रत्यक्ष पोळले व वनवासी झाले त्या पॅलेस्टाईनच्या आठ लाखांहून अधिक अरब निर्वासितांचा विचार टोलवण्यात आला. पॅलेस्टाईनमध्ये ९३ टक्के लोकसंख्या असूनही अरबांवर हा प्रसंग आला. नुसत्या संख्येच्या बळावर विश्वासून जी जमात आंतरिक एकता आणि गुणसंख्या यांची जोपासना करीत नाही त्यांच्या नशिबी येणारे हे दुर्दैव

खोकल्यावर त्वरित गुण देणाऱ्या गोळ्या
"खो-गो"
२५ गोळ्यांस फक्त २५ पैसे
सर्वत्र मिळतात.
TRADE MARK
अहिल्या
आयुर्वेदिक औषधालय
गोरेगांव, मुंबई ६३.


खुमासदार
बातमी...
SATHE
PICNIC
BISCUITS
आपली आवडती
साठे
पिक्‌निक्
बिस्किटस्
आतां मोहक
हवा-बंद कार्टन्स्मधून
उपलब्ध होत आहेत.
साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२
heros' SBC 281 MAR

इतिहाससिद्धच आहे.

या सगळ्या गोधळांत काऊंट बर्नाडोट हकनाक मारला गेला. १९ सप्टेंबरला तो विमानाने दमास्कसहून—जेरुसलेमला आला. त्याला हैफा रेडिओवरून इस्रायलने इशारा दिला होता की जेरुसलेममध्ये त्यांनी जाऊ नये. तिथे ज्यू भूमिगत सैन्य घातपात करीत होते. बर्नाडोट तरीही गेला. 'स्टर्नगँग'च्या लोकांनी त्याला मोटारीत गोळी घातली.

१९४९ च्या या समझोत्यानुसार इस्रायलच्या अस्तित्वाची आपत्ती आता अटळ म्हणून पत्करल्यानंतर, अरबांनी शांततामय सहजीवन पत्करले असते, तरी मध्य-पूर्वेतल्या इतिहासाला एक नवे वळण लागल असते. परंतु ते घडणार नव्हते. सर्व अरबांची एकजूट नव्हती म्हणून हा राजनैतिक पराभव पत्करावा लागला, इस्रायल नष्ट करायचे तर प्रथम सर्व अरब देशांची एकजूट घडवून आणली पाहिजे, व या एकजुटीच्या आव्हानाला ज्यू द्वेषाचाच मोठा आधार निर्माण करायचा, अशा कल्पनेने भारलेला एक सेनाधिकारी लवकरच इजिप्तचा सर्वाधिकारी होणार होता. इजिप्तचा विलासी सुलतान फरूक याला पदच्युत करून सत्ता बळकावण्याचा लष्करी कट तीन वर्षांनी इजिप्तमध्ये यशस्वी झाला. राजसत्ता उलथली गेली. या कटाची सूत्रे ज्या जनरल नगीबच्या हाती होती तो केवळ दर्शनी बाहुले होता. जनरल नगीबला दूर करून दोन वर्षांतच कटाचा प्रमुख सूत्रधार गमाल अबदुल नासर हा महत्त्वाकांक्षी सेनाधिकारी सत्तेवर आला.

द्वेषाची पखरण आणि घडणाऱ्या घटनांचे विपर्यस्त अन्वयार्थ लावीत ज्याप्रमाणे हिटलरची-लष्करी राजवट अधिकारावर आली, त्याच पद्धतीने नासरची राजवट अस्तित्वात आली. केवळ इस्रायलचा द्वेष पुरेसा नाही हे नासरने ओळखले होते. त्याने इजिप्तच्या राजकारणाला एक नवी झालर निर्माण केली. दलित अरबांचा उद्धारकर्ता आणि साम्राज्यवादी इंग्लंडचा कट्टर द्वेष्टा अशा दुहेरी नात्याने त्याने राजकीय रंगमंचावर पदार्पण केले. [क्रमशः]


आर. एन्. शिंदे आणि सन्स
चष्म्याचे व्यापारी

२०७ जगन्नाथ शंकरशेट रोड, भालेराव मार्गासमोर, मुंबई ४.

जहांगीर मेरवानजी रोड, परळ – मुंबई १२

एन्. सी. केळकर रोड, दादर – मुंबई २८

दुपारी १२ ते ३ बंद ) 卐 ( टे. नं. ३५६४८०

श्री. माजगावकर यांच्या 'अन्न स्वतंत्रता-संचलना' बरोबर राहून जे पाहिले त्यातील ही त्रुटित अशी चित्रे आहेत. 'अन्न स्वतंत्रता संचलना'चा हेतू व प्रचार कसा झाला हे 'माणूस'च्या वाचकांना ठाऊक आहेच. त्या व्यतिरिक्त वाटचालीत जे दिसलं ते यात मांडलं आहे—



# वाटचाल

दि. बा. मोकाशी

दि. १४–२–६८. वाटचाल सुरू होऊन वीस दिवस झाले आहेत. तसे वीस दिवस फार नाहीत पण प्रत्येकाला घरची आठवण येऊ लागली आहे. श्री. माजगावकर, नागपूरचे ग्रंथविक्रेते श्री. कुलकर्णी, सर्वोदयातर्फे आलेले श्री. जोशी, फोटोग्राफर श्री. मोरे व मी असे आम्ही पाच पदयात्रिक. प्रत्येकाच्या घरच्या आठवणींची तऱ्हा वेगळी आहे. गेले चार दिवस घरच्या गोष्टी आम्ही बोलत आहोत. पण श्री. माजगावकर कधी या विषयात बोलले नव्हते तेही आज म्हणाले–' काय हा उद्योग ! या वेळी घरी–बिछान्यावर सुखात असतो.' श्री. मोरे आपल्या लेकीबद्दल सांगताहेत. तिची अभ्यासातील हुशारी. तिची शाळा. तिचे काढलेले फोटो. बाहेर शेकडो फोटो काढून घरचे फोटो तेवढेसे काढले नाहीत हे ते जरा पश्चात्तापाने सांगत आहेत. ते ठाणे येथे राहतात व सकाळी मुंबईला कामावर गेले की रात्री परत येतात. कधी उशिरा येतात. त्यामुळे घरच्या लोकांशी पुरेसे राहणे होत नाही. सर्वोदयी कार्यकर्ते जोशीही घरच्याबद्दल सांगतात. सर्वोदयाच्या दुसऱ्या कामावरून ते परस्पर इथे आलेले आहेत व बरेच दिवसात ते घरी गेलेले नाहीत. त्यांची सर्वोदयाच्या कार्यामुळे बरीचशी फिरती असते. सहा महिने, वर्ष कधी त्याहूनही जास्त ते घरापासून दूर असतात. त्यांचे ऐकून आम्हाला बरे वाटते.

स्वतःच्या समाधानासाठी आम्ही हे एकमेकांजवळ बोलत आहोत. आम्ही कुणी कुणी, खरं म्हणजे एकमेकांच्या मुलांना पाहिलेही नाही. जोशी सारखे म्हणतात, मुलीचं पत्र आलं नाही–घरी पत्र धाडायला हवं. खरं म्हणजे जोशी यांचीच तगमग सर्वांत जास्त हवी. पण ' मला सवय आहे ' ते सहज म्हणतात. आणि सूर्य मावळल्यावर त्यांचं ध्यानाला बसणं शांतपणे चालू आहे. सर्वोदयाचा अपुरा व कधी अनिश्चित पगार यामुळे घरच्या अगदी प्राथमिक काळज्या त्यांच्यामागे आहेत. आम्हालाही अडचणी आहेत. पण प्रवासात असताना तरी घरी काही कमी पडणार नाही हे पाहून आम्ही निघालो आहोत.–घरी आल्यावर जीवनाची लढाई पुन्हा सुरू होणार–ते वेगळे.

ग्रंथविक्रेते राजाभाऊ कुलकर्णी यांची घरच्या आठवणींची तऱ्हा वेगळी आहे. फेब्रुआरी व मार्च महिना त्यांचा धंद्यातला मोसम. अननुभवी अशा आपल्या धाकट्या भावावर धंदा सोपवून ते आले आहेत. ते सारखे त्याबद्दल काळजी करीत आहेत. पण त्या काळजीआड घरच्या आठवणींचा त्यांना त्रास होतोय हे कळत आहे.

दि. २०–२–६८. बेलपिंपळगाव. नेवाशानंतरचे हे गाव. नेवासे गावाच्या आधी व नंतर पोपटांचे थवेच्या थवे लागले. कणसांनी थबथबलेल्या क्षितिजापर्यंत शेतां-

वरून उडणारे त्यांचे हिरवे फवारे विलक्षण दिसत होते. शेजारच्या झाडांवर, तारांवर, पलीकडच्या झाडांवर त्यांचा निर्भय विहार चालला होता. पोपटांप्रमाणे इतर पक्षीही होते आणि जातककथेतल्याप्रमाणे ते कोणत्याही क्षणी बोलू लागतील असे वाटत होते. किंवा कथासरित्सागरमधील कथाभागांप्रमाणे त्यातला एखादा पोपट राजपुत्र किंवा राजकन्या होऊन उभी राहिली असतो किंवा पोपट जाऊन तिथे एखादा विद्याधर प्रकट होऊन शंकराने दिलेल्या शापामुळे आपण पोपट कसे झालो आणि अन्नधान्य वाढवा असे सांगत जेव्हा पाच पदयात्रिक येतील तेव्हा तुझे पहिले रूप कसे लाभेल असा उःशाप सांगू लागला असता तरी मला नवल वाटले नसते.

बेलपिंपळगाव रस्त्यापासून आत असल्यामुळे सामानाचे व आमचे काही वेळ अंतराय पडले. मागच्या बाजूने आम्ही गावात शिरलो. आणि दोन्ही बाजूंना जोंधळा आणि ऊसमळे रसरसले होते. पण कुठे माणूस दिसत नव्हता. गावांतून दोन पिठाच्या गिरण्यांचे क्कू क्कू आवाज एकमेकांशी चढाओढ करीत होते. हे स्वागताचे क्कू क्कू आहे की निषेधाचे यांनी माझे मन साशंक झाले. जरा ऊन झाले होते. अपेक्षेपेक्षा गाव जास्त आत निघाल्यामुळे पायांना जरा थकवा वाटू लागला होता. सगळीकडे आतापर्यंत उत्तम व्यवस्था होत असता कुठेतरी एकदा धक्का बसणार, झाडाखाली उतरून फुटाणे खाऊन रात्र काढावी लागणार असे श्री. माजगावकर म्हणत होते त्याचे प्रत्यंतर इथे येणार असे वाटू लागले.

पण गावाची पहिली पक्की घरे गेल्यावर जेव्हा, पंचायतीच्या, शाळेच्या मोठ्या इमारती दिसल्या तेव्हा आणि त्यानंतर उत्तम व्यवस्था झाली. तेव्हा हे वाटणे मी विसरलो. फक्त सामान उशिरा आले.

पाणीपुरवठा कमीजास्त होण्याबरोबर गावाचे रूप कसे पालटत राहते याचा हे गाव नमुना होता. तीन वर्षे पाऊस न पडल्याने विहिरी आटल्या होत्या. आणि त्यामुळे ऊस न लावता आल्यामुळे पैशाचे पीक गावाचे हातून गेले होते. इथल्या मोठ्या इमारती व थाट तीन वर्षांपूर्वीचा होता. पैसे खूप हातात आल्यावर त्याबरोबर येणारी पत्त्याचे जुगार वगैरे व्यसने आणि चोरून सावकारी हे अवशेष आज शिल्लक होते. पंचायतीच्या इमारतीच्या आसपास तरुण तगडे गावकरी इकडे तिकडे बसले होते किंवा रेंगाळत होते. खेडेगावात बहुतेक ठिकाणी हा देखावा दृष्टीस पडतो.

हा गाव ग्रामगौरव झालेला आहे. ग्रामगौरव झालेला गाव गावात शिरताच कळतो. देवळांच्या, घरांच्या, पंचायतीच्या, शाळेच्या भिंतीवर मोठमोठ्या अक्षरात बोधवचने लिहिलेली असतात. बहुतेक ग्रामगौरव खोटे असतात असे आजपर्यंत आम्ही ऐकत आलो. ग्रामगौरवच काय, पण संततिनियमनाचा प्रचार व सहकारी चळवळीचे कार्यही खोटे असते असे ऐकले. पण भिंतीवर लिहिलेली बोधवचने पाहिल्यावर खोट्या वातावरणात शिक्षकांना ती सुचावीत याचे नवल वाटते व पटत

नाही. ' खंडीभर टीकेपेक्षा कणभर सेवा चांगली ' किंवा स्वत:साठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास किंवा कुटुंब लहान, संसार छान, किंवा कष्टाला आयुष्याचे दैवत करा, असली बोधवाक्ये वाचली की वाटते यातला एक शतांशबोध नागरिकांत उतरला नसेल !

संध्याकाळी मी व जोशी फिरायला गेलो. आम्ही शेताच्या काठावर बसलो आहोत. क्षितिजापर्यंत शेते पसरली आहेत. मावळता सूर्य, गहू आणखी सोनेरी करीत आहे. मधेच एक, काड्या राहिलेले, ज्वारीचे वाळलेले शेत आहे. संपन्न माणसाशेजारी विपन्नाचे बिऱ्हाड असावे तसे ते लगतच्या उसाच्या हिरव्या मळ्याशेजारी वाटत आहे. बगळ्यांचा एक थवा पुसती पांढरी रेघ ओढीत शेताला चाटून जात आहे. पक्षांच्या किलबिलाटाशिवाय सर्व शांत आहे. पश्चिम लाल रंग घेत आहे. आम्ही इथे असे का बसलो आहोत ? इथे बसण्याचा आमचा योग केव्हा ठरला ? एक सायकलवाला समोरून गेला. थोड्या वेळाने समोरील झाडांच्या फटीतून बैलगाडी आली. तिच्यावर उभा असलेला शेतकरी लाल आकाशावर फक्त आकृतीने दिसत आहे. तो जोरजोराने गाणे म्हणत आहे

जरा सामने तो आवो छलिये, ।।
यू चुप चुप बसनेमे क्या राज है ।।
यू छुपना सकेगा परमात्मा ।।
मेरी आत्माकी ये आवाज है ।।

हळू हळू गाडीवाल्याचा आवाज लहान होत विरतो. त्या आधी वाढत्या अंधारात तो गाडीसह छपून जातो. दिवसमानाने आलेला सृष्टीचा थकवा आमच्याही अंगावर आल्यासारखे आम्ही उठतो व गावाकडे येऊ लागतो.

नि:संकोच उतरावयाचे असेल तर देवळात उतरावे. दि. २–३–६८ चा मुक्काम कोकणगावात देवळात झाला या वाटचालीतला पहिला लेखक येथे भेटला. देवळात आम्ही आमचे बिछाने पसरले. आंघोळी उरकून आलो आणि तो दोन तीन पुडकी घेऊन आला. त्यातली एक प्रेमकथा होती. एक लहान मुलांची दीर्घकथा होती.

इतक्या खेडेगावात लेखनाचा प्रयत्न करणारा मुलगा भेटावा हा धक्काच होता. आतापर्यंत लागलेल्या अशा खेडेगावात पुस्तक काय पण साधा कागदही पाहायला मिळाला नव्हता. माझ्याजवळ असलेली पुस्तके जगातील शेवटली पुस्तके आहेत असे मला वाटू लागले होते.

संध्याकाळी या मुलाने मला मित्रमंडळींनी मिळून काढलेले वाचनालय दाखवले. एका मातीच्या खोलीत कमरेएवढ्या कपाटात वाचनालय सामावले होते. ही मुले गावात नाटकेही बसवू लागली होती. एकीकडे हे नाद व दुसरीकडे अभ्यास यात नेहमी चालणारा झगडा त्याच्या बाबतीतही सुरू झाला होता.

दुपारनंतर गारांचा पाऊस पडला. इतक्या विलक्षण गारा मी कधी पाहिल्या नव्हत्या. मोठा ब्रश घेऊन कुणीतरी पृथ्वीला पांढरा रंग देत आहे असे क्षणभर वाटले. पाहता पाहता रस्ते पांढरे झाले. पायऱ्या, फटी, खळगे, उंचवटे काही सेकंदात, गारांच्या दुधी रंगाने भरले. गारांच्या थड थड आवाजाने वातावरण भरून गेले होते. पडणाऱ्या गारा या सुंदर पृथ्वीवर 'कुठे पडू—कुठे नाही' अशा हौसेत एकावर एक उंच उशा घेत होत्या. त्यांची उशा घण्याची घाई आणि पडणाऱ्या गारांची गर्दी एकत्र होऊन जत्रेत माणसांचा गोंधळ उसळतो तसा गोंधळ उडाला होता.—देवळाच्या ओटयावर उसळया घेणाऱ्या गारा आम्ही आत बसलो होतो तेथे पंधरा फुटापर्यंत येऊन पडत होत्या. जाळे वाळूवर उघडताच मासे उडया मारतात तशा यांच्या उडया अकल्पित होत्या.

एक गारांचा आनंद असा आहे की जो सगळया वयांना असतो. आजारी माणूसही आजार विसरून गारा वेचायला धावतो. आम्हीही लोटयात गारा भरून ठेवल्या. पाऊस थांबला. मास्तरांनी छडी आपटल्यावर वर्ग गप्प होतो तसे सर्वत्र गपचुप झाले होते. फक्त ओढयाकडे वाहणाऱ्या ओहोळांचा आणि ओढयाच्या वाढत्या पाण्याचा आवाज यत होता. जमीन जशी जादूसारखा पांढरी झाली तशी जादूसारखी निवळली होती. एखादा ओला पक्षी करुण आर्द्र सूर काढीत उडत होता. घासून पुसून उपडे ठेवलेल्या पितळी भांडयासारखी पृथ्वी स्वच्छ वाटत होती. आधीच या गावाभोवतालचा परिसर मोहक. आता 'ओलेती'च्या सौंदर्यात तो अधिकच खुलून दिसू लागला. सांदी-कोपऱ्याच्या उबेत राहिलेली एखाद दुसरी गार काय ती अजून विरघळत होती.

संध्याकाळी त्या लेखक-मुलाबरोबर फिरावयास बाहेर पडलो. त्याने प्रथम आपल्या घराकडे नेले. वाटेत एका पडक्या घरालगतचे बाभळीचे झाड दाखवित तो म्हणाला,—"हे बाभळीचे झाड रोपटे असताना मी या घरात राहत होतो. पाहा केवढे झालय झाड ते!" शाळच्या इमारतीजवळ आल्यावर तो म्हणाला—"शाळेच्या या उजाड आवारात आम्ही मुलांनी बाग केला होता. भाज्या लावल्या होत्या."

त्याचं हे आठवणी काढणं मला फार आवडलं. शाळेवरून त्याच्या घरी जाऊन आम्ही गावाबाहेर निघालो. कुणाच्या तरी मळयाकडे जायचं असं तो म्हणाला.

आम्ही तेथे गेलो ते गारांनी केलेला धुडगूस पाहायलाच. वाटेतली उभी शेतं निजलेली दिसलीच होती. पण इथे ज्वारीची उभी रास भिजली होती. या गारांनी सर्वात जास्त नुकसान द्राक्षमळयांचे होणार होते. आम्ही मळयातून परतलो व गावात आलो तेव्हा गारांनी होणाऱ्या पिकांच्या नुकसानीबद्दल जो तो हळहळत होता. गारांच्या आकाराबद्दल बोलत होता. गारांनी उघडयावर सापडलेल्यांना खोका पडल्या असेही कुणी सांगत होते.

मला जे सौंदर्य वाटले ते त्यांना शासन ठरले होते. O

॥ रञ्जनमर्थवर्धनम् ॥

□ □ □

शब्दाने शब्द वाढतो असे म्हणतात,
पण शब्दांच्या अर्थामुळे अर्थ वाढतो
हे तुम्हाला माहीत आहे काय ?
शब्द अर्थवाही आहेत, तसे अर्थदायीही
आहेत, हे पटवून देणारी —

□ □ □

# श ब्द रं ज न स्पर्धा

मराठीतील एकमेव 'सार्थ' नाम शब्दस्पर्धा !

□ □ □

विशेष तपशिलासाठी रविवारचा 'मराठा' पहा !

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ दुःख सोय !

अमेरिकेतल्या हॉटेलात किती विविध प्रकारच्या सुखसोयी असतात याचा थोडासा अनुभव अस्मादिकांनी घेतलेला आहे. पण परवा वर्तमानपत्रांत वाचले की तेथल्या एका हॉटेलने आपल्या गिऱ्हाइकांसाठी एक अजब "दुःखसोय" केली आहे. कोठल्याही कारणाने रागावलेल्या किंवा निराश झालेल्या माणसाने या हॉटेलात जाऊन एक विशिष्ट खोली भाड्याने घ्यायची. या खोलीत जाऊन तेथे मुद्दाम ठेवलेल्या कपबशांची, काचसामानाची व फर्निचरची मनसोक्त मोडतोड करायची–अन् राग शांत झाला की बाहेर यायचे. आता बोला ! शेष कोपेन पुरयेत्‌ची इतकी टिपटॉप व्यवस्था दुसरीकडे कोठे मिळेल ? आमच्याकडे मला राग आला की तो छोटयाच्या पाठीवर निघतो, अन् हिला आला की हातांत असलेल्या भांड्यावर निघतो. परंतु खुर्चीची तंगडी मोडून किंवा बशीला विधवा करून जो आसुरी आनंद मिळतो त्याची बरोबरी छोटयाची पाठ किंवा पितळेचे पातेले करू शकणार नाही. मला तर वाटते आपल्याकडे प्रत्येक घरात अशी व्यवस्था असावी. नाही तरी आपल्याकडे रुसण्याचा कोपरा असतोच, त्याच सोयीची सुधारून वाढवलेली आवृत्ती काढायला काय हरकत आहे ?

## □ राष्ट्रीय नरक

एका फ्रेंच लेखकाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या पुस्तकात नरकाचे वर्णन "जेथे इंग्लिश आचारी, अरब मेकॅनिक आणि जर्मन पोलिस आहेत अशी जागा" असे केले आहे. भले शाब्बास ! बहुतेक सर्व धर्मांच्या पुराणांत नरकांत नेहमीच हीटवेव्ह असते येवढेच हवामानाचे वर्णन उपलब्ध आहे. पण नरकांतदेखील निरनिराळे देश असून पृथ्वीवरच्या प्रत्येक देशासाठी एक स्वतंत्र राष्ट्रीय नरक आहे असे दिसते. आता फ्रेंच माणूस चवीचा म्हणून प्रसिद्ध, तेव्हा फ्रेंच नरकात "फिश् अँड चिप्स" खेरीज इतर काहीच माहीत नसलेला इंग्लिश आचारी असावा यात नवल नाही. उलट अमेरिकन नरकांत हॉट्‌डॉगला बंदी असावी, भारतीय नरकांत आराम खरोखरीच हराम असावा अन् चिनी नरकांत माओच्या आज्ञेशिवायच फळे ताजी राहत असावीत आणि पिंगपाँगचा बॉल टुण् टुण् उडत असावा. निरनिराळ्या देशांचेच कशाला, निरनिराळ्या माणसांच्या नरकाच्या कल्पनाही पिंडे पिंडे मतिर्भिन्ना या नात्याने वेगवेगळ्या असायला हव्यात. उदाहरणार्थ, मराठीत स्वतंत्र

लघुकथा लिहिणाऱ्या लेखकाचा नरक म्हणजे इंग्रजी कथा-मासिकांची जेथे सदैव होळी चालते अशी नतद्रष्ट जागा. नवकवीच्या नरकांत शब्दांना अर्थ असला पाहिजे असा हुकूमशाही कायदा असावा; आधुनिक विद्यार्थ्यांच्या नरकांत खिडकीची काच फोडायला उपयोगी पडू शकणारा एकही दगड मिळत नसावा; राजकीय नेत्याच्या नरकांत मायक्रोफोन नावाची चीजच नसावी, अन् आजच्या दूधवाल्याच्या नरकांत दुधापेक्षा पाणी जास्त महाग असावे.

## □ ॲडम आणि ईव्हचा शिंपी

इंग्लंडमधल्या एका वर्तमानपत्राने "स्त्री-वार्ताहरा"साठी अर्ज मागविले आहेत, पण जाहिरातीच्या शेवटी लिहिले आहे–"स्त्री-वार्ताहर म्हणून काम करू इच्छिणाऱ्या पुरुष अर्जदारांच्या अर्जाचाही विचार केला जाईल." इंग्लंडमध्ये हल्ली अर्धनारीनटेश्वर बीटल्सचे युग चालू असल्याने एखादा अर्जदार स्त्री आहे की पुरुष आहे हे ओळखणच कठीण व्हायचे, म्हणून प्रस्तुत वर्तमानपत्राने पुरुष अर्जदारांची स्त्रियांत गणना करायचा सोपा उपाय काढला असावा. मला वाटते स्त्री-अर्जदारांपेक्षा स्त्री-सदृश अर्जदारांचे अर्ज मागविले असते तर प्रश्न अधिक सोपा झाला असता.–पण सबूर! आधुनिक इंग्लिश तरुण बायकांसारखे दिसतात हे खरे असले तरी आधुनिक इंग्लिश तरुणी पुरुषांसारख्या दिसतात त्याची वाट काय? एका इंग्लिश मासिकातच वाचलेला विनोद आठवला–दोन अगदी लहान मुले ॲडम आणि ईव्हच्या चित्रासमोर उभी असतात. एक दुसऱ्याला विचारतो: "यांतली बाई कुठली आणि अन् बुवा कुठला?" दुसरा उत्तर देतो: "दोघांनीही कपडे घातलेले नाहीत, मग आपल्याला कसे कळणार?"

## □ एकच सरकारी प्याला

आपले महाराष्ट्र सरकार म्हण दारूचा कारखाना उघडणार आहे. अन् पंजाब व केरळ सरकारांनी स्वतःची लॉटरी काढली आहे. म्हणजे आता आणखी एखाद्या सरकारने पब्लिक सेक्टर जुगारी अड्डा काढायला हरकत नाही. कला, नीतिमत्तेच्या बुरसटलेल्या कल्पना आपण थेट अधिकृत सरकारी रित्या वाऱ्यावर सोडल्या हे बरे झाले. महात्मा गांधी दारू वाईट आहे असे सांगून गेले, अन् पंडित नेहरू आराम हराम है असे सांगून गेले.–बिचारे! एकच सरकारी प्याल्याची लज्जत गांधीजींना काय कळणार, अन् रुपयात पाऊण लाख रुपये मिळण्याचे सरकारी आमिष किती मासे गळाला लावते हे नेहरूंना काय कळणार? आपल्या सुदैवाने आताचे आपले राज्यकर्ते इतके असमंजस नाहीत. त्यांनी अचूक हेरले आहे की या देशाच्या मातीतून सोने निघेल, पण केव्हा? जेव्हा शहाणा कुंभार ती दोन रूपात घडवील–एक, हातभट्टीचा मटका, अन् दुसरे, "तो–" मटका.

○



# हिटलरच्या मगरमिठीतून सुटका

महायुद्ध सुरू झाले. विलक्षण वेगाने नाझी गरूड सर्व आघाड्यांवर झेपाऊ लागला. काही दिवसातच डेन्मार्क, पोलंड, बेल्जियम हे देश नाझी टाचेखाली गेले. हिटलरचे पुढचे लक्ष्य होते नॉ[illegible].

नॉर्वेवर चाल करताच हिटलरने नॉर्वेचा राजा सातवा हाकॉन याला हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मगरमि ीतून सुटण्यासाठी हाकॉनने केलेल्या प्रयत्नांची ही नाट्यपूर्ण कथा 'ग्रेट अनटोल्ड-स्टोरी ऑफ वर्ल्ड वॉर सेकंड' या पुस्तकात फिल हर्श्चे यांनी सादर केली. त्या कथेचा हा स्वैर अनुवाद.

अनुवादक

अनंत भावे

जर्मन गुप्तहेरखात्याने नॉर्वेतील नायबर्गसंड खेड्यात पेरलेल्या कर्ट लांज या हस्तकाचा एक क्षणभर आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. नेहमीप्रमाणे सायकलीवरून जात असताना अचानक त्याने एक आलिशान मोटार पाहिली होती. मुख्य रस्त्यापासून जवळच असलेल्या पोस्ट ऑफिसच्या इमारतीपाशी जाऊन ती उभी राहिली होती.

कर्ट लांजला अत्यंत आनंद झाला होता. आरशासारख्या चकचकीत अशा बर्फ गोठलेल्या रस्त्यावरून त्याने सायकल सुसाट सोडली. थोड्याच वेळात तो खेड्याच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या आपल्या झोपडीवजा निवासस्थानी आला. झोपडीत शिरल्यावरोबर त्याने एकदम अंधाऱ्या तळघराकडे धाव घतली. तळघरातील बिनतारी तारायंत्रावर त्याने ऑस्लोमधील आपल्या गुप्तहेरखात्याच्या मध्यवर्ती ठाण्याशी संधान बांधले.

"मी दोनशेअठ्ठयाण्णव बोलतो आहे" तो म्हणाला. आवाजातील आनंद लपविणे त्याला जड जात होते. "राजे हाकॉन, वारस राजपुत्र ओलॉफ, परराष्ट्रमंत्री हल्वदान कोहट, पुरवठामंत्री ट्रिग्वे ली, आणि कोणीतरी एक अनोळखी मेजर इतकी सगळी मंडळी आत्ताच नायबर्गसंडच्या जुन्या पोस्ट ऑफिसच्या इमारतीपाशी येऊन पोचली आहेत. इमारत पोस्ट ऑफिसची असली तरी सध्या तिथं उपहारगृह चालतं असं मला वाटतं."

"ठीक. पण या बातमीची शहानिशा केली आहेस तू? खरी आहे ही बातमी?"

"अगदी शंभर टक्के खरी. आणि पुन्हा पुन्हा खात्री करून घतल्यावरच संदेश देतो आहे मी तुम्हाला."

"शाबास!" पलीकडून उत्तेजक आवाज आला, "आता एक कर. तू स्वतः त्या पोस्ट ऑफिसच्या इमारतीपासून दूर राहा. आम्ही आत्ता फडशा पाडतो त्याचा."

आतापर्यंत केलेल्या कामगिरीतील ही सर्वांत मोठी कामगिरी आहे असे लांजला वाटले. त्याला स्वतःबद्दल अभिमान वाटू लागला. झोपडीच्या बाहेर येऊन त्याने आकाशाकडे नजर लावली. त्याच्या चेहऱ्यावर पाशवी हास्य उमटले होते. लांजला वाटले या कामगिरीबद्दल आपल्याला एखादे पदक मिळायला हरकत नाही. किंवा निदानपक्षी आपला गौरव तरी होईल. कारण त्याच्या या सावधपणामुळेच कदाचित हिटलरला आपली नॉर्वेची मोहिम त्वरेन पुरी करता येणार होती.

चारच दिवसांपूर्वी, म्हणजे ९ एप्रिल १९४० रोजी, हिटलरने नॉर्वे आणि डेन्मार्क यांच्याविरुद्ध एकदम अकस्मात अघोषित युद्ध पुकारून त्यांच्यावर चाल केली. वास्तविक त्या आधी आठ महिने चाललेल्या जर्मनी विरुद्ध इंग्लंड-फ्रान्सच्या युद्धात नॉर्वे आणि डेन्मार्क अत्यंत निष्ठेने तटस्थ राहिली होती. तरीही हिटलरच्या

साम्राज्यतृष्णेने त्यांचा बळी घेतलाच. डेन्मार्क तत्काळ शरण आले. नॉर्वेची परिस्थितीदेखील बिकट होती. नॉर्वेजवळ युद्धतंत्रकुशल पायदळ नव्हते. विमानदल-सुद्धा जवळ जवळ नव्हतेच. आणि गेल्या हजार वर्षांत नॉर्वेवर युद्धाचा प्रसंगही आला नव्हता. पण हिटलरला विरोध करण्यासाठी मात्र सारे नॉर्वे राष्ट्र एकदिलाने उभे राहिले.

त्याच्या या उत्थानामागील प्रेरक शक्ती म्हणजे त्यांचे अधिपती सातवे हाकॉन हे होत. अडुसष्टाव्या वर्षीदेखील उमदा आणि धाडसी असणारा हा राजा हिटलर-पुढे विनाप्रतिकार मान तुकविणे शक्यच नव्हते. आणि राजे हाकॉन मुक्त किंबहुना जिवंत असेपर्यंत साऱ्या नॉर्वेची प्रतिकारशक्ती जिवंत राहणार होती. राजे हाकॉन जिवंत असताना जर्मनीचे कळसूत्री सरकार नॉर्वेजियन जनतेला कदापि सहन झाले नसते.

नॉर्वेवर प्रत्यक्ष चढाई करण्यापूर्वी कित्येक महिने आधी हिटलरने आपले गुप्त-हेर त्या देशात पेरले होते. चढाई सुरू झाल्यानंतर यापैकी प्रत्येक गुप्तहेराला एक खास संदेश मिळाला होता—काहीही करा आणि राजे हाकॉन यांचा शोध करून त्यांना ठार मारा. हा हुकूमवजा संदेश खुद्द अॅडॉल्फ हिटलरकडून आला होता. राजे हाकॉन यांचा तीन वर्षांचा नातू राजपुत्र हारल्ड याला गादीवर बसवायचा धूर्त बेत हिटलरने आखला होता. जनरल निकॉलॉस व्हॉन फाल्कनहॉर्स्ट या नॉर्वे-वरील मोहिमेच्या सरसेनापतीला हिटलरने एक गुप्त कानमंत्र दिलेला होता: या महामूर्ख नॉर्वेजियन लोकांना राजा पाहिजेच असेल तर खुशाल राजपुत्र हारल्डला गादीवर बसवा. त्याच्याकरवी जर्मनीच नॉर्वेवर राज्य करील.

झोपडीच्या दाराशी उभा असताना लांजला हे सारे सहज आठवले. इतक्यात त्याचे डोळे ज्यांचा शोध घेत होते ती जर्मन विमाने ढगांनी काळवंडलेल्या आका-शात त्याला दृग्गोचर झाली. एकूण त्याच्या संदेशाला मध्यवर्ती गुप्तहेर खात्याकडून प्रत्यक्ष त्वरित कृतीने प्रतिसाद मिळाला होता. जर्मन विमानांची ती तुकडी लांजच्या डोक्यावरून पुढे गेली. त्यातील एक एक विमान हल्ल्यासाठी यथाक्रम बाणासारखे खाली येत असताना लांजने पाहिले. त्याच्या आनंदाला सीमा नव्हती.

## कॉफीचा वास मस्त येतोय् !

पोस्ट ऑफिसच्या इमारतीतील मुख्य भोजनगृहात असलेल्या प्रचंड लाकडी टेबलाभोवती आरामखुर्च्यांत विसावलेल्या पाच नॉर्वेजियन माणसांच्या चेहऱ्यांवर त्यांनी काढलेल्या दुर्दिनांची छाया स्वच्छ उमटली होती. सतत बहात्तर तास जर्मनांनी त्यांचा जीवघेणा पाठलाग चालवला होता. सरतेशेवटी न्यायबर्गसंडच्या या पोस्ट ऑफिसात आल्यावर आता आपल्याला काही तास निर्वेध विश्रांती मिळू शकेल असे त्यांना वाटले होते. स्वयंपाकघरातून कॉफीचा उत्तेजक गंध दरवळत होता.

सहा फूट तीन इंच उंचीचे, वृद्ध परंतु कणखर राजे हाकॉन तेवढे एकटेच काही

बोलण्याच्या मन:स्थितीत होते. त्यांचा तरुण मुलगा राजपुत्र ओलॉफ विचारात गढला होता. ली आणि कोहट श्रमांमुळे आणि भुकेमुळे विकल झाले होते. या पाच जणांना गेल्या काही तासांत क्वचितच सलग झोप मिळाली होती.. क्वचितच पोटभर अन्न मुखी पडले होते. जर्मन शिकारी या आपल्या सावजांच्या मागे पिसाटासारखे लागले होते.

यांच्यात असलेल्या हॉफ्चेफ् गुनार वेडल या पाचव्या माणसाला लांजने ओळखले नव्हते. सेवानिवृत्त सेनाधिकारी असलेला वेडेल कितीतरी वर्षे हाकॉनच खासगी कारभारी होता. मोठ्या अभिमानाने आपला जुना गणवेष धारण केलेला हा सेनाधिकारी कोठेतरी शून्यात नजर लावून बसला होता.

"मला असं वाटतं की आपण इथं असल्याचा सुगावा जर्मनांना लागलेला असावा" राजे हाकॉन गंभीरपणे म्हणाले, "आपण कोठंही थांबलो तरी नाझी विमानं आपल्या हत्येसाठी टपलेलीच असतात बेटी!"—थोडे थांबून ते पुढे म्हणाले, "जाऊ द्या झालं ते सगळं. पण या कॉफीचा वास मात्र मोठा मस्त येतोय हां!"

पण त्या वासाचा मजा पुरतेपणी अनुभवण्याइतकी देखील सवड त्यांना मिळाली नाही. ओलॉफने कसला तरी आवाज ऐकला आणि तो ताडकन उठून उभा राहिला.

"चला, चटकन टेबलाखाली शिरा प्रत्येकानं" ओलॉफ ओरडला, "चटकन."

विजेच्या चपळाईने ती पाच माणसे टेबलाखाली शिरली. एखाद्या मल्लाच्या कसलेल्या पायांसारख्या असलेल्या त्या टेबलाच्या चार भक्कम पायांवरच आता त्यांची भिस्त होती. ते टेबलाखाली शिरले न शिरले तोच छपरावर मशिनगनची फैर झडली.

पुन्हा पुन्हा विमाने त्या पोस्ट-ऑफिसच्या दिशेने चाल करून येत होती. त्यांनी केलेल्या गोळीबारामुळे आणि बॉम्बफेकीमुळे इमारतीच्या खिडक्यांची नुसती चाळण झाली आणि सर्व इमारतीला प्रचंड हादरे बसत राहिले. परंतु इमारतीवरच अचूक बॉम्ब न पडल्यामुळे, सुदैवाने, टेबलाखाली आश्रय घतलेली पाचही माणसे सुरक्षित राहिली.

शेवटच्या विमानाने हल्ला करून आकाशात उसळी मारली.

"यांचा प्रतिकार आपल्याला करता आला असता तर किती बहार आली असती.' ओलॉफ खेदाने म्हणाला, "माझे हात तर कसे शिवशिवताहेत अगदी. पण माझ्याजवळ आहे फक्त एक रिव्हॉल्व्हर. त्याचा काय उपयोग?"

"काळजी करू नकोस बेटा. आपल्यालाही संधी मिळेल"-राजे हाकॉन शांतचपणे म्हणाले. राजेसाहेबांच्या अविचलित मन:स्थितीचे सगळ्यांनाच आश्चर्य वाटत होते. ते पुढे म्हणाले, "एकूण मला वाटत होतं ते बरोबरच होतं म्हणायचं. जर्मनांनी पुन्हा आपल्याला टिपून आपल्यावर हल्ला चालवला आहे."

" खरं आहे " ली म्हणाला, " राजेसाहेब, आपला अंदाज अगदी बरोबर आहे. हिटलर काही खुळा नाही. आपल्या लोकांना प्रतिकारासाठी प्रोत्साहन देण्याकरता तुम्ही पुन्हा पुन्हा आकाशवाणीवरून निवेदनं करता आहात. हिटलरच्या राजदूताला 'तू मसणात जा' असं तुम्ही सांगितलं होतं. आणि हिटलरला हे पक्कं ठाऊक आहे की जोवर, राजेसाहेब, आपण जिवंत आहात तोवर नॉर्वेतील प्रतिकार संपुष्टात यणार नाही. "

" राजेसाहेब जिवंत आहेत तोवर म्हणजे ?" ओलॉफने न राहवून विचारले, " राजेसाहेबांची निर्घृण हत्या करण्याचा बेत आहे की काय त्यांचा ?"

लीला उत्तर देण्याची संधी न देता स्वतः राजेसाहेबच उद्गारले, " ते नक्कीच तसा प्रयत्न करणार. "

राजेसाहेबांचे वाक्य संपते न संपते तोच जर्मन विमाने फेरहल्ल्यासाठी घिरट्या घालू लागली. या खेपेला हल्ला अधिक नेमका आणि जोरदार होता. इमारतीच्या एका भागाचा त्यांच्या डोळ्यादेखत चक्काचूर झाला. इमारतीला प्रचंड हादरे बसले. दगडाविटांचा पाऊस पडला. त्यातील एक अणकुचीदार दगड लीच्या घोट्याजवळ घुसला, आणि क्षणार्धात फरशीवर रक्ताची धार वाहू लागली.

तशा माऊगर्दीतही ओलॉफने तत्परतेने लीचा पाय व्यवस्थित बांधला. सुदैवाने हाडांना दुखापत झालेली नव्हती. तरीही लीचा पाय तात्पुरता निकामीच झाला होता.

या अपघातामुळे कदाचित त्यांच्या प्रवासाचा वेग मंदावणार होता. पाठलाग करणाऱ्या नाझी सेनेपासून सुटका होण्यासाठी गेले कित्येक तास ती पाच माणसे जीव घेऊन पळत होती. आताही त्यांना पळणे भाग होते. पण कुठे ? कारण हळूहळू जर्मन सैन्याची त्यांच्यावरची मगरमिठी घट्ट होत होती.

विमाने निघून गेल्याची खात्री झाल्यावर सगळे टेबलाखालून बाहेर आले.

" मला वाटतं विमानं पुन्हा येतील कदाचित. पण आता या इमारतीत राहण्यापेक्षा आपण बाहेर पडावं हे बरं " ओलॉफ म्हणाला.

" खरं आहे " राजेसाहेब उत्तरले, " बाहेर पडलेल्या बर्फाचा फायदा घेऊ शकू आपण. कसला तरी तात्पुरता आडोसादेखील तयार करता येईल आपल्याला. पण सर्वप्रथम म्हणजे डॉक्टर लीच्या पायाचं काहीतरी केलं पाहिजे आपण. "

डॉक्टर लीच्या पायातून बरेच रक्त वाहत होते. त्यामुळे त्याची शुद्ध हरपली. ओलॉफनने रक्त थांबवण्याचे आपल्यापरीने पुष्कळ प्रयत्न चालवले होते.

## वेडेलची हत्या

मध्येच ओलॉफ वेडेलला म्हणाला, " वेडेल, तुम्ही जरा इमारतीबाहेर पडून एखादा डॉक्टर मिळतो का पाहा. गावात एखादा तरी डॉक्टर नक्कीच असेल. तोपर्यंत मी मोटारीची व्यवस्था पाहातो. "

इतक्यात ओलॉफला त्या पाच जणांना जेवू घालणाऱ्या मालकिणीची आठवण झाली. तावडतोब तो स्वयंपाकघरात गेला. मालकीण स्वयंपाकघरात मरण पावलेली आढळली.

नाझींबद्दल तिरस्काराचे काही शब्द उच्चारून ओलॉफ पोस्ट-ऑफिसच्या प्रवेशद्वाराशी जाऊन उभा राहिला. दूर वेडेल आवाराच्या फाटकातून बाहेर पडून रस्त्याला लागला होता. त्याला पाहत क्षणभर ओलॉफ उभा राहिला, आणि इतक्यात विमानाची अस्पष्ट घरघर पुन्हा कानावर पडली.

" वेडेल, थांबा. पुढ जाऊ नका " ओलॉफ सर्व शक्ती एकवटून ओरडला.

विमान हल्ल्याचा परिणाम निरिक्षण्यासाठी हे विमान पाठवले असणार हे ओलॉफने ओळखले. वेडेल उघड्यावर अगदी सहज विमानाच्या मारटप्प्यात सापडणार होता. त्यात पुन्हा वेडेलला ऐकू कमी येत असल्यामुळे जर्मन विमानाची चाहूल लागणे कठीण होते. ओलॉफची हाकदेखील त्याला ऐकू आली नसावी.

हे जाणून ओलॉफ वेडेलला सावध करण्यासाठी रस्त्याच्या दिशेने धावत सुटला. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. विमान वेडेलच्या दिशेने झेपावले होते. विमानावरील अशुभ काळी स्वस्तिके देखील ओलॉफला स्पष्ट दिसली. वेडेलला त्याने पुन्हा एकदा हाक मारली. इतक्यात विमानातून मशिनगनची फैर झडली आणि वेडेल रस्त्याच्या कडेला कोसळला.

विमान निघून गेल्यानंतर ओलॉफ वेडेलपाशी गेला. मशिनगनच्या कित्येक गोळ्या वेडेलच्या शरीरात घुसल्या होत्या. त्यामुळे त्याच्या



इतक्यात विमानातून मशीनगनची फैर झडली आणि वेडल रस्त्याच्या कडेला कोसळला.

शरीराचा लोळागोळा झाला होता. जमिनीवरील बर्फ गोठून लोखंडासारखे कठीण झाले होते. त्यामुळे वेडेलला पुरणेही अशक्य झाले. शेवटी ओलॉफने जवळच्या झाडांवरची पाने काढून त्यांचेच आच्छादन वेडेलच्या मृत देहावर घातले.

वेडेलला तसाच टाकून जाणे त्याला असभ्यपणाचे वाटत होते. पण त्याचा नाइलाज होता. राजे हाकॉन अजूनही संकटात होते. ली जायबंदी झाला होता. आणि जर्मनांना त्यांचा नेमका ठावठिकाणा लागला होता. आता त्वरेने पलायन करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

ओलॉफ व्यथित मनाने मोटारीपाशी आला. त्याने इंजिन चालू करून पाहिले. सुदैवाने मोटार पूर्ण शाबूत होती. काही मिनिटांतच त्यांची मोटार उत्तरेच्या दिशेने वेगाने पळू लागली. राजधानी ऑस्लो, हामार, एल्व्हेरम आणि आता नायबर्गसंड. जर्मनांनी या प्रत्येक ठिकाणाहून त्यांना हुसकले होते.

## अकल्पित भाषण

नॉर्वेच्या उत्तरभागात अजून काही नॉर्वेजियन पलटणी निकराचा लढा देत होत्या. जनरल ऑटो रूज हा त्यांचा सेनापती होता. दोस्तांनी काही मदतीचे आश्वासन दिलेले होते. ती वेळेवर पोहोचली तर नॉर्वेचा बचाव करणे अजूनही शक्य होते. तोपर्यंत राजे हाकॉनना पकडण्यासाठी टाकलेल्या जर्मन डावपेचांना उधळून लावणे आवश्यक होते.

बर्फ गोठलेल्या धवल रस्त्यांवरून राजेसाहेबांची काळी मोटारगाडी वेगात चालली होती. भोवताली सगळीकडे शुभ्र हिमाची पखरण झाली होती. राजेसाहेब आणि कोहट ओलॉफशेजारी पुढे बसले होते. डॉक्टर ली पाठीमागील बाजूस आडवे पडले होते. ते अजून बेशुद्धीतच होते. पण जखमेतून होणारा रक्तस्राव आता थांबला होता. आणखी काही मैल दौड मारल्याशिवाय त्यांच्या पायाकडे लक्ष देणे मुष्कील होते.

मध्येच एका इमारतीकडे बोट दाखवून राजे हाकॉनंनी विचारले, " ते रेडियो-स्टेशन असणार नाही का ? "

ओलॉफने त्यांनी निर्देशिलेल्या इमारतीकडे पाहिले. इमारतीवरील ध्वनिक्षेपण-यंत्रणा सहज लक्षात येण्याजोगी होती. त्याने राजेसाहेबांच्या अंदाजाला दुजोरा दिला

" वा, छानच झालं ! " राजेसाहेब म्हणाले, " आता मला इथून लोकांना उद्देशून निवेदन करता येईल. नाही का ? चला जाऊया आपण तिकडे. "

ओलॉफने मुख्य रस्ता सोडून गाडी रेडियोस्टेशनच्या छोट्या रस्त्याला वळवली आणि रेडियोस्टेशनपाशी उभी केली. कोहट चौकशी करण्यासाठी बाहेर पडला, आणि अल्पावधीतच एका तंत्रज्ञाला घेऊन परतला. तंत्रज्ञाने अवघ्या दहा मिनिटांत राजेसाहेबांच्या भाषणाच्या ध्वनिक्षेपणाची व्यवस्था केली. राजे हाकॉन संतुष्ट झाले. जर्मनांना पाठीवर घेऊन उत्तरेचा जीवघेणा प्रवास सुरू केल्यानंतरचे राजे-

साहेबांचे हे तिसरे भाषण होते. राजेसाहेबांच्या अकल्पित भाषणामुळे नॉर्वेजियन जनतेला एक वेगळेच स्फुरण येत असे. पाठलाग करणाऱ्या जर्मनांच्या मनात मात्र तिरस्कार आणि आश्चर्य अशा दोन्ही भावना असत.

राजेसाहेब नॉर्वेजियन जनतेला उद्देशून बोलू लागले, " जर्मन विमानांनी नॉर्वेवर अत्यंत क्रूर हल्ले चालवले आहेत. शांतताप्रिय नागरीकदेखील या हल्ल्यातून सुटलेले नाहीत. सहस्रावधी स्त्रिया आणि मुले यांच्या जीविताला भयंकर धोका उत्पन्न झाला आहे. मी आणि राजपुत्र ओलॉफ अजून तरी सुखरूप आहो. मात्र आम्ही कोठे आहो, कोठून बोलतो आहो, हे सांगणं मला शक्य नाही. कारण जर्मनांनी आम्हांला ठार मारण्याचा विडा उचलला आहे. नॉर्वेच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी झुंजणाऱ्या माझ्या देशबांधवांचा मी अत्यंत ऋणी आहे. "

हे वाक्य संपले आणि रेडिओस्टेशनच्या इमारतीवर पहिला बॉम्ब पडला. भाषण सुरू झाल्या क्षणी जर्मनांना राजेसाहेबांचा ठावठिकाणा उमगला होता. आणि मागावर असलेली जर्मन विमाने आता इथेही येऊन पोचली होती.

तंत्रज्ञाने राजेसाहेबांना भाषण बंद करण्यास विनवले. परंतु राजेसाहेबांनी खूण करून आणखी अवधी मागितला. भावनाकुल होऊन ते लोकांना म्हणाले, " परमेश्वर नॉर्वेचं रक्षण करो. "

दुसरा बॉम्ब पडला, आणि रेडियोस्टेशनची इमारत नखशिखान्त हादरली.

राजेसाहेब, ओलॉफ आणि कोहट कार्यालयातून त्वरेने बाहेर पडले. इमारतीतून बाहेर पडताना त्यांच्या अंगांवर दगडविटा मुक्तपणे कोसळत होत्या. कसेतरी ते बाहेर पडले, आणि त्यांनी जवळच्या काही झुडुपांचा आश्रय घेतला. इतक्यात जर्मन विमाने प्राप्त झाली आणि त्यांनी रेडियोस्टेशनवर निकराचा हल्ला चढवला. एकापाठोपाठ एक असे कितीतरी बॉम्ब रेडियोस्टेशनवर कोसळले आणि पाहता पाहता ती इमारत जमीनदोस्त झाली.

आपली फत्ते झाली असे समजून विमाने परत गेली.


**माधवाश्रम**

गिरगाव, मुंबई ४

अत्यंत स्वस्त दरांत राहण्याची उत्तम सोय

*सुग्रास व चवदार भोजनासाठी*

**महाजन भोजन गृह**

( मर्यादित भोजनपद्धती )

*दूरध्वनी : ३५८६१२*



क्षणा ति ते रेडिओ स्टेशन ज ीनदोस्त झाले.

ओलॉफला वाटले आता फार काळ टिकाव धरणे अशक्य आहे. परंतु राजेसाहेबांचा मात्र धीर खचला नव्हता. आणि त्यांच्यासाठी ओलॉफलादेखील हिंमत धरणे आवश्यक होते. याही वेळेला मोठ्या आश्चर्यकारक रीतीने मोटार बचावली होती. ओलॉफने पुन्हा एकदा चाकाचा ताबा घेतला आणि गाडी उत्तरेला हाणली.

हा प्रवासमार्ग अत्यंत बिकट होता. पर्वतांमागून पर्वत ओलांडताना अत्यंत धोकादायक अशा अरुंद रस्त्यांवरून मोटार चालवावी लागत होती. पुन्हा रस्ता चुकून ती जर्मनव्याप्त प्रदेशात जाणार नाही याची सतत काळजी घेणे आवश्यक होते. या बाबतीत मात्र नॉर्वेजियन नागरिकांनी आणि गृहसंरक्षक दलाने चांगले मार्गदर्शन केले.

जर्मनांच्या पाठलागाचा वेग आपल्यापेक्षा जास्त होईल की काय, अशी सतत भीती ओलॉफला वाटत होती. कधी कधी तर ओलॉफ आणि पाठलाग करणारे जर्मन समांतर रस्त्यांवर असत कधी कधी जर्मन तुकडोला टाळण्यासाठी ओलॉफला प्रचंड वळसा घ्यावा लागे. वाटेतच एखाद्या शेतकऱ्याच्या घरच्या पाहुणचाराचा राजेसाहेब मोठ्या कृतज्ञतेने स्वीकार करीत. मुक्काम करण्याची विनंती मात्र अव्हेरावी लागे.

कसेही करून जनरल रूजच्या तळावर पोहोचणे आवश्यक होते. जीवाच्या आकांताने ओलॉफ मोटार चालवत होता. संकटाच्या छायेमध्ये साऱ्यांचेच चेहरे

ओढलेले दिसत होते. शरीरातील हाड अन् हाड दुखत होते. मन दुसरा विचार करायला तयार नव्हते.

अशा अवस्थेत सतत दोन दिवस त्यांचा प्रवास चालला होता. ओलॉफला विश्रांती देण्याकरता मधूनमधून कोहट मोटार चालवत असे. लीच्या पायावर औषधोपचार करण्यासाठी एका मुक्कामी एक डॉक्टरदेखील मिळाला होता. त्याच्या तज्ज्ञ अंदाजाप्रमाणे लीची जखम काळजी करण्याइतकी गंभीर नव्हती.

मग एकदम त्यांच्या दैवाने उसळी घेतली. अत्यंत निरुंद अशा पर्वतरस्त्याने जात असता अचानक समोरून काही गणवेषधारी सैनिक येताना दिसले. भीतीची एक लहर सर्रकन त्या चार जणांच्या अंगातून निघाली.

पण ते गणवेषधारी नॉर्वेजियन पायदळ-सैनिकच निघाले. त्यांनी राजा-राजपुत्रांना ओळखून मुजरे केले.

" प्रमुख कोण आहे या विभागाचा ?" ओलॉफने त्यांच्या मुजऱ्याचा स्वीकार करीत विचारले.

" जनरल रूज, महाराज. "

" उत्तम. " राजे हाकॉन म्हणाले, " तुम्ही आम्हांला त्यांच्याकडे नेऊ शकाल काय ? "

राजेसाहेबांनी ओलॉफच्या खांद्यावर हात ठेवला, आणि नकळत दोघांच्याही मुखावर स्मित झळकले. सरतेशेवटी ठरल्याप्रमाणे ते जनरल रूजच्या तळानजीक आले होते.

" जनरल साहेबांच्या तळावर जाणं मोठं कष्टाचं आहे " नॉर्वेजियन तुकडीचा प्रमुख म्हणाला, " आणि आपल्याला मोटार इथंच टाकून द्यावी लागेल. "

राजेसाहेबांनी संमती दिली. काही हातबॉम्ब उडवून त्या मोटारीचा चक्काचूर करण्यात आला. आपण एखादी देहान्ताची शिक्षा पाहात आहो, असे ओलॉफला वाटले.

## स्थलांतराची व्यवस्था

अत्यंत खडतर मार्गाने ते अखेर जनरल रूजच्या तळावर येऊन पोचले. जनरल रूजला अर्थातच अत्यंत आनंद झाला. पण राजेसाहेबांना असलेला धोका अजून संपूर्ण टळलेला नव्हता. जर्मन विमाने, त्यांचा शोध घेत, गिधाडांसारखी येण्याचा संभव होता; आणि नॉर्वेजियन पायदळाची पीछेहाट हळूहळू पण सतत होत होती. त्यामुळे जनरल रूजने राजेसाहेबांना तातडीने एकूण परिस्थितीची कल्पना करून दिली. ते म्हणाले, " आजूबाजूला सर्व ठिकाणी जर्मनांनी चांगलाच पाय रोवला आहे, आणि त्यांची आगकूचही जोरात चालू आहे. परंतु आजच नॉरविकच्या दक्षिणेला आणि उत्तरेला ब्रिटिश आणि फ्रेंच सेना उतरल्या आहेत. त्यामुळे थोडा धीर आला आहे. "

" कसंही करून राजेसाहेबांना आता नॉर्वेबाहेर नेलं पाहिजे आपल्याला" ओलॉफ म्हणाला. आतापर्यंत पत्करला तो धोका पुष्कळ झाला."

" अगदी बरोबर आहे तुझं म्हणणं" जनरल रूज म्हणाले, "मी ब्रिटिश नौदलाशी संधान बांधलं आहे. त्यांनाच सांगू आपण राजेसाहेबांच्या स्थलांतराची व्यवस्था करायला. कसं ?"

लवकरच ती व्यवस्था पक्की करण्यात आली. पश्चिम किनाऱ्यावरील एका विवक्षित स्थळी २ एप्रिल १९४० रोजी राजेसाहेबांनी हजर राहावे, असे ठरले. ब्रिटिश नौदलाची बोट त्यांना इंग्लंडमध्ये घेऊन जाणार होती. परंतु पश्चिम किनाऱ्यावरील त्या विवक्षित ठिकाणी पोहोचणे ही सोपी गोष्ट नव्हती. एक तर मार्ग अत्यंत बिकट होता; आणि दुसरे म्हणजे जर्मनांना कधीही या पलायनाचा सुगावा लागण्याचा संभव होता. त्यांच्या सेना आता फारशा दूर नव्हत्या.

परंतु नॉर्वेजियन नागरिकांनी, गृहसंरक्षक दलाने आणि टेहळ्यांनी कंबर कसली. त्यामुळे जर्मनांच्या दृष्टीने पुढील पाच दिवस राजेसाहेब मुळी बेपत्ताच झाले होते. अठ्ठावीस एप्रिलच्या संध्याकाळी राजेसाहेबांनी अॅन्दाल्सनेस सोडण्याची तयारी केली. प्रवासातील हा शेवटचा टप्पा होता. दुसऱ्याच दिवशी ते नियोजित स्थळी पोहोचणार होते.

" मला माझ्या लोकांना उद्देशून एक अखेरचं निवेदन केलंच पाहिजे." राजेसाहेबांनी आग्रह धरला. त्यातील धोका ओळखून ओलॉफने त्यांना त्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी ठरला. वृद्ध, निश्चयी आणि प्रजाहितदक्ष हाकॉन यांची आपल्या लोकांशी हितगुज करण्याची इच्छा कसलाही विवेक बाळगण्यास तयार नव्हती. "मी देशत्याग का करतो आहे हे माझ्या लोकांना सांगितलं पाहिजे मला !" ते म्हणाले.

" पण बाबा" ओलॉफने त्यांना पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला, "नाझी फौजांनी जवळजवळ वेढलंय आपल्याला. आधी तुम्ही नॉर्वेमधून सुखरूप बाहेर

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

जायला हवंय." ओलॉफच्या समजावणीचा काहीही उपयोग झाला नाही. राजेसाहेबांनी लोकांना उद्देशून अखेरचे ऐतिहासिक निवेदन केलेच. आपण मायभूमी तात्पुरती सोडतो आहो आणि विजयी होऊन पुन्हा परत येणार आहोत, असे त्यांनी लोकांना सांगितले.

भाषण संपले, आणि आकाशवाणीच्या केंद्राच्या रोखाने जर्मन विमाने आली. ओलॉफने राजेसाहेबांना त्वरेने केंद्राबाहेर काढले आणि जनरल रूजने त्यांच्या दिमतीला दिलेल्या खास लष्करी गाडीत बसवले. मागेपुढे संरक्षक गाड्या घेऊन राजे हाकॉन यांची गाडी वेगाने पश्चिम किनाऱ्यावरील मोल्डे बंदराकडे निघाली. या बंदरातच राजेसाहेबांना ब्रिटिश क्रूझरवर पाय ठेवायचा होता.

परंतु आकाशवाणीवरील भाषणामुळे जर्मनांना त्यांचा ठावठिकाणा समजला होता. विमानांनी त्यांच्यावर मशिनगनचा मारा केला. या भागातील लढाईची अवस्था इतकी विचित्र होती की कधी काय पुढे वाढून येईल, ते सांगता येत नव्हते.

एका ठिकाणी तर जर्मन पायदळानेच त्यांच्यावर हल्ला चढवला. परंतु बरोबरच्या संरक्षक गाड्यांनी मोठ्या कसोशीने राजाचे संरक्षण करून पायदळाला गुंगारा दिला. पण पायदळ इतके नजीक असणे धोकादायक होते. जवळ येणाऱ्या दुसऱ्या एका प्रचंड जर्मन पायदळ-पलटणीला रोखण्याचे काम एका छोट्या नॉर्वेजियन तुकडीने आपण होऊन पत्करले. वास्तविक अतिबलशाली, आघाशी जर्मन पलटणीला या मूठभर नॉर्वेजियन सैनिकांनी तोंड देणे म्हणजे आत्मघात करण्यासारखेच होते. पण राजाच्या सुटकेसाठी ते या दिव्याला सिद्ध झाले.

आता राजेसाहेबांची मोटार पर्वतश्रेणींच्या अवघड रस्त्यावरून धीम्या गतीने चालली होती. मोटारीच्या पुढचे दिवे विझवलेले होते. सारेच जण गप्प गप्प होते. जर्मनव्याप्त प्रदेशातून आपण जात आहोत, याची कल्पना साऱ्यांनाच होती.

दोन तास उलटले. मोल्डे आता दृष्टिपथात आले होते. राजेसाहेबांची वाट पाहत कड्यावरून टेहळणी करणाऱ्या एका नॉर्वेजियन टेहळ्याला राजेसाहेबांची


अद्ययावत तयार कपडे व सर्व प्रकारच्या टोप्या मुंबईत

**एन्. व्ही. गोखले**

**यांचेकडेच खरेदी करणे इष्ट**

**प्रार्थनासमाजजवळ, गिरगाव, मुंबई ४**

गाडी दिसली. त्याने समुद्रात उभ्या असलेल्या ब्रिटिश क्रूझरला तसा संदेश दिला. काही वेळ गेला. संदेश–स्वीकाराचे आणि प्रत्युत्तराचे काहीच चिन्ह दिसेना. अखेर बऱ्याच कालावधीनंतर ब्रिटिश क्रूझरने संदेशाला प्रत्युत्तर दिले. 'त्या ठिकाणापासून दोन मैलांवरून एक लाँच राजेसाहेबांना घेऊन क्रूझरवर येईल' अशी सूचना त्या संदेशात होती.

हे कळल्यावर साऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. कारण ब्रिटिश क्रूझरची नियोजित वेळ साधली नसती तर राजेसाहेब जर्मनांच्या कचाटयात सापडले असते. मग जनरल रूजकडूनदेखील मदत मिळणे दुरापास्त होते.

आता गाडीचा ताबा खास लष्करी ड्रायव्हरने घेतला होता. संदेशाने निश्चित केलेल्या ठिकाणी जाण्यासाठी त्याने मोटार वळवली. मोटार वळत असतानाच त्यांच्या कानावर दुरून येणाऱ्या जर्मन चिलखती गाडयांची घरघर पडली.

"बापरे, चिलखती गाड्या !" कोणीतरी ओरडले, "आता त्वरा केली पाहिजे." ड्रायव्हरने गाडीला वेग दिला. ओलॉफने मागे वळून पाहिले. मागून पाहरा करणारा एक संरक्षक ट्रक येत होता आणि त्याच्या मागे दूरून येणाऱ्या जर्मन चिलखती गाडयांच्या हिंस्र तोफा त्याला दिसल्या. लगेच तोफमाऱ्याला सुरूवात झाली. राजेसाहेबांची मोटार भरधाव सुटली होती. एक तोफगोळा गाडीच्या वरच्या भागाला चाटून पुढे बराच दूरवर जाऊन फुटला. त्याची धग गाडीत बसलेल्या सगळयांनाच जाणवली.

पण ड्रायव्हर मात्र अविचलित होता. चाकावर जवळजवळ ओणवून तो वेगाने गाडी चालवीत होता. सुदैवाने जर्मन तोफांना आपले लक्ष्य नेमके वेधता येत नव्हते. गाडीने एक भयानक वळण घेतले. एका बाजूला पर्वताचा उंचच उंच कडा होता आणि दुसऱ्या बाजूला शेकडो फूट खोल दरी होती. इतक्यात मागील बाजूला झालेला प्रचंड आवाज सगळयांनी ऐकला. ओलॉफने मान वळवून पाहिले तर मागचा ट्रक त्या वळणावर रस्ता बंद करून आडवा झाला होता. पर्वताच्या कडयाला त्याने प्रचंड धडक मारली होती.

"थांबव आपली मोटार", ओलॉफने ड्रायव्हरला फर्मावले. पण आपण जणू ते ऐकलेच नाही असे दाखवून ड्रायव्हरने गाडीचा वेग यत्किंचितही कमी केला नाही. ओलॉफने पुन्हा एकदा आज्ञा केली. आपले डोळे समोरच्या रस्त्यावर खिळवून ठेवीत ड्रायव्हर म्हणाला, "माफ करा साहेब, पण आपल्याला त्या लाँचवर सुखरूप सोडेपर्यंत कोठेही थांबता येणार नाही मला. तसा जनरल साहेबांचा सक्त हुकूम आहे."

"पण त्या मागच्या ट्रकला अपघात झालेला दिसतो आहे. माणसं जायबंदी झाली असतील त्यातली. आपण थांबून मदत केली पाहिजे त्यांना" ओलॉफने स्पष्टीकरण केले.

"बरोबर आहे तुमचं" ड्रायव्हर शांतपणे म्हणाला, "पण ते असं काहीतरी करून रस्त्याची नाकेबंदी करणार आणि जर्मनांना थोपवून धरणार, हे माहीत होतं मला. मुद्दामच घडवलाय तो अपघात त्यांनी !"

हे उत्तर ऐकल्यावर पुढे काही बोलणे अशक्यच होते. गाडी पुढे निघाली. समोर रस्त्याच्या कडेला उभे राहून कोणीतरी दिव्याने खुणा करत होते. ड्रायव्हरने गाडी थांबवली. मंद चंद्रप्रकाशात, गाडीतील भाग्यवंत प्रवाशांनी तो ब्रिटिश नौदलाचा रूबाबदार गणवेष धारण केलेला अधिकारी पाहिला. त्याने या शाही तुकडीला सलाम ठोकला. अल्पावधीतच या तुकडीने ब्रिटिश क्रूझरकडे नेणाऱ्या लाँचवर पाय ठेवला.

राजेसाहेबांच्या स्फूर्तिशाली, धीरोदात्त वर्तनामुळे आणि ब्रिटिश, फ्रेंच व पोलीश सेनेने केलेल्या साहाय्यामुळे नॉर्वे राष्ट्र बासष्ट सतत दिवस झुंजत राहिले. युद्धाच्या त्या सुरुवातीच्या काळात, एक ब्रिटनचा अपवाद सोडता इतर कोणताही देश जर्मनांच्या अधाशी आक्रमणाला इतका काळ तोंड देऊ शकला नव्हता. नॉर्वेचा रणसंग्राम चालू असतानाच चार दिवसांत हॉलंडचा आणि अठरा दिवसात बेल्जमचा पाडाव झाला. चार जून रोजी फ्रान्सदेखील पराभूत झाले.

नॉर्वेच्या रणसंग्रामात नाझी सेनेचे पासष्ट हजार सैनिक कामी आले. आणि अखेर नॉर्वे जरी जर्मनांनी व्यापला तरी नॉर्वेने संपूर्ण शरणागती कधीही पत्करली नाही. लंडनहून ध्वनिक्षेपित केल्या जाणाऱ्या राजे हाकॉन यांच्या भाषणांनी प्रोत्साहन लाभलेली नॉर्वेमधील भूमिगत प्रतिकार चळवळ अखंड चालू राहिली. नॉर्वेच्या नागरी जनतेने तिला सर्वतोपरी साहाय्य केले. नॉर्वेसारख्या चिमुकल्या देशाला चुटकीसरशी लोळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हिटलरला नॉर्वे देशाने चांगलाच धडा शिकवला. ○

# भीम आणि देशभक्त बकासूर

वनवासात असताना पांडव आणि कुंती एकवीरा नगरीत मुक्कामाला आले. एका ब्राह्मणाकडे भोजन-निद्रा आदी सर्व सोय 'एकवीरा पथिकाश्रम' या नावाने केलेली होती. पांडवांनी या पथिकाश्रमात तळ ठोकला. जेवणखाण करून सगळे झोपी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास कुंतीला एकाएकी रडण्याचा आवाज ऐकू आला आणि ती जागी झाली. [ तिला पहिल्यांदा बराच वेळ वाटले की, नभोवाणीवर एखादी श्रुतिकाच लागली असावी ! त्यामुळे प्रथम तिने लक्ष दिले नाही. पण हे रडणे इतके जिवंत होते की ते श्रुतिकेतले असेल हे पटेना. ] तिने हळूच कानोसा घेतला.

पलीकडच्याच खोलीत पथिकाश्रमाचा मालक आणि त्याची आई रडत होती. मधूनमधून कुजबुजत होती. हुंदके ऐकू येत होते.

कुंती उठली. तिने प्रेमळपणाने चौकशी केली तेव्हा ब्राह्मणाची म्हातारी आई म्हणाली,

" या नगरीत बकासूर नावाचा पुढारी आहे. तो गावाबाहेर रानात बंगला बांधून राहतो. मेला असा दुष्ट आहे की काही विचारू नका. सगळी सत्ता त्याच्या हातात. जिल्हा-परिषदेचा अध्यक्ष तोच, मध्यवर्ती सहकारी बँकेचा अध्यक्ष तोच, आमदार तोच आणि नगरपालिकेचा अध्यक्षही तोच. इतका पैसा खातो की काही विचारू नका. आम्ही उडपी ब्राह्मण. मुंबई सोडून इकडे आलो तर हा त्रास—."

" त्रास ? कसला त्रास देतो तो ?" कुंतीने चौकशी केली.

त्या म्हातारीने दीर्घ निःश्वास सोडला.

" जाऊ द्या बाई. तुम्ही दोन दिवसाच्या पाहुण्या. तुम्हाला काय आमच्या कटकटी सांगून उपयोग ?"

" तुम्ही सांगा तर खरं."

" अहो, हा बकासूर पसा भयंकर म्हणजे भयंकर खातो. पाच-पन्नास लोकांना पुरेल इतका गाडाभर पैसा तो रोज मागतो. हिंडायलाफिरायला कुणाचीही जीप, गाडी, ट्रक मागतो. शिवाय कोंबडी माग, बकरं माग हे निराळंच."

" अन् नाही दिलं तर?"

"नाही म्हणायची सोय आहे का बाई? तुम्ही गेष्ट, तुम्हाला ठाऊक नाही. खून करीन म्हणून धमक्या देतो. अन् केलेत् मेल्यानं कित्येकांचे खून आत्तापर्यंत."

कुंतीने हळूहळू माहिती काढून घेतली. तिला सगळा वृत्तांत समजला. हा बकासूर फार मोठा देशभक्त होता. त्याचा आसपासच्या पंचक्रोशीत इतका वचक होता की बिनविरोध निवडून येणे ही गोष्ट त्याला तळहातावरील मळासारखी होती. कुणी थोडा विरोध केला की त्याचा मुडदा पडत असे. कुठे कुणाला चोप बसेल, कुणाचे डोके रक्तबंबाळ होईल याचा नेम नव्हता. त्यामुळे लोक भिऊन होते. त्यांनी आपणहून बकासुराला पाहिजे ते बिनतक्रार द्यायला सुरुवात केली होती. कोंबडी, बकरी, हिंडायला जीप, ट्रक आणि वर भरपूर पैसे, प्रत्येकानं पाळीपाळीने हा खुराक पुरवायचा. आज त्या उडपी ब्राह्मणाची पाळी होती. म्हणून ते दोघेही मायलेक रडत होते.

" आता तुम्हीच विचार करा बाई. या दिवसात प्रपंचाला काय लागत नाही? पोट भरेना म्हणून आमचा मुलूख सोडून इकडे आलो. इथे हा वनवास. आता कुठून आणायचा हा पैसा? कालच दागिने विकले. गेस्ट हाऊस गहाण टाकलं. तरी त्याला पाहिजेत तेवढे पैसे जमले नाहीतच! आता सकाळी पैसे घेऊन तिकडं जायचंय माझ्या पोराला –"

म्हातारी रडत रडत बोलत होती. ब्राह्मणही गप्प बसून राहिला होता.

कुंतीला त्यांची दया आली. धीरगंभीर मुद्रेने तिने आश्वासन दिले. "बाई, काही घाबरू नकोस. तुझ्या मुलाऐवजी उद्या माझा मुलगा जाईल. त्याचे बघून घेईल."

" छे: छे:! तुम्ही गेष्ट. तुम्हाला कशाला विनाकारण त्रास? तुमचा पोरगा उगीच मार खाऊन येईल परत झालं! मारून कुठे टाकलं मेल्यांनी तरी कळायचं नाही."

कुंतीने तिला समजावून सांगितले की, तुला एकुलता एक मुलगा आहे आणि मला पाच आहेत. एक ' स्पेअर ' करायला काहीच हरकत नाही. शिवाय ज्याला मी पाठवणार आहे तो चांगला घट्टाकट्टा आहे. एरवी तो बकासुराच्याच लायनीत जायचा. पण घरचे संस्कार चांगले. त्यामुळे सरळ आहे. तो बकासुराकडे पाहून घेईल. नुसता मार खाऊन येणारा तो पोरगा नाही. देशभक्तांना बुकलण्याची त्याला चांगली सवय आहे. दोन देऊन, दोन घेऊन तो परत येईल.

कुंतीने पुन्हा पुन्हा आश्वासन दिले तेव्हा म्हातारी तयार झाली. कुंतीने मग त्या

ब्राह्मणाला विचारून बकासुराबद्दल बरीच माहिती गोळा केली. मग भीम झोपला होता त्याला उठवले. भीम डोळे चोळीतच जागा झाला. कुंतीने त्याला सगळा वृत्तांत सांगितला. भीम बकासुराच्या भेटीला जायला एका पायावर तयार झाला.

सकाळ झाली तशी भीम बाहेर पडला. बाहेर ब्राह्मणाने ट्रक उभोच करून ठेवली होती. कोंबडयाची टोपली होती. चार बकरी बांधली होती. तो ट्रक घेऊन भीम निघाला तो थेट बकासुराच्या रानातल्या बंगल्याकडं गेला.

बंगल्याच्या बाहेर उभा राहून भीमाने हॉर्न वाजवला. आणि तो गाडीला रेलून आळस देत उभा राहिला. सकाळीच घेतलेले वर्तमानपत्र वाचू लागला.

ट्रकचा आवाज ऐकून बकासुर डुलतडुलत बाहेर आला. आपल्या बंगल्याबाहेर खुशाल वर्तमानपत्र वाचीत पडलेल्या भीमाला पाहून त्याचे चित्त खवळले.

" कोण रे तू ? – " त्याने गर्जना केली. " काय काय आहे बोल लवकर, अन् काय आणलं असशील ते ठेव लवकर अन् चालू लाग, मला टाईम नाही. एका मीटिंगला जायचंय्, "

भीमाने बकासुराच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. तो आपला शांतपणे अग्रलेख वाचू लागला. आता मात्र बकासुर फारच खवळला, तो ओरडला,

" इतका माजलास काय तू ? थांब, इथं तू कसा जिवंत राहतोस ते बघतो. मरेतोपर्यंत बडवतो. बदली करतो. "

तरीही भीमाने तिकडे लक्ष दिले नाही. तो आपला छोटया जाहिराती वाचू लागला. शेवटी बकासुर मारामारीपर्यंत आला तेव्हा भीम म्हणाला, " गप्प बैस मूर्खा ! मुकाटयानं तोंड काळं कर. तुझी सगळी कुलंगडी माहीत आहेत मला. "

" कसली कुलंगडी ? " बकासूर थोडा दचकला.

" खोटी भत्ताबिलं लावून फसवतोस सरकारला ? ग्रामसेविकांना त्रास देतोस ? बँकेत अफरातफर करतोस ? सगळं माहीत आहे मला. "

बकासुर चमकला. पण धिटाईने आणि गुर्मीने म्हणाला, " ऊं ! कोण काय करणार आहे माझं त्याबद्दल ? माझ्या वाटेला जायची कुणाची प्राज्ञा नाही. "

" सगळा पुरावा आहे माझ्याजवळ. अन् तो वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणार आहे–" भीम गंभीरपणाने बोलला.

आता मात्र बकासूर दचकला. गांगरून त्याने विचारले,

" पण–पण तू कोण ? "

" मी तुझा बाप. हाः हाः " तुझे अन् बाईचे फोटो आहेत माझ्याजवळ, छापू का ? " भीमानं दणकून थाप हाणली.

' मी पैसा सोडीन पाण्यासारखा, सगळयांची तोंडं बंद करीन. "

" त्याच्या आधी मीच केलंय ते काम, आता लोक तुला जोडयानं मारतील. बघ पाहिज असलं तर ! "

" पण मी सरकारचं दडपण– "

" सरकारचीच माणसं आलीत इथं, देशभक्त होण्यापूर्वी तू दरोडे घातले होतेस ना? त्याची चौकशी चालू आहे. " भीम बोलला. मग हळूच बकासुराच्या कानाशी लागून तो म्हणाला, " तुझ्या पार्टीच्या विरुद्ध गटाच्या माणसांनीच ही सगळी माहिती वर पुरवलेली आहे. आता बोल. "

पण बोलायला बकासुर शुद्धीवरच नव्हता. त्याचे तोंड पांढरेफटक पडले. त्याची बोबडी वळली.

मग भीमाने शेवटचा बाण काढला.

" पुढच्या इलेक्शनला तुला तिकिट द्यायचं नाही हे पक्कं ठरलंय्. पण अविश्वासाचा ठरावही लवकरच येणार आहे तुझ्याविरुद्ध. तुझ्या सगळ्या खुर्च्या काढून घेणार आहेत. आहेस कुठं मुर्खा तू ? "

बकासुर थरथर कापू लागला.

" हां, आता याला उपाय एकच. तुला कुठलं तरी परदेशच्या दौऱ्याचं निमंत्रण आलंय ना ? ते पत्कर अन् परदेशाला रवाना हो. प्रकृतीच्या कारणास्तव तिकडंच राहा चार दोन वर्षं. म्हणजे निदान मिळवलंयस तेवढं तरी राहील, विचार कर. "

बकासुराने थोडा वेळ विचार केला. मग मुकाटयाने त्याने या गोष्टीला मान्यता दिली. त्याच दिवशी तो विमानाने परदेशात रवाना झाला.

ट्रक घेऊन भीम परत आला. कोंबडया बकरी ज्याची होती त्याला दिली. आता बकासुराची कसलीही भिती नाही म्हणून त्याने जाहीर केले. सगळीकडे आनंदीआनंद झाला. भीमाच्या अभिनंदनाची सभाही झाली. उडपी ब्राह्मणाने त्याचे आभार मानले.

' एकवीरा पथिकाश्रम ' सोडून पांडव व कुंती पुढे निघाले.

तात्पर्य : शक्तीला दुबळे भितात. युक्तीला शाहणे बळी पडतात. पण त्याच्या जोडीलाच मस्ती असेल तर मोठमोठे देशभक्तही टरकतात.

– द. मा. पुराणिक


पेढे ✦ बर्फी ✦ श्रीखंड

सर्व प्रकारची मिठाई – गरमागरम फरसाण

**लोकमान्य स्वीट मार्ट**

डॉ. डी. सिल्व्हा रोड, दादर (पश्चिम रेल्वे), मुंबई–२८.

[ टेलिफोन ४५२४२९ ]

[ BYP ]

 [ पृष्ठ १७ वरून ]

आपल्यावर पाच हजार कोटी रुपयांची परकी कर्जे साचली आहेत. त्यांच्या नुसत्या परतफेडीचा वार्षिक हप्ता आता ३५० कोटी रु. च्या घरात पोचतो आहे. ही काही स्वावलंबी होण्याची लक्षणे नव्हेत. जुनी कर्जे फेडण्यासाठी नवी कर्जे मागायची पाळी येणे हे कर्जबाजारी झाल्याचेच लक्षण आहे. हा अधःपात होण्याची कारणे दोन आहेत. सरकारी आणि खासगी या दोन क्षेत्रातील भेद आम्ही फारच ताठर राखला. त्यात लवचिकपणा कसा तो येऊच दिला नाही.

दुसरे असे की भांडवल हवे म्हणून आपण ओरड करीत राहिलो परंतु या देशात आजही सरकारी क्षेत्रात ३० अब्ज आणि खासगी क्षेत्रात सर्व मिळून ५० अब्ज रुपयांचे भांडवल आहे याची जागरूक दखल सरकारने घेतली नाही. ८० अब्ज रुपयांचे भांडवल ज्या देशाच्या अर्थव्यवस्थेला जुंपलेले आहे त्या देशाला फेरगुंतवणीसाठी या भांडवलाच्या दहा टक्क्याइतकीही रक्कम उभी करता आली असती तर दर वर्षी आठशे कोटी म्हणजेच पंचवार्षिक काळाकरता चार हजार कोटी फेरगुंतवणुकीसाठी मिळाले असते आणि जगापुढे आपल्याला हात पसरावा लागला नसता. आजही निदान दहा टक्के प्राप्ती सरकारी वा खासगी सर्व कारखान्यांनी फेरगुंतवणीसाठी राखून ठेवली तर आपली कर्जे हा हा म्हणता वितळून दिसेनाशी होतील.

यासाठी आपले उत्पादन उत्पादनक्षमतेइतके झाले पाहिजे. **आज फक्त ४० ते ६० टक्के क्षमताच उत्पादनाच्या कामी येत** आहे. हा राष्ट्रीय अपव्यय आहे. प्रत्येक कारखाना भरताकदीने चालला पाहिजे. यामुळे उत्पादन खूप वाढेल तर वाढू द्या, आपण ते निर्यात करू. जपानची सर्व अर्थव्यवस्थाच मुळी निर्यातीवर उभी आहे. आपल्याला जे नितांत आणि किमान आवश्यक आहे, ते आयात करण्यासाठी भरपूर निर्यात हे जपानच्या अर्थव्यवस्थेचे तत्त्व आहे ते आपणही अंगीकारले पाहिजे. पूर्ण क्षमतेइतके उत्पादन, ते पुरून उरल्यास कसोशीची निर्यात याच दोन तत्त्वांवर भिस्त ठेवून आपण ऋणमुक्त होऊ शकू.


# शिलंगणाचे सोने

**ब. मो. पुरंदरे**

**आवृत्ती समाप्त**

चार

# आज, आत्ता, या क्षणाला........

एस्. एम्. जोशी यांनी ऋणाचे दोन प्रकार सांगितले. माणसाची पत असेपर्यंत त्याला कर्जे मिळत राहतात. पण तीच पत गेली की दिडकी मिळेनाशी होते, उधार मिळेनासे होते. हीच गोष्ट देशालाही लागू करून पाहा. आजपासून सुमारे २० वर्षांपूर्वी आपल्यापाशी तसे पाहिले तर काय होते ? ज्याला या देशाची मालमत्ता म्हणून सांगता येईल, असे काहीही येथे नव्हते. परंतु आपली जगात इभ्रत मोठी होती म्हणून कर्जे मिळत गेली. आज उलटे झाले आहे. कदाचित या देशाची म्हणून दिमाखाने सांगता येईल अशी मालमत्ता गेल्या वीस वर्षांत वाढली असेल. परंतु आपली इभ्रत कमी झाली. आज जगातील राष्ट्रे, छोटी छोटी राष्ट्रे आपल्याला ' मदत ' द्यायला पुढे येतात आणि आपण मैत्रीचे पोवाडे गात ती खुश्शाल-घेतो. यामुळे जेथून भरघोस मदत मिळण्याची शक्यता ती राष्ट्रे आपल्याला द्यावयाच्या मदतीत कपात करू लागली आहेत. कारण आपली मालमत्ता वाढली तरी इभ्रत गेली. ही इभ्रत, ही दानत, ही सचोटी हेच देशाचे खरे भांडवल आहे. ते भांडवल कमी झाले की आपल्याला मानाची ऋणे मिळणे बंद होणारच. नोकरी असेपर्यंत मुलीच्या लग्नासाठी गावचा सावकार पगाराच्या दहा वीस पटीने उधार देतो. पण नोकरी सुटल्याचे कळताच पावटेभर तेल उधार द्यायला तयार होत नाही तशातलाच प्रकार. म्हणून देशाचे खरे भांडवल वाढवले पाहिजे. हे भांडवल म्हणजे पत, ती गेल्याने कर्जाचा भार आणखीच बोजड होत असतो. ही पत जाण्याचे कारण आपला व्यापारी चारित्र्य सोडून वागू लागला. माल दाखवायचा एक द्यायचा दुसरा, असला प्रकार तो करू लागला. म्हणून जागतिक बाजारपेठात आपल्या मालाला मागणी येईनाशी झाली. प्रश्न मालाचा नसून माल विकणाऱ्यांच्या दानतीचा आहे. आणि त्याच्या दानतीस खोट आली की देशाचे नाव बद्दू झालेच. हा प्रकार सुधारला पाहिजे. या ऋणातून आधी मुक्त झाले पाहिजे. राष्ट्राचे खरे भांडवल जे चारित्र्य, ते घसरल्यामुळे वाढीस लागलेल्या ऋणातून आधी देश सोडवला पाहिजे.

## खरा पुरुषार्थ

दुसरे ऋण म्हणजे ज्याला आर्थिक कर्ज म्हणतात ते. त्यातून मुक्त व्हायचे असेल तर मालाचा कस वाढवला पाहिजे. देण्याची ताकद वाढवली पाहिजे. कच्चा माल नुसता निर्यातच कां म्हणून करायचा ? आपल्याकडेही कारखाने झालेले आहेत. त्यात तयार करता येणाऱ्या तयार मालासाठी लागणारा कच्चा माल हवा तर आयात करावा आणि तयार माल म्हणून ज्येथून कच्चा माल आणला त्या देशाला विकावा. असे का होऊ नये ? पण हे करायला पुरुषार्थ दाखवावा लागेल. तो राज्यकर्त्यांनी दाखवलाच पाहिजे आणि आताच दाखवला पाहिजे. तरच ऋण-मुक्ततेची कल्पना आणि तिचा ध्यास हा खरा ठरेल. चार वर्षांनी कोणाची मदत घेणार नाही असे म्हणण्यात पुरुषार्थ नाही. आज, आता, या क्षणाला सर्व परकी मदत आम्ही बंद करतो असे जाहीर करण्यात खरा पुरुषार्थ आहे. यंदा भरपूर पीक येऊनही धान्य आयात होणारच आहे. याचा अर्थ शेतकऱ्यावर देशाचा, सरकारचा विश्वास नाही असाच होतो. धान्य मदत येत आहे. तोवर आमचा शेतकरी कार्यक्षम व्हायचा नाही.

## तीन संकल्प

म्हणूण तीन संकल्प करू या. देशाला ऋणमुक्त करण्यासाठी या तीन संकल्पाचे उदक आपण जनता जनार्दनाच्या हातावर सोडू या. १ : प्रत्येक कारखान्यातील कामगारांशी असा करार करू या की उत्पादनक्षमतेची वाढ जितक्या टक्क्यांनी कराल तितक्या प्रमाणात पगारात वाढ मिळेल. २ : शेतकऱ्यांना सांगू या की बाबांनो तुम्हांला शेतीसाठी पाणी, वीज, इंजिने, खते, कर्ज सर्व काही देऊ पण ते दिल्यावर तुमच्या शेतातील उत्पादन एकरी अमुक इतके झालेच पाहिजे. त्या धान्याचा कस उत्तम असलाच पाहिजे. समाजात असे काही चैतन्य ओतले पाहिजे. असे मोठे आदर्श, संपूर्ण समाजासाठी, देशासाठी आमच्या लोकांच्या जीवनाला स्पर्शच करेनासे झाले आहेत. त्यांचा स्पर्श लोकांना घडवला पाहिजे आणि त्यांच्यात चैतन्य ओतले पाहिजे. ३ : आणि हे सर्व घडवून आणण्यासाठी आमच्या शिक्षणात मूलगामी बदल केला पाहिजे. हेतुपूर्वक शिक्षण आखले पाहिजे. राष्ट्राची गरज ओळखून नियोजन केले पाहिजे. हे नियोजन विकेंद्रीत व्हावे. राष्ट्राची मालमत्ता विकेंद्रित रूपात–जिल्हाजिल्ह्यात धरणे, छोटे कारखाने, वीजकेंद्रे, इत्यादी रूपाने विखरून वाढीस लागली पाहिजे. ती विकेंद्रित रूपात वाढवण्यासाठी गावोगावचा माणूस खपेल अशी प्रेरणा निर्माण केली पाहिजे. नियोजन असे खालून वर आले पाहिजे, आजच्यासारखे वरून खाली जाता कामा नये. धडाडीने, धाडसाने आणि धोके पत्करून असे चैतन्य देशात निर्माण केले तर हा देश ऋणाच्या चिखलात इतका खोल रुतला असला तरी वर निघू शकेल.

पाच

# शेतीला प्रतिष्ठा लाभली पाहिजे.......

रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय आपल्याला नापसंत आहे असे पंत-प्रधानांना त्यावेळी मद्रासचे अर्थमंत्री असतानाही स्पष्टपणे सांगणारे आणि जागतिक बँक आणि विश्व-संघटना यांच्याशी निरनिराळ्या निमित्ताने अनेकदा वाटाघाटीस जाऊन आता नियोजन मंडळाचे उद्योग विभागाचे सदस्य झालेले **श्री. आर. व्यंकटरामन** यांनी आपली लाचार ऋणकोची अवस्था का झाली याची दोन कारणे सांगितली. एक म्हणजे अन्न आणि दुसरे म्हणजे विकास-खर्च.

ते म्हणाले-पी. एल.-४८० नुसार अमेरिकेकडून अगदी सहजगत्या धान्य मिळत गेल्याने आपण एकापरीने आत्मसंतुष्टतेच्या आहारी गेलो. त्यामुळे आपले स्वतःचे धान्योत्पादनाचे परिश्रम थंडावत गेले. दोन दुष्काळ लागोपाठ न पडते तर आपण पूर्णपणे रसातळाला गेलो असतो. शेतकीबाबतचे प्रयत्न थंडावल्याचा परिणाम असा झाला की आपल्याजवळ जी जी सर्वोत्तम म्हणून कर्तबगारीची माणसे होती ती आम्ही कारखानदारीत पाठवली, जणू शेतकीला आपल्या लेखी काही महत्त्वच उरले नव्हत, किंवा तिच्यात कोणतीही माणसे घातली तरी चालण्यासारखे आहे असा आपण समज करून घेतला. आजही सामाजिक परंपरेत आमच्याकडे शेतकऱ्याला शेवटच्या पायरीवरच जागा आहे. त्याला प्रतिष्ठाच नाही. म्हणून आपले धान्योत्पादन घटत गेले.

तशात धान्यावरील नियंत्रणानेही भर घातली. साठेबाजीच्या लहान अपराधाखातर पकडल्या जाणाऱ्या लोकांबाबत आपण समाजात जे वातावरण निर्माण केले, त्यामुळे जास्त धान्य पिकवल्यास आपलेही असेच होईल असे वाटून शेतकरी हतोत्साह होत गेला. त्याची पुढाकारी वृत्ती ओसरली. अशा स्थितीत ते पीएल चे ४८० धान्य आले. त्यासाठी आपल्याला काहीही किंमत द्यावी लागत नव्हती. त्या धान्याच्या देशातील विक्रीतून येणारा पैसा परत आपल्याच विकास योजनांसाठी खर्च करता येत होता. याच्या गळाला आपल्या नियोजनकारांचा मासा कायमचा लागला. आज पीएल ४८० धान्याचे हजारो कोटी रुपये आपल्या देशात साचले आहेत. त्या पैशासाठी

आपण काहीहि केलेले नाही. त्यामुळे तो पसा आपली अर्थव्यवस्था कुरतडतो आहे, पोखरतो आहे. व्यवहारात त्याचा अर्थ इतक्या हजार कोटींच्या नोटा आपण नाशिकच्या छापखान्यात छापून घेतल्या असा होता. याचाच परिणामी अर्थ असा की तितक्या रुपयांनी चलनफुगवट झाली आहे. हेच आमच्या कर्जबाजारी होण्याचे प्रमुख कारण आहे. **म्हणून नियोजन मंडळाचे म्हणणे आहे की १९७० अखेर पीएल-४८० च्या धान्य आयातीला संपूर्णपणे फाटा द्यावा.** त्यामुळे आणखी काही होवो न होवो निदान चलनफुगवटा तरी थांबेल. कारण या आयातीत नुसते धान्य येत नाही तर कापूस, काही तेलबिया वगैरे बऱ्याच गोष्टी येतात.

म्हणून ही आयात एकदम बंद केलीच पाहिजे. मग जे काही देशात असेल तेवढयावरच भागवण्याची जिद्द देशात निर्माण होईल. मग शेतकऱ्यालाही उभारी येईल. तो जास्त खपेल, जास्त श्रमेल, माती जास्त पीक देईल आणि कर्जबाजारी-पणाची देशाच्या चेहऱ्यावरची अवकळा मावळायला लागेल.

दुसरे कारण म्हणजे आपला विकास खर्च. जगातल्या प्रत्येक देशाने आपल्या विकासाकरता कर्जे घेतली आहेत आणि अगदी अमेरिका आणि रशिया हे देश-देखील त्याला अपवाद नाहीत. तेव्हा विकासाकरता कर्जे घेण्यात वावगे काहीही नाही. मात्र या कर्जाची एक मर्यादा असते आणि ती मर्यादाच आपल्याला ओळ-खता आली पाहिजे. ही मर्यादा अशी की सर्व कर्जे आणि उसनवारी आपण थांब-वलीच पाहिजे आणि आपल्या मालाच्या निर्यातीच्या रूपाने आपण ज्याची परत-फेड करू शकू तेवढेच कर्ज उचलीत राहिले पाहिजे.

श्री. व्यंकटरामन यांनी एक मुद्दा मोठा मार्मिकपणे सांगितला. ते म्हणाले, की अमक्याने मदत दिली असे आम्ही मारे पत्रके काढकाढून जगाला आणि स्वतःलाही सांगत असतो. परंतु आपण हे विसरता कामा नये की कोणतेही राष्ट्र आपल्याला जी मदत देते, ती मदत ही नेहमीच त्याच्या निर्यात वाढवण्याच्या कार्यक्रमाचाच एक भाग असते. याचे कारण पाहा. तुम्हांला ते जी मदत देत असते, त्या मदतीच्या रकमेने तुम्ही त्या देशातूनच तुमच्या विकासाला हवा असलेला माल विकत घ्यायचा असतो आणि तोही ते राष्ट्र सांगेल त्या भावाने. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की अशा प्रकारे मदत देणारे राष्ट्र आपल्या कर्जावर अगदी नाममात्र व्याज घेते आणि त्याची कितीतरी पटीने वसुली आपल्या मालाच्या तीस तीस टक्क्यांनी वाढीव भाव सांगून करून घेत असते. एका देशातील मंडळींनी तर चक्कच सांगितले होते, की हा भाव ३० टक्के जास्त आहे खरा, पण तुम्ही रोख पैसे देत असाल तर ही ३० टक्के कपात करून देऊ. बाकी तुम्हांला दिलेल्या पैशाबद्दल म्हणाल तर ते परत मिळण्याची फारशी आशा आम्हाला नाही. तेव्हा मदतीमुळे कर्ज कसे अडीदिढीने वाढते ते लक्षात घेतले नाही म्हणून आपण कर्ज-बाजारी झालो. राहिला प्रश्न आपल्या मालाचा. आपल्या **येथे पोलाद कारखाना**

उभारण्याचा खर्च आपल्याला मदत देणाऱ्या राष्ट्रातील खर्चापेक्षा दुप्पट आहे. तेव्हा त्यातील पोलादही दुपटीने महाग पडणार आणि मग निर्यात-उत्तेजन म्हणून आपल्या खर्चाने सरकारला ते कमी भावाने निर्यात करून तोटा पत्करावा लागणार. असा हा मोंगळ कारभार चालला आहे.

रुपयाचे अवमूल्यन करतानाही कोणीही आर्थिक परिस्थितीचा नीट विचारच केला नाही. बाकीचा भाग काहीही असो परंतु आपण घेतलेल्या परकी कर्जाची रक्कम ३००० कोटी रूपयांवरून या अवमूल्यनामुळे एकदम ५००० कोटी रुपयांवर गेली आणि त्या प्रमाणात देशातील प्राप्ती मात्र मुळीच वाढली नाही आणि आता कपाळावर हात मारण्याची वेळ आली आहे.

यातून उपाय नाहीत असे नाही. पण ते कणखरपणे अंमलात आणले पाहिजेत. १. सर्व आयात बन्द करणे. फक्त आपल्या कारखान्यांचे कामकाज चालू राखण्यासाठी अपरिहार्य असेल तेवढीच आयात अपवाद म्हणून करणे. २ : ज्या ज्या उत्पादनासाठी परकी चलन लागत असेल ते सर्व ग्राहकोपयोगी उत्पादन बन्द करणे. उदाहरणार्थ, देशातील कापूस वाया जातो आणि टेरेलीन तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल आयात करण्यासाठी परकी चलन दिले जाते हे योग्य नाही. ३ : देशातील उत्पादन क्षमता कमाल पातळीवर नेण्यासाठी निर्यातीची आणि ती वाढवण्याची कास धरणे. देशात ५० किलोवॅट वीज तयार करणारे जनरेटर्स तयार होतात. देशातील मागणी फक्त २० लाख किलोवॅटची आहे. मग उरलेले ३० लाख किलोवॅटचे जनरेटर निर्यात केलेच पाहिजेत. त्यासाठी बाजारपेठा हुडकल्या पाहिजेत. ४ : ज्या गोष्टी देशात तयार होतात त्या बाहेरून आणण्यावर पूर्णपणे बंदी घालणे. गुजरायमध्ये धुवारण येथील वीज कारखान्याला लागणारे सर्व भाग देशात भोपाळचा अवजड वीज सामान कारखाना तयार करीत असतानाही कोणाच्या तरी दडपणाखातर ते भाग बाहेरून आणायची परवानगी ऐनवेळी देण्यात आली, हे होता कामा नये. ५ : पश्चिम आशियातील देशासारख्या देशात जाऊन आपण संपूर्ण कारखाने उभारून देण्याची कंत्राटे घेतली पाहिजेत. नुसता माल विकण्याचा फेरीवाल्याचा दृष्टिकोन टाकून दिला पाहिजे. संयुक्त मालकीचे कारखाने उभारायलाही मोठ्या प्रमाणावर पुढे सरसावले पाहिजे. ६ : देशात निर्यातक्षमता निर्माण केली पाहिजे आणि ७ : आपल्या उत्पादन खर्चात कपात करण्यासाठी कोणत्याही कच्च्या मालावर उत्पादन-कर न बसवता तो फक्त तयार मालावरच बसवण्याचा धाडसी आणि क्रांतिकारी निर्णय घेतला पाहिजे. यामुळे आपल्या मालाची किंमत कमी करता येईल, त्यामुळे तो तेवढा स्वस्त होईल आणि त्याची निर्यात वाढल्याने देशाचे ऋण कमी होत जाईल.

# सहा

## खाजगी कर्जे आणि सरकारी कर्जे

स्वतंत्र पक्षाचे सरचिटणीस आणि खासदार श्री. नारायणराव दाण्डेकर हे एक कुशल प्रशासक आणि मुक्त व्यापार उदीमाचे कट्टर समर्थक म्हणून विख्यात आहेत. त्यांनाही या मुद्यावर भेटलो आणि त्यांनी ऋणमुक्ततेच्या कल्पनेवर आणखी प्रकाश टाकला.

त्यांनी कर्जाचे दोन भाग केले. तत्पूर्वी मदत, सहायता आणि कर्ज ही नावे भिन्न असली तरी त्यांचा व्यावहारिक अर्थ ऋण हाच आहे हे त्यांनी सांगून टाकले. देशावरील कर्जाचा भार का वाढतो ते सांगताना ते म्हणाले, कोणीही दिलेले कर्ज असो तो तीन कसोटया लावीत असतो. ज्या कामासाठी कर्ज द्यायचे ते काम बाजारात खपेल का, त्या कारखान्यातील माल बाजारात तग धरण्यायोग्य किमतीला विकता येईल अशा पद्धतीने तयार करता येईल का आणि त्या किमतीला विकणे कारखान्यात गुंतवलेल्या भांडवलाच्या तुलनेने विचार केल्यास किफायतशीर ठरेल काय? या तीन कसोटयांवर घासून एखादी योजना जेव्हा बरोबर उतरते तेव्हा कुठे कोणीही त्या योजनेसाठी कर्ज देतो. आणि तरीहि आणखी एक विचार असा केला जातो की इतके सर्व करून या योजनेसाठी आपण देणार असलेले कर्ज परतफेड होईल की नाही· खासगी कारखान्यांना कर्ज मिळवताना याच कसोटया लावल्या जातात. परंतु एक सरकार जेव्हा दुसऱ्या सरकारला कर्ज देते तेव्हा ते काही विशिष्ट योजनेसाठी असतेच असे नाही. ते कर्ज सरकारी योजनेसाठी वापरले गेले की त्याआधी त्या कारखान्याला या चार कसोटया अगदी कसोशीने लावल्याच जात नाहीत. त्यामुळे तोटा येतो, भांडवल आपले आणि परक्यांचे अडकून पडते, त्यावरील व्याजाचा आणि कर्जाचा आकडा वाढत जातो.


परकी कर्जांना सर्वस्वी फाटा देता येणार नाही असे मत व्यक्त करून श्री. दांडेकर यांनी पुढे स्पष्ट केले की, " खासगी कारखान्यांसाठीही परकी कर्जे मिळवताना सरकारने कोणतीही बन्धने घालू नयेत. फक्त एवढीच खात्री करून घ्यावी की त्या कारखान्याच्या मालामुळे निर्यात–वाढीला हातभार लागेल, किंवा काही वस्तूंची आयात आपल्याला करावी लागणार नाही, किंवा आयातीसाठी

द्याव्या लागणाऱ्या परकी चलनात निश्चितपणे भरीव बचत होईल. एवढी खात्री केल्यानंतर परक्यांना ४९ टक्के आणि भारतीय शेअर्स मात्र ५१ टक्के असलेच पाहिजेत असली बन्धनें घालून राष्ट्रोपयोगी कारखानदारीला खीळ घालू नये. **कारण परकी भांडवल आले की त्यापाठोपाठ परकी दडपण येते ही कल्पनाच मुळी १९४० च्या काळातील जुनाट आणि बुरसटलेली आहे.** आपण आता १९७० च्या जवळपास पोचत आहोत. भारतातल्या कितीतरी कंपन्यांत आणि कारखान्यांत आजही परकी भांडवल लागलेले आहे. काही कंपन्यात तर ७० टक्क्यांपर्यन्त आहे. परंतु या कंपन्या आणि कारखाने खासगी मालकीचे आहेत. ते काही विशिष्ट प्रश्नांवर त्यांच्या सरकारचे काय धोरण आहे याचा विचार करीत बसत नाही, किंवा त्या धोरणापायी त्यांना आपली औद्योगिक हिताची धोरणे बदलायला त्यांची सरकारेही सांगत नाहीत. सांगितले तरी हे लोक ऐकायचे नाहीत. तेव्हा हा दडपणाचा बागुलबोवा एक निव्वळ बुजगावणे आहे मात्र ग्राहकोपयोगी मालाच्या कारखान्यात कोणतेच परकी भांडवल गुंतवू देऊ नये.

आता सरकारी कर्जांचा विचार केला पाहिजे. कोणत्याही कर्जाची मूलभूत कसोटी ही असली पाहिजे की ते आपोआप वितळून जाणारे आहे की नाही. म्हणजे त्याची परतफेड ते स्वतःच करू शकेल की नाही. सरकार काढीत असलेल्या कर्जांना ही कसोटी कधीच लावली जात नाही. आज सरकारी कर्ज ५००० कोटी रुपयांच्या वर गेले आहे. त्यातील नऊ दशांश कर्जाच्या रकमा या कसोटीला उतरणाऱ्या नाहीत. म्हणून आपल्यावरील कर्ज आता डोईजड होत आहेत. ही कर्जे स्वतःच वितळणारी नाहीत. त्यामुळे एवढे पाच हजार कोटी घालवूनही आपली दशा सुधारलेली नाही. मागची कर्जे देण्यासाठी नवी कर्जे काढण्याची लाजिरवाणी स्थिती आपली झाली आहे

आता यापुढे कोणतेही कर्ज काढताना वर सांगितलेल्या चारही कसोटचा अगदी काटेकोरपणे लावून पहिल्याच पाहिजेत. परकी चलनात कर्ज फेडता येत नसेल तर निदान रुपयात सममूल्य रक्कम आपल्या रिझर्व्ह बँकेत त्या त्या धनकोचे खाते उघडून जमा करता आली पाहिजे. म्हणजे मग काहीशा बेपर्वाईने आपल्याला त्या रकमेचे परकी चलनात रूपांतर करण्यासाठी सवलती मागण्याचा अधिकार तरी राहील. ते न करता परतफेडीच्या मुदतीत किंवा अटीत वाढ मागताना आपल्या राज्यकर्त्यांना लाज कशी वाटत नाही हा खरा प्रश्न आहे. पीएल– ४८० करारानुसार जे काही कर्ज या देशात जमा झाले आहे ते सरकारी अंदाजपत्रकात जमेस धरता कामा नये. म्हणजे त्यामुळे चलनवाढीस प्रोत्साहन मिळायचे नाही. हे उपाय केले नाहीत तर हा देश दिवाळखोर बनेल आणि त्यातून आजच्या जागतिक परिस्थितीचा विचार केला असता **राजकीय पारतंत्र्य जरी येणार नसले, तरी विशिष्ट प्रश्नांवर अमुक एक प्रकारचे वागण्याचे आपले स्वातंत्र्य मात्र आपण गमावून बसण्याची शक्यता आहे.**

□



# आगीशी खेळ

नरेन्द्र बल्लाळ

जगाच्या पाठीवर कुठेही ज्वालामुखीचा स्फोट होवो, तिथे आधी बोलावले जाते हरुन तॅझीफ या धिप्पाड बेल्जियन माणसाला. पृथ्वीच्या पोटात ज्वालामुखीची गुरगुर सुरू झाली रे झाली, की या माणसाला तार जाते. स्फोट कुठेही होवो, तारेतले शब्द तेच असतात :

**ज्वालामुखी जागा होत आहे, मोठा धोका.**
**लोक भयभीत. कृपया निघून या !**

तॅझीफ या निमंत्रणाचा अव्हेर करीत नाही. तो त्वरेने ज्वालामुखी-कडे धाव घेतो. ज्वालामुखीच्या जबडयात शिरण्याचे त्याला मुळीच भय वाटत नाही. कारण आगीशी खेळणे हा त्याचा आवडता ' धंदा ' होऊन बसला आहे ! त्रेपन्न वर्षांचा तगडा तॅझीफ आग ओकणाऱ्या ज्वाला-मुखीच्या विवरात बिनदिक्कत डोकावतो. या साऱ्या साहसातून तो जिवंत राहिला हे फार मोठे आश्चर्य आहे !

पोलंडमध्ये वॉर्सा इथे तॅझीफचा जन्म झाला. त्याचे वडील रशियाई होते आणि आई पोलंडमधली. वयाच्या सातव्या वर्षी छोटा हरुन आई-वडलांबरोबर बेल्जियममध्ये राहायला आला. लहानपणी त्याची महत्त्वाकांक्षा होती, ध्रुवप्रदेशात संशोधन करायला जाण्याची. पण झाले उलट! बर्फाऐवजी अक्षरशः आगीशी खेळण्याचे काम तो पुढे करू लागला!

दुसऱ्या महायुद्धात, तो दिवसा भूगर्भशास्त्र आणि शेतकी यांचा अभ्यास करी, तर रात्री 'बेल्जियन रेझिस्टन्स'तर्फे आगगाड्या उलथवण्याचे 'कर्तव्य' पार पाडी! १९४५ मध्ये बेल्जियन काँगोतील टिनच्या खाणीवर भूगर्भतज्ज्ञ म्हणून त्याची नेमणूक झाली. आणि आगीशी त्याची गाठ मारली गेली ती तिथे. एक दिवस खाणीतले काम संपवून त्या भागाची भूगर्भशास्त्रीय पाहणी करीत तो फिरत असता, जवळचाच कितुरो ज्वालामुखी जागृत झाला! बस्स. हा ज्वालामुखी जवळून बघायचा असे तॅझीफने ठरवले.

कितुरो खवळून आग ओकीत होता. वातावरणात असह्य उष्णता निर्माण झाली होती. पायाखालच्या जमिनीला तडातड भेगा पडत होत्या, आणि त्यातून आगीचा डोह लळलळताना दिसत होता. एकाएकी धुराच्या एका गहिऱ्या लोटाने त्याला विळखा घातला. लोखंडाचे भक्कम कडे डोक्याभोवती आवळावे तसे झाले. आता आपण मरणार याबद्दल तॅझीफची खात्री झाली. विषारी वायू नाकातोंडात जाऊ नये, म्हणून तोंडावर रुमाल दाबून धरीत तो चालू लागला आणि ठेचकाळून खाली कोसळला. निखाऱ्याप्रमाणे तापून लाल झालेल्या दगडावर त्याचे हात पडले आणि चरचरून भाजले. कोट जळू लागला. जिवाच्या आकान्ताने तॅझीफ उठला आणि वेगाने पळू लागला. शुद्ध हवेत येऊन दीर्घ श्वास घेतल्यावरच तो थांबला.

एवढ्या प्रकारानंतर कोणताही माणूस खचला असता. पुन: ज्वालामुखीच्या वाटेला गेला नसता. पण तॅझीफ दुसऱ्या दिवशी पुन: आपला ज्वालामुखीजवळ हजर! त्या दिवशी तिथे तयार झालेल्या लाव्हारसाच्या उकळत्या तळ्यात त्याने चक्क डोकावून पाहिले. सोनेरी, लाल, जांभळे असे ते आगीचे पाणी खळबळत होते. त्यातून वाफा निघत होत्या, वेगवेगळ्या वायूंचे लोट उसळत होते.

या पहिल्याच दर्शनाने तॅझीफ ज्वालामुखीच्या प्रेमात पडला ! त्याच्या बलदंड शरीरातील मनाला या साहसाने, आव्हानाने, भीषण सौंदर्याने मोह घातला. आणि मुख्य म्हणजे वैज्ञानिकांना उत्तर न मिळालेले असे किती तरी प्रश्न तिथे होते. त्यांची उत्तरे शोधून काढण्याचे काम करण्यात केवढा तरी आनंद होता ! कित्येक प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या ताऱ्यांबद्दल आपण जेवढी माहिती सांगू शकतो, त्याच्या किती तरी पट कमी ज्ञान आपल्याला आपल्याच पृथ्वीच्या अंतरंगाबद्दल असते. तेव्हा ज्या क्षेत्राकडे फारसे कोणी वळलेले नाही, त्या या क्षेत्रात पाऊल टाकायचेच असे तॅझीफने निश्चित करून टाकले. ज्वालामुखीच्या अंतरंगाचा वेध घ्यायचे त्याने ठरवले.

त्यानंतर आतापर्यंत जगातल्या सुमारे ५०० जागृत ज्वालामुखींपैकी २०० हून अधिक ज्वालामुखींना तॅझीफने भेट दिली आहे. समुद्रात जागृत होऊन त्यांनी नवी बेटे निर्माण केल्याचे त्याने पाहिले आहे, तसेच सपाट मैदानावर प्रचंड डोंगर निर्माण होण्याचा चमत्कारही त्याने पाहिला आहे.

कोस्टारिकात नुकताच ज्वालामुखी जागृत होऊन हाहा:कार उडाला. मार्च १९६४ मध्येही तेथील इराझू ज्वालामुखी जागा होऊ लागला होता तेव्हाची गोष्ट. तॅझी पॅरिसमधील आपल्या घरी होता. नेहमी-प्रमाणे कोस्टरिकाचे राजदूत त्याला बोलावणे करण्यासाठी गेले.

तॅझीफ विचारात पडला. कारण जवळच्याच सिसिली बेटातील ज्वालामुखीचाही उद्रेक होण्याची चिन्हे दिसत होती. पण कोस्टरिकाची हाकही ऐकायला हवी होती. काय करावे ? तॅझीफ विचारात पडला. कोस्टारिकाचे राजदूत विनवीत होते, "तुम्ही यायलाच हवं. तुम्ही डॉक्टरसारखे आहात.--तुम्हांला नाही म्हणता यायचं नाही."

तॅझीफ हसून बोलला, "डॉक्टर रोग्याला बरं करतो. ज्वालामुखीला कोण बरं करू शकणार ?"

पण शेवटी तॅझीफ कोस्टारिकात पोहोचला. अनेक वर्षांच्या अनुभवा-नंतर तयार केलेला खास ज्वालामुखी–रोधक पोशाख त्याने चढवला. हा पोशाख म्हणजे ५० पौंड वजनाच्या दगडापासूनही संरक्षण करील असे भक्कम शिरस्त्राण, आणि उष्णता व जळत्या वस्तू यांच्यापासून संरक्षण करणारा फायबरग्लासचा सूट असा असतो. कमरेच्या पट्ट्याला त्याने

वायुरोधक मुखवटा अडकवला. पायांत क्रेप रबराच्या तळाचे बूट घातले. (या बुटांचा जोड जास्तीत जास्त २४ तास टिकतो.)

त्याच्याजवळची हत्यारे म्हणजे एक भूकंपमापक यंत्र आणि एक इन्क्लिनोमीटर. ज्वालामुखीच्या उद्रेकाची पूर्वसूचना या यंत्रावर मिळते. याशिवाय काचेच्या खास प्रकारे तयार केलेल्या नळयाही त्याने बरोबर घेतल्या. ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या वायूंचे जागच्या जागी परीक्षण करण्यासाठी या नळया असतात. शिवाय लाव्हा रसात खुपसून त्याचे तपमान व दाब मोजणारे एक आयुधही तॅझीफने बरोबर घेतले.

इराझूच्या धोक्याचा अभ्यास करण्यासाठी तिथे तॅझीफने अर्धा दिवस घालवला. गेले कित्येक महिने हा पर्वत धुमसत होता. मोठमोठे धुराचे ढग, वस्त्रगाळ केल्यासारखी दगडांची भुकी आणि राख तो उधळीत होता. कोस्टारिकाची राजधानी सान जो जवळच होती. ज्वालामुखीतून होणाऱ्या या वर्षावाने तेथील धातूची कुंपणे, टेलिफोनच्या तारा, कातडी बूट यांना खाऊन टाकले होते. त्याच्या भाराने घरे कोसळली होती.

पण तॅझीफला चिंता वाटत होती, ती पर्वताच्या उतारावर साठलेल्या अशा 'धुळी'ची. पावसामुळे तिचे प्रचंड काळया चिखलात रूपांतर झाले असते आणि हा थंड काळा लगदा खाली वाहत आला असता, म्हणजे काळनदीप्रमाणे सारे पोटात घेतच पुढे गेला असता. जिवंत जळजळत्या लाव्हारसाने झाली असती तितकीच भीषण हानी ही मेलेली राखही करू शकली असती. वाटेतली झाडे उखडीत, प्रचंड दगडगोटे बरोबर घेत वरवंटयासारखा हा काळा प्रवाह सगळया वस्तीवरून फिरला असता. अवस्था मोठी चिंताजनक होती. भविष्य मोठे भीषण होते.

ही अपरिमित हानी टाळायची म्हणजे पावसालाच रोखायला हवे होते. आणि ते शक्य अशक्य होते. तॅझीफने हा नाश टाळण्यासाठी जो उपाय सुचवला, तो प्रचंड खर्चाचा होता; पण तोच एकमेव उपाय होता. आणि तो योजणे अपरिहार्यच होते.

त्याप्रमाणे खुद्द इराझूवर आग व कडे कोसळणे यास तोंड देतील अशी निरीक्षणकेंद्रे उभारण्यात आली. भूकंपमापक यंत्रे, शोधदीपक आणि टेलिफोन्स यांनी ती सुसज्ज ठेवण्यात आली. रात्रंदिवस तेथे माणसे नेमण्यात आली. शिवाय पावसाने निर्माण होऊ घातलेले काळ–प्रवाह

अडवण्यासाठी डोंगरात मोक्याच्या ठिकाणी त्वरेने धरणे बांधण्यात आली. एवढे करूनही सान जोमधील लोकांना तडकाफडकी स्थलांतर करण्याचे शिक्षण देऊन तयार करण्यात आलेच.

पुढे पाऊस कोसळला. परंतु त्यामुळे डोंगरावरून वाहून आलेल्या चिखलाच्या पुराने अपेक्षेपेक्षा खूपच कमी घरांची हानी झाली आणि प्राणहानी तर मुळीच झाली नाही. तॅझीफने डॉक्टरसारखी प्रतिबंधक योजना यशस्वीपणे पार पाडून दाखवली! कोस्टारिकातील जनता त्याला डोक्यावर घेऊन नाचली यात नवल नाही.

स्वत: संकटाच्या छायेत वावरत राहून इतरांना सुखरूप ठेवण्यासाठी धडपड करायची हे तर हरुन तॅझीफच्या या साहसी जीवनाचे उद्दिष्ट. प्रत्यक्ष वडवानलाच्या सहवासात असे अनेक प्रसंग त्याच्यावर येऊन गेले. त्यातून कधी तो दैवयोगाने वाचला, कधी स्वतःच्या प्रसंगावधानाने, पण कोणत्याही वेळी त्याची हिंमत त्याला सोडून गेली नाही. त्याच्या धिप्पाड निकोप शरीरातले हृदय कोणत्याही प्रसंगी नेहमीसारखेच टिक-टिकत राहिले.

एकदा स्ट्राम्बोली बेटातील स्ट्राम्बोली ज्वालामुखीच्या विवराशी उभा राहून तेथील लालभडक लाव्हारसाचे छायाचित्र घेण्यासाठी तॅझीफने कॅमेरा रोखला होता. आणि अक्षरशः त्याच्या पायाखालची जमीन निसटली. निसटली म्हणजे काय, त्याला घेऊन तिने त्या लाव्हा-मध्ये उडीच घेतली होती! पण दैवयोग विलक्षण. कॅमेऱ्याच्या व्ह्यू-फाइण्डरमध्ये लाव्हारसाऐवजी एकाएकी काळी आकृती दिसली, म्हणून तॅझीफने बाजूला पाहिले, तो कोसळणारी ती माती होती. क्षणार्धात तो बाजूला झाला नसता, तर त्याच्यासकट ती लाव्हाच्या उकळत्या रसात पडली असती...आणि...

—ती कल्पनाही करवत नाही. आपल्या उदरात शिरून सहजतेने वावरणाऱ्या या त्रेपन्न वर्षांच्या जवानाबद्दल प्रत्यक्ष अग्निनारायणासही आदरयुक्त प्रेम वाटत असावे. म्हणून तर हरुन तॅझीफ अजून आपल्यात आहे!

□




## हा पुष्पगुच्छ तुमच्या घराची शोभा वाढवितो

तर महाराष्ट्र बँक तुमची दौलत वाढविते. आपण खात्यांत टाकलेल्या शिलकीवर महाराष्ट्र बँक दर सहामाहीस भरपूर व्याज देते. बचत खाते व इतर खात्यांच्या सविस्तर माहितीकरितां आपल्या जवळच्या आमच्या कोणत्याही शाखेत भेटा अगर लिहा.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

## श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. १७ ते २३ ऑगस्टचे भविष्य

**मेष :** एकटा मंगळ तुमच्यावर नाराज असला तरी, अनेक ग्रहांची सहानुभूती घेऊन आपण भविष्यकालाची वाटचाल करीत आहात. तुमचे सहसा कुठे नडू नये.

शैक्षणिक–वैज्ञानिक–साहित्यिक, प्रांतांतील व्यक्तींना तर पंचमातील गुरू–शुक्र अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल. साडेसातीच्या कालातही केव्हा केव्हा अंगच्या कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडू शकते.

१८ ऑगस्टच्या सूर्य–शनी त्रिकोणापासूनच योजनाबद्ध कार्यक्रम आपण आखू शकाल आणि तो अपेक्षेप्रमाणे यशस्वीही करून दाखवाल.

या महिन्यापासून राजकीय जबाबदाऱ्या वाढवून घ्याल, स्थावराचा प्रश्न यशस्वीपणे सोडवू शकाल.

दि. १८–१९–२० विशेष यश देणारा काल.

**वृषभ :** चतुर्थातील अनेक ग्रहांच्या उपस्थितीमुळे, या वेळी स्थानांतर, व्यावसायिक बदल, इत्यादी घटना घडून यायला लागतील आणि घडणाऱ्या व घडवून आणणाऱ्या सर्व गोष्टी भविष्यकालीन यशाची ग्वाही देऊ शकतील.

सध्या तरी निदान साडेसातीबद्दल विचार करण्याचीही गरज नाही. आगामी महिन्याभरात औद्योगिक क्षेत्रातील भव्य योजना उभारल्या जातील आणि त्या पूर्णत्वाने यशस्वीही करून दाखवल्या जातील.

चित्रपट व्यवसायाशी संबंध असलेल्या व्यक्तींना हा आठवडा नेत्रदीपक यश देणारा जाणवेल.

याच आठवड्यात राजकीय व सामाजिक प्रतिष्ठा वाढवणाऱ्या काही घटना १५ ऑगस्टच्या सुमारास घडून याव्यात.

दि. १८–२०–२२ ऑगस्ट हे दिवस अधिक प्रगतीचे जाणवतील.

**मिथुन :** आपल्या पराक्रमस्थानी आजवर एकटा गुरूच होता–आता त्याच्या सान्निध्यात आणखी ३ ग्रह आलेले आहेत, ते आपल्या जीवनात अलौकिक, अनन्य-साधारण घटना घडवून आणतील यात शंकाच नको.

नवे क्षेत्र हाती येईल, नव्या योजना आखल्या जातील. आजवर आपण निर्धार-निष्ठेचे व्रत निष्ठावंतपणे आचरलेत, त्याचेच हे श्रेय.

प्रतिभेचा उन्मेष बहरेल, नवे संशोधन हातून घडेल, आपले यश दिगंतात निनादू लागेल. या वेळी आपण मांडलेले आपले प्रगतीचे त्रैराशिक मुळीच चुकणार नाही.

नवे वाहन लाभेल, स्थावराची विवंचना मिटेल, वैचारिक दिलजमाई होऊन जाईल. पुढे टाकलेले पाऊल मागे घेण्याचा चुकूनही प्रसंग येणार नाही.

दि. २० ते २३ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**कर्क :** मंगळाचे तुमच्या राशीतून संचलन सुरू असले तरी धनस्थानी अंतरिक्षा-तील सारे विशाल ग्रह एकत्र जमलेले आहेत. ते काही न करता जातील, असं घडणार नाही.

हाती अमाप पैसा येऊ लागेल, धनोत्पादनाचे नवे मार्ग यशस्वी ठरतील, यांत्रिक तांत्रिक धंद्यांतील यश जगाने हेवा करावा, असे असेल. अनपेक्षितपणे प्रतिष्ठा वाढविणाऱ्या घटनाही याच वेळी घडून याव्यात.

मंगळामुळे प्रकृतिमान फारसे चांगले राहणार नाही. मनाची अस्वस्थता पूर्णत्वाने दूर होण्याची सध्या तरी शक्यता दिसत नाही.

जवळपासच्या प्रवासाच्या योजना आखल्या जातील, धनिकांचे सहकार्य कोण-त्याही क्षणी लाभू शकेल.

दि. १८–१९–२० या काली अनेक कार्यात यश लाभावे.

**सिंह :** रवि–गुरू इत्यादी विशाल तेजोगोलांचे संचलन तुमच्या राशीमधूनच घडू लागलेले आहे. या वेळच्या तुमच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाने जगातील कर्तृत्व-संपन्न माणसांच्या यादीत आणखी एकाची नोंद केली जाईल. या कालापासून तुमची राजकीय प्रतिष्ठा एवढी उंचावेल की, आकाशही ठेंगणे वाटावे.

व्यावसायिक प्रगतीचा आलेख वरवर सरकू लागेल, तुमच्या धगधगत्या निष्ठेची ही सारी किमया. यशाचे दुर्गम कडेकोट जिकणे आता मुळीच अवघड वाटणार नाही.

परराष्ट्रीय व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल, समाजातील अनेक थरात तुमचे अस्तित्व प्रकटू लागेल. या वर्षातील अधिकाधिक यशस्वी हाच काल.

दि. १९ ते २२ या कालाची नोंद ठेवा.

**कन्या :** आपल्या राशीच्या व्ययस्थानी खूपसे ग्रह जमा होत आहेत, म्हणून काळजी करू नका. ते ग्रह हातोहात लाभ देणारे नसले तरी, परिणामी कल्याण-कारीच ठरतील. या ग्रहांपासून प्रत्यक्ष लाभाची फारशी अपेक्षाच करू नका.

स्थावरासाठी किंवा नवा व्यवसायधंदा उभारण्यासाठी केलेला खर्च म्हणजे व्यय नव्हे. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन आपण कार्य करू लागाल आणि आपला हेतू लवकरच सफल झाल्याचा आपणास प्रत्यय येईल.

व्यावसायिक जबाबदाऱ्या वाढू लागतील, प्रगतीकडे जाणाऱ्या नव्या वाटा शोधून काढल्या जातील, आणि आपल्या अवघड कार्यास अनेकांचे हार्दिक सहकार्यही लाभेल.

दि. १८–२०–२२ या कालात फार मोठ्या उलाढाली होतील.

**तूळ :** लाभस्थानी एक दोन नव्हे चांगले चार–पाच ग्रह आलेले असताना आणखी काय हवे ? प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागतील. आपली प्रत्येक कृती या वेळी अपेक्षेबाहेर यशस्वी ठरू लागेल.

केवळ पैसाच नव्हे तर यश प्रतिष्ठा सुख सारेसारे काही या काली फार मोठ्या प्रमाणावर लाभेल.

नोकरीत उच्चाधिकार लाभेल, कला–साहित्याच्या प्रांतात तर तुमचे श्रेष्ठत्व निरपवाद ठरेल.

मोहक वस्तू, सौंदर्यप्रसाधने, मौल्यवान जडजवाहीर इत्यादी व्यवसायांत आजवर हयातीत कधीही न मिळालेला लाभ या वेळी सहजासहजी होईल. आपला परमोत्कर्षाचा काल हाच.

दि. १९ ते २१ या कालात अनेक कामे हातावेगळी केली जातील.

**वृश्चिक :** भाग्यस्थानातील मंगळाच्या उपस्थितीने तुमच्या बऱ्याचशा विवंचना मिटलेल्याच आहेत. आता दशमस्थानी आलेल्या ग्रहामुळे तुमची प्रगती वेग घेऊ लागेल.

आपल्या उज्ज्वल भविष्यकालाची प्रसादचिन्हे या आठवड्यापासून स्पष्टपणे दिसायला लागतील. नोकरीधंद्यातील हुकलेल्या साऱ्या संधी पुन्हा दिसायला लागतील, शिवाय सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा अपेक्षेबाहेर वाढू लागेल याच आठवड्यापासून.

थोडक्यात मला आपणास असे सांगावयाचे आहे की, अनंत चिरस्मरणीय घटना घडवून आणणारा हा काल. व्यावसायिक–सामाजिक साऱ्या क्षेत्रांत आपणच आघाडीवर राहाल.

दि. २१ ते २३ नोंद करण्यासारखा महत्त्वाचा काल.

**धनू :** सूर्य, बुध, शुक्र, गुरू – भाग्यस्थानी इतके ग्रह – ही अवस्था मला वाटते तुम्ही कित्येक वर्षांनी आताच अनुभवीत आहात. तुमची सारी विवंचना येथूनच मिटेल. उलट या आठवड्यापासून तुमच्यातील अनन्यसाधारण कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडू लागेल.

दूरचा प्रवास, स्थानांतर, परदेश गमनही घडावे. आणि या बदलत्या अवस्थेमुळेच तुमचा यशोदुंदुभी निनादू लागेल.

नोकरीत अपेक्षेपेक्षाही मोठा अधिकार लाभेल, परराष्ट्रीय व्यापारधंद्यात विक्रम करून दाखवाल. कला, क्रीडा क्षेत्रात तर तुमचे स्थान सर्वांत उंच असेल.

आठव्या मंगळाची आता आपणास दखल घ्यायची गरजच भासणार नाही.

दि. १८ ते २१ विशेष अनुकूल.

**मकर :** तुमचा अनिष्ट काल अजुनी पूर्णत्वाने संपलेला नाही आणि मंगळ कर्केतून पसार झाल्याशिवाय संपेल असेही दिसत नाही.

समाधान एवढेच की, गुरूच्या सान्निध्यात गुरू-शुक्र आलेले आहेत. ते तुमचे प्रयत्न अगदीच निष्प्रभ होऊ देणार नाहीत. इष्टमित्रांच्या साहाय्याने वेळ निभावून जाईल. पण हरवलेले स्वास्थ्य लवकर गवसेल असे दिसत नाही. निर्धार, संयम, निष्ठा यांची नितांत गरज भासू लागेल याच काली.

१८ ऑगस्टच्या सूर्य-शनी त्रिकोणापासून फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील आणि त्या यशस्वी करून दाखवण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. १८ ते २१ या वेळी अल्पसे यश पदरी पडावे.

**कुंभ :** अंतरिक्षातील साऱ्या ग्रहांचा कौल अनुकूल मिळालेला आहे. आता फक्त गरज आहे थोड्याफार प्रयत्नांची, तेवढे घडले की, तुम्हांला तुमच्या प्रत्येक कार्यात घवघवीत यश मिळू लागेल. साडेसाती संपलेली आहे आणि गुरूची पूर्ण कृपा लाभलेली आहे. असा अनुकूल कालखंड जीवनात क्वचितच येत असतो. त्याची आपण योग्य ती दखल घेतली नाहीत तर पुन्हा तशी वेळ आपणास दिसणार नाही.

यांत्रिक क्षेत्रात, परराष्ट्रीय व्यवहारात, संशोधन विभागात आपण निःसंशय यशस्वी व्हाल असा ग्रहांचा आपणास आशीर्वाद आहे.

दि. १९ ते २२ अपेक्षेबाहेर लाभाचा काल.

**मीन :** आता आपले सहसा कुठेच नडू नये अशी सर्वोत्तम ग्रहस्थिती आपणास लाभलेली आहे.

नोकरीधंद्यात, शेतीवाडीच्या व्यवहारात, कोर्टकचेरीच्या कामात तुम्ही निश्चित विजयी व्हाल. प्रकृतीच्या तक्रारीही आता पूर्वीसारख्या जाणवणार नाहीत.

इष्टमित्रांवर, नोकरचाकरांवर फारसे विसंबून राहणे शहाणपणाचे ठरणार नाही. नेहमीच्या नोकरीधंद्यात बदल करण्यानेही लाभाचे जाणवणार नाही.

निर्भयतेने पुढे निघालात तर अनेक इष्टमित्र तुमच्या साहाय्यास धावून येतील.

दि. २१ ते २३ विशेष अनुकूल दिवस एवढेच. ○

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला, मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

प्रस्तावना : ना. ग. गोरे

मूल्य : सोळा रुपये

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध होत आहे.

**राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणे २.**

चौथी सचित्र आवृत्ती


# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

MANOOS (Weekly) : 125 Paise : Regd No. M H-649



# नायक्रोम
# मेटल वर्क्स

★ रोलिंग शटरची डिलिव्हरी आता आठ दिवसात मिळते.

★ लोखंडी खिडक्या, दारे व अवजड स्ट्रक्चरल् यांचे पुण्यातील प्रमुख उत्पादक.

तार : नायक्रोम        फोन : २४२८७

पत्ता : ४६ वेलेस्ली रोड, संगम, पुणे १

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.